# शब्द रुची

४४

एप्रिल २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५२

## जागतिक वाचक दिन



# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



सतीश भावसार लिखित 'तीन चित्रकार' या पुस्तकप्रकाशनसमयी अमृता मोडक, मीनाक्षा पाटील दीपक घारे, लेखक सतीश भावसार, विक्रम गोखले, सुहास बहुलकर, अरुण शेवते, सुदेश हिंगलासपूरकर आणि श्रीनिवास नार्वेकर



किरण येले लिखित 'मोराची बायको' पुस्तकाच्या चौथ्या आवृत्ती प्रकाशनसमयी चांगदेव काळे, अरुण जोशी, धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, लेखक किरण येले, अरुण शेवते आणि सुधीर चित्ते





डॉ. ललिता गांगल यांच्याशी 'स्वास्थ्य आणि मन : योग एक साधना' या विषयावर गप्पा व चर्चा. त्यावेळी 'शब्द रुची'च्या महिलादिन विशेषांकाचे प्रकाशन डॉ. ललिता गांगल यांच्या हस्ते झाले. प्रकाशनसमयी साधना गोरे, डॉ. लतिका भानुशाली, धनश्री धारप, सई हिंगलासपूरकर, सुरेखा जाधव, डॉ. लतिका गांगल, छाया दातार, डॉ. वीणा सानेकर, सीमा प्रभावळकर, शोभा हिंगलासपूरकर आणि आशा इंगळे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.






डावीकडे 'घातसूत्र' या पुस्तकाच्या निमित्ताने दीपक करंजीकर यांचे मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे व्याख्यान. उजवीकडे 'घातसूत्र' पुस्तकाचे प्रकाशन आणि व्याख्यान.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**एप्रिल २०१९, वर्ष सहावे**
**अंक बारावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ एप्रिलपासून १२ ते ७ संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४४

## अनुक्रम

**स्मरणस्वर**
- पल्याडचा ओढ जागवणारा 'यशवंत'/ **दिनकर गांगल** /६
- आमचे अरुणदादा / **दीपा पळशीकर** / ९

**विचारविश्व**
- एकविसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध आणि नवा 'मानुष'वाद / **रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ** / १२

**हिरवं जग**
- बीज जपावे उरात । मग पीक वावरात । **डॉ. कैलास दौंड** / १७
- साप, काठी आणि शिकवण / **लखनसिंह कटरे** / १९
- देवराई : मानवीजीवनाचा आधारवड / **अरुण मळेकर** / २०

**सृजनरंग**
- दोन खंडकाव्य – गीतरामायण आणि गीतगोपाल / **मधुवंती सप्रे** / २२
- अत्तराच्या कुपीची खाण / **कुमार नवाथे** / २७
- पुस्तक / **राधिका कुंटे** / ३०

**चित्रपट विश्व**
- 'आनंदी गोपाळ' बायोपिकच्या निमित्ताने / **अंजली कीर्तने** / ३१

**आपल्या मातीचा चित्रपट**
- सुदानी/ **संतोष पाठारे** / ३६

**ललित**
- 'त्या बायका' / **श्वेतल परब** / ३८

**सातासमुद्रापलीकडून**
- अमेरिका : काही अनिवासी व भारतीय वंशाच्या अब्जाधिशांची कथा/ **डॉ. अनंत पां. लाभसेटवार** / ४१
- पुस्तक आणि पुरस्कार वृत्तांत / ४५-४६
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

## संपादकीय

**या** महिन्यात २-३ तारखेला जागतिक वाचकदिन असतो. वाचकांच्या पिढ्या बदलताहेत तसतसे वाचकांचे स्वरूपही वेगाने बदलतेय. विशेषत: माध्यमक्रांतीनंतर दृश्यभाषेशी जोडलेला वाचकवर्ग तयार होतोय. या वाचकवर्गाचा एकच एक पोत नाही. महाराष्ट्रातला हा समकालीन वाचकवर्ग कोणत्या विषयांवरची पुस्तके विकत घेऊन वाचतो? वाङ्मयाची ओढ असणारा वाचक किती? क्रिटिसिझम-समीक्षा किती वाचली जाते? तरुणवर्ग कोणत्या भाषेतली पुस्तकं अधिक वाचतो? मराठी पुस्तकांना या वर्गाची पसंती किती? किती घरांतून दिवाळी अंक, मासिकं, नियतकालिकं विकत घेऊन वर्गणी भरून वाचली जातात? महाराष्ट्रातील नव्या पिढीला कोणत्या माध्यमातून वाचन करणे आवडते असे काही प्रश्न समोर ठेवून सर्वेक्षणे करणे एकूण सांस्कृतिक व्यवहाराच्या दृष्टीने गरजेचे आहे.

'ग्रंथाली' वाचकदिनानिमित्ताने (२५ डिसेंबर) आवर्जून 'शब्द रुची'चा विशेष अंक प्रकाशित केला जातो. वाचकाचे स्वरूप, अपेक्षा, आवडनिवड यांचा शोध घेण्याचाच हा प्रयत्न असतो. यंदा भाषादिनाचे औचित्य साधून आम्ही तो प्रकाशित केला, आणि त्याला तुम्ही खूप चांगला प्रतिसाद दिला.

शिक्षणाच्या काळात वाचनाशी नाते जडते. नकळत्या वयात एखादे पुस्तक हातात येते, मनाचा ठाव घेते आणि आयुष्यच बदलून टाकते, असे अनुभव ऐकलेले-वाचलेले असतात; यातली खूप कमी पुस्तकं अभ्यासक्रमातली असतात. अभ्यासक्रमाबाहेरचं वेगळंच एखादं वेगळंच पुस्तक हाती येतं नि आपण भारावून जातो.

आमच्या सोसायटीत काही दिवसांपूर्वी एक आनंदमेळा होता. मेळ्यात वस्तू, खाद्यपदार्थ यांच्याबरोबरीने एक पुस्तकांचा स्टॉल होता. आवारात भरपूर लहान मुले खात-पित-बागडत होती. एक लहान मुलगी पुस्तकाच्या स्टॉलवर आली. मराठी पुस्तकाकडे बोट दाखवत म्हणाली, ''ये तो कुछ अपने कामका नहीं है।'' मी म्हटलं, ''का ग कामका नहीं है? तुला मराठी वाचता येतं ना?'' ती म्हणाली, ''थोडं थोडं येतं...'' आणि मी म्हटलं, ''मग वाचून बघ की.'' ती म्हणाली, ''काय उपयोग? मी इंग्लिश मिडियममध्ये आहे.'' मराठीशी नाळ तुटलेल्या बहुसंख्य मराठी मुलांची ती प्रातिनिधिक प्रतिक्रिया होती.

कल्पना रसरशीत राहण्याकरता, सर्जनशीलता अंकुरत राहण्याकता मातृभाषेतील पुस्तकांच्या वाचनाशी जोडून राहाणे आवश्यक आहे; पण एकूण ज्ञानाच्या क्षेत्रातली समीकरणं खूपच बदलली आहेत. नुकतंच गणेश देवी यांचे 'त्रिज्या' हे पुस्तक वाचनात आले. या पुस्तकात ज्ञानाच्या क्षेत्राविषयीची चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''ज्ञान हा शिक्षणाचा आत्मा असेल आणि शिक्षण हा देशाचा मूलाधार असेल तर ज्ञान आणि शिक्षणाच्या दूरवस्थेविषयी देशाने अंतर्मुख होण्याची वेळ आली आहे.''

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ शिवविश्वनाथन यांच्या वाक्यांचा एक संदर्भ याच पुस्तकात वाचला. ''शिक्षणाला क्रयवस्तूत रूपांतरित करणाऱ्या मॅनेजमेंट सिद्धांताचे खूप स्तोम माजवले जाते. शिक्षणाच्या क्षेत्रातही पैसावसूल मॉडेलने शिरकाव केला आहे.'' पण तरी या क्षेत्रात जीव ओतून काम करणारी माणसं आहेत. ही माणसे पैशाची समीकरणे बाजूला ठेवून अथक काम करत राहतात.

आसपास कितीही विपरीत असले तरी या क्षेत्राकरता माणसं आपलं उभं आयुष्य देतात. आनंदनिकेतनसारख्या नाशिकमधल्या प्रयोगशील शाळेचे स्वप्न, शासनाच्या कोणत्याही मदतीशिवाय, जनाधाराच्या पाठबळाने उभे करणारे अरुण ठाकूर आपल्या सर्वांच्या आठवणींमध्ये अजरामर झाले. त्यांनी केलेल्या शिक्षणक्षेत्रातील कार्याचा आलेख, या अंकात लेखातून साकारला आहे. त्यांनी केलेलं एक महत्त्वाचं काम म्हणजे 'टीचर' हे अनुवादित पुस्तक! सिल्व्हिया ॲश्टॅन वॉर्नर शिक्षक म्हणून स्वत:ची वेगळी वाट निवडते आणि घडवते. न्यूझीलंडमधील मावरी जमातीच्या मुलांच्या शिक्षणाकरता सिल्व्हियाने केलेले काम आजही शिक्षकांना खूप काही देणारे आहे.

सिल्व्हिया एकदा तिच्या एका प्राध्यापक मित्राशी विद्यापीठातील विद्यार्थ्यांबद्दल बोलते, तेव्हा तो म्हणतो, ''सगळे एकसारखे वाटणारे विद्यार्थी विद्यापीठात येत आहेत. स्वयंप्रज्ञ विद्यार्थी फारसे दिसत नाहीत.''

विद्यार्थी निर्जीव शब्दांच्या आणि कृत्रिम भाषेच्या आहारी गेले की काय घडते, हे सिल्व्हिया पाहात होती पण सिल्व्हियाला रसरशीत-जिवंत मने दिसली ती मावरींमध्ये. शिक्षणाच्या प्रांगणात खुरटी झुडपे दिसू नयेत, तर बहरलेली झाडं दिसली पाहिजेत. मृत झालेल्या शब्दांची सत्ता नाकारून मुलांनी नव्या नव्या शब्दांचा शोध घेतला पाहिजे म्हणून मावरी भाषेतली पुस्तकं तयार करण्याकरता सिल्व्हियाने कष्ट घेतले.

आपल्याकडे मात्र उलटी गंगा वाहते आहे. आदिवासी मुलांना इंग्रजी शाळांतून शिकवून त्याचे श्रेय घेण्यात शासन अग्रेसर आहे. ग्रामीण भागातल्या बोलीभाषांमधून- आदिवासी

बोलींमधून साहित्य तयार झाले तर त्या-त्या प्रदेशातील मुलांना शिकण्याची ओढ वाटेल. पुस्तकांचे प्रेम वाढेल.

० ० ० ०

बदल हा एकूण जगण्याचा नि समाजाचा स्थायीभाव आहे. कायम-स्थिर असे काही नसतेच! ना माणूस, ना काळ! 'शब्द रुची'बाबतही एक बदल वाचकांपर्यंत पोहोचला असेल. 'शब्द रुची'ची वर्गणी वाढवून ती ३०० रुपये एका वर्षासाठी आणि ५०० रुपये दोन वर्षांसाठी अशी करण्यात आली आहे. आर्थिक गणितांचा ताळमेळ पाहता हे करणे गरजेचे होते. कागद, पोस्ट, कुरियर, छपाई साऱ्याच आघाड्यांवरचे अडथळे आणि महागाई लक्षात घेता वर्गणीतली ही वाढ अटळ होती. आमचे वाचक हे समजून घेतील असा विश्वास आहे.

०००

'ग्रंथाली' जुन्या वुलन मिल म्युन्सिपल शाळेमधल्या जागेबाबतचा प्रश्न उभा राहिला व महानगरपालिकेने जागेला सील ठोकले तेव्हा पहिले धावून आले ते 'ग्रंथाली'चे सुहृद अजित सावंत! या मित्रवर्याचा चिरविरह नव्या कार्यालयात काम करताना आम्हा सर्वांना जाणवत राहील. व्यासंगी लेखक, अनुवादक, सूचीकार सु.रा. चुनेकर यांनाही 'ग्रंथाली'ची भावांजली. आमच्या विविध प्रकल्पांना नेहमीच त्यांचे मार्गदर्शन मिळत राहिले.

'ग्रंथाली' परिवारातले लेखक यशवंत पाठक काळाच्या पडद्याआड गेले. निरामय वाचनाचे मोल त्यांनी लेखनातून ठसवले. बाहेरचा कोलाहल पचवून, वाचन आत पहायला शिकवते. हा आतला प्रवास सोपा नाही.

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

## कैवल्याची यात्रा

सकाळी उजाडते वेळी धनश्रीचा फोन आला, पाठक आपल्यात नाहीत. दोन मिनिटं काही सुचेना. नंतर गांगलांशी बोललो. माझा 'अंगणातले आभाळ' या पुस्तकाच्या निमित्ताने त्यांच्याशी आलेला संबंध ते आता मी त्यांची शेवटची केलेली तीन पुस्तके- 'कैवल्याची यात्रा', 'चंद्राचा एकांत', 'आनंदाचे आवार' – या काळातील भेटी मनात घोंगावू लागल्या. पहिली आठवण म्हणजे मी पुणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मनमाड येथे कार्यक्रमास गेलो असता, त्यांच्या घरी माझे, बायकोचे व मुलीचे केलेले अगत्यमय स्वागत. त्यानंतर सोनोपंत दाडेकरांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त 'येणे बोधे आम्हा । असो सर्वकाळ' या त्यांच्या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ. त्यासाठी दादर पूर्वेच्या मारुती मंदिरापासून रुईया महाविद्यालयापर्यंत काढलेल्या दिंडीनं आरंभ करून, तीन दिवस व्याख्यानं, भजन, कीर्तन असा वेगळ्या पद्धतीने सोहळा साजरा केला. या पुस्तकाच्या निमित्ताने माझा पंढरपूर येथे आषाढीला पुस्तकविक्री घेऊन जाण्याचा योग आला व त्यानिमित्ताने मला पंढरपूरची वारी घडली. या काळात आमच्या भेटींचं रूपांतर घट्ट मैत्रीत झालं.

१९९३ पासून दरवर्षी मी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनास जायचो. या अधिवेशनाला 'तू यशवंत पाठक यांना घेऊन जा' असं मला श्रीपाद हळबे यांनी सांगितलं. १९९९ सालच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला त्यांचा व माझा एकत्र जाण्याचा योग आला आणि दोघांना एकत्र अमेरिका फिरता आली. या अमेरिकाभेटीत आम्ही नायगरा येथे रात्री गप्पा मारत असताना, पडत असलेल्या पाण्याच्या ध्वनीतून 'ॐ'चा ध्वनी उमटतोय, असं ते म्हणाल्याचं स्मरतं. नंतर आम्ही पुढे लंडनला गेलो. पुढे ते एकटे जर्मनी आणि फ्रान्सला आपल्या अभ्यासासाठी गेले.

यानंतर मी व प्रदीप गुजर यांनी त्यांचं 'पसायदान' हे पुस्तक प्रसिद्ध केलं. त्यानिमित्ताने आम्ही शाळा-शाळांमध्ये त्यांचे कार्यक्रम आयोजित केले. या पुस्तकाच्या १० आवृत्त्या संपल्या. पुढे मी, रामनाथ आंबेरकर आणि अरुण जोशी या तिघांनी मिळून त्यांच्या ५ व्याख्यांनाच्या सीडी प्रसिद्ध केल्या. या सीडीच्यानिमित्ताने त्यांची व्याख्यानं महाराष्ट्रभर आयोजित करावी, असं एकनाथ ठाकूर यांचं म्हणणं होतं. परंतु, ते पूर्ण होऊ शकलं नाही, याची खंत मनात आहे.

शेवटचं, म्हणजे त्यांचं 'चंद्राचे एकांत' हे पुस्तक करत असताना 'सुदेश, तू माझी तिन्ही पुस्तकं एकत्रित प्रसिद्ध केली आहेस. तू यातील एका तरी पुस्तकाला ब्लर्बवरचा मजकूर लिहावा' असं सुचवलं. मी म्हटलं, 'मी काही लेखक नाही. मी बोलतो, ते नीट शब्दांत तुम्ही मांडा आणि त्याखाली तुला योग्य वाटलं तर माझं नाव टाका.' त्यांनी माझं नाव टाकलं हा माझ्यासाठी आश्चर्याचा धक्काच होता. या तीन पुस्तकांचा प्रकाशनसमारंभ मोठ्या गाजावाजात करावा, सलग त्यांची तीन दिवस व्याख्यानं करावी, असं मी आखत होतो. तसं माझं श्रीपाद हळबे यांच्याशी बोलणं झालं होतं. तीन महिन्यांपूर्वी मी नाशिकला योजना शिवानंद यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांच्या घरी या प्रकाशनसमारंभासंदर्भात चर्चाही झाली. मात्र तो विचार पूर्णत्वास जाण्यापूर्वी यशवंत पाठकांनी अज्ञाताच्या दिशेने प्रस्थान केलं. मी मला एका उमद्या व्यक्तिमत्त्वाच्या सहवासास मुकलो.

**– सुदेश हिंगलासपूरकर**

सिद्धहस्त, व्यासंगी लेखक यशवंत पाठक यांचे लेखन रसाळ, लालित्यपूर्ण आणि वाचकांना मोहवणारे होते. लोकसंस्कृतीचे हे संचित चिरकाल वाचकांच्या स्मरणात राहील. 'ग्रंथाली' परिवारातील पाठक यांच्या या प्रेमळ आठवणी!

♦ ♦ ♦

# पल्याडची ओढ जागवणारा 'यशवंत'

**दिनकर गांगल**

♦ ♦ ♦

**य**शवंत पाठक मनमाडहून पंचवटी एक्स्प्रेसने यायचा, बोरीबंदरला उतरायचा, ते थेट 'मटा'त पोचायचा. मी तेथे असायचोच, मग त्याच्या गप्पा सुरू होत. तो मनमाडच्या कॉलेजमध्ये शिकवत असे, तेवढाच उत्साह त्याला व्याख्यानांत, गप्पांत असे. त्याचा नाशिक हा अड्डा. तेथे नाना तऱ्हेच्या हकिगती त्याला कळलेल्या असत. आम्ही दुपारी लंचच्या बेताला एंपायर रेस्टॉरंटमध्ये जात असू. पण यशवंतला ना तेथील चहा-केकमध्ये रस वाटे ना अन्य कशात! नॉनव्हेज तर त्याला वर्ज्यच होते. त्यामुळे तेथील प्रसिद्ध कटलेट-ग्रेव्ही आम्ही घेतलेली त्याला (मनापासून) आवडत नसे, पण त्याच्या गप्पा मनोरंजक असत. तो विविध बेत मनात घेऊन मुंबईला आलेला असे. आम्हीदेखील 'मटा'साठी विविध विषय गावाकडून मिळावे या खटपटीत असू. यशवंतच्या त्या माहितीची मदत होई. त्याने धुंडामहाराज देगलूरकर यांच्यावर 'मटा'साठी ('लोकप्रियतेच्या लाटेवर' सदरात) लेख लिहिला आणि आणखी अनेक. आमची भेट झाल्यानंतर तेथून त्याला 'सत्यकथे'च्या ऑफिसात राम पटवर्धन यांना भेटण्यास वा तत्सम भेटीगाठींसाठी जायचे असे. गिरगाव त्यावेळी मराठी साहित्यसंस्कृतीचा अड्डा होता. यशवंत अशा लेखा लेखातून प्रकट व विकसित होत गेला.


यशवंत पाठक हा उत्साही लेखक होता; आर्जवीही होता. त्याच्याकडे व्यक्त करण्यासारखे अनुभवाचे आणि अभ्यासाचे भांडारही मोठे होते. त्याचे लेखन सिद्धहस्त होते आणि ते लालित्याने ओतप्रोत भरलेले असे. त्याच्याकडे कीर्तनकाराचा रसाळपणा आणि प्रवचनकाराची प्रबोधकता अशा दोन्ही गोष्टी होत्या. त्यामुळे त्याचे लेखन-भाषण (व्याख्यान) बोजड होत नसे, तर मोहक होई. त्यातून लडिवाळपणा प्रकट होई आणि लोकांना मूल्यसंस्कार लाभल्याचा आनंद मिळे.

यशवंतने भरपूर लिहिले, तितकीच भाषणे दिली. त्याला मोठी लोकप्रियता होती. त्याला पुरस्कार-सन्मान यथास्थित लाभले. त्याने घरसंसारदेखील उत्तम केला. सोज्वळ, सात्त्विक, त्याच्या स्वत:च्या प्रकृतीस शोभेल अशी पत्नी- दोन कर्तबगार मुली अक्षरा व प्रणिता - जावई, नातवंडे... तो स्वत: नाशिकला राही, एक मुलगी पुण्याला, दुसरी ठाण्याला, असा त्या तिघांचा रहिवासदेखील सहज संपर्कातील होता. हल्ली कुटुंबे मुलगा ॲडलेडला, मुलगी बंगलोरला अशी काहीतरी तिरपागडी पसरलेली असतात आणि त्यामुळे नात्याच्या पातळीवर तिन्ही ठिकाणी काळजी असते. यशवंतचे नाशिक-ठाणे-पुणे पट्ट्यात सारे काही आनंदात चालले होते. पण दोन आठवड्यांपूर्वी एका पहाटे अचानक त्याच्या छातीत कळ आली, त्या पाठोपाठ अस्वस्थता... डॉक्टरांना बोलावले गेले, पण ते येण्यापूर्वीच यशवंतची प्राणज्योत मालवली होती. हृदयविकाराने आलेले विविध मृत्यू निरखले तरी तो झटका आकस्मिक कशामुळे येतो याचा काही उलगडा होत नाही. हार्ट ॲटॅकची भीती मनात सतत राहते. कोणाला कसला ताण असतो ते कळत नाही. कधी कधी, ताणामुळेच हार्ट ॲटॅक येतो का असेही मनात येते. त्यामुळे त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय मनाच्या समाधानापुरतेच उरतात. यशवंतचे वय त्र्याहत्तर होते, ते काही सद्यकाळात मृत्यूचे वय नाही. त्याच्या ललित लेखनाची तीन



पुस्तके 'ग्रंथाली'कडून दोन महिन्यांपूर्वीच प्रसिद्ध झाली होती. त्यांच्या प्रकाशनसमारंभाचा बेत चालला होता. शिवाय त्याच्या हाती अभ्यास प्रकल्प होते. त्यामुळे त्याच्या आकस्मिक मृत्यूचा धक्का जोरदार बसला आणि नंतर त्याबद्दल चुटपुट लागून राहिली आहे.

त्याच्या माझ्या भेटी व स्नेहबंध 'मटा'च्या टेबलवरच दृढ होत गेले. पुढे तर, काही काळ, तो कुटुंबाचा भाग असल्यासारखा वागे-बोले. प्रत्यक्षात त्याचे घरी येणे कमी होई. पण तो जिव्हाळा हा त्याच्या स्वभावाचा भाग होता. तो एम. ए. झाला होता आणि त्याची पीएच डी व्हायची होती. त्याने त्यासाठी विषय तो ज्या संस्कारात वाढला त्या कीर्तनकलेसंबंधातील घेतला होता. स्वाभाविकच, त्याचे काम सोपे होते. पण तो मनमाड-नाशिक-आळंदी-पंढरपूर अशा ठिकाणी जाऊन एकेक दुवा कसोशीने जमा करत होता. आमचा इकडे मुंबईत नोकरीपलीकडे 'ग्रंथाली'चा खटाटोप चालू होता. तो त्या कामातही आस्थेने सहभागी होई. दलित आत्मकथने प्रसिद्ध करण्याचे दिवस होते ते! 'बलुतं', 'उपरा' यांचा डंका सर्वत्र वाजत होता. यशवंत ब्राह्मण कुटुंबातील, त्याचे वडील गौतमबुवा पाठक प्रसिद्ध कीर्तनकार. पण त्या काळात सर्व समाजाला कष्टाचे आणि अभावाचे दिवस भोगावे लागत होते. तीच गरिबी यशवंतच्या कुटुंबाच्या वाट्याला आली होती. त्याच्या बोलण्यात नाशिकच्या गोदाकाठी राहण्याचे, त्याच्या लहानपणी वडील कीर्तनासाठी गावोगावी गेल्याचे, कधी त्याने वडिलांना तबल्यावर साथ केल्याचे संदर्भ येत. यशवंत तशा परिस्थितीत शिकला. कॉलेजमध्ये जायचे म्हणजे ऐटीत, छानछोकीत राहायचे. विद्यार्थी म्हणून त्याला तेथे त्याच्या कीर्तनवृत्तीची, त्यातील जुनाटपणाची, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडींची, गरिबीची लाज वाटे. पण त्याला पीएच्.डी.चा विषय निवडताना कीर्तनकाराच्या घरातील संगोपन, त्यातून प्राप्त झालेले लोकसंस्कृतीचे धन हे सारे उपयोगी वाटले. त्या पार्श्वभूमीमुळे त्याचा पीएच्.डी.चा अभ्यास सोपा झाला. जीवनाच्या त्या विसंगतीत नाट्य होते. तो जुन्यातील मागासपणा आणि आधुनिकतेतील ओढ यांचा विचित्र ताण होता. त्याने ज्या वृत्तीचा धिक्कार केला तेच त्याचे 'संचित' बनले. ती सांस्कृतिक दृष्ट्या मोठीच कहाणी होती. आम्हाला त्याच्या त्या कहाणीतून साऱ्या निम्न मध्यमवर्गाचे दुःख व नॉस्टॅल्जिया हेही प्रातिनिधिक रीत्या व्यक्त होते असे वाटले. तशा चर्चांमधून आम्ही त्याला 'अंगणातले आभाळ' हे आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त केले. त्याने ते भलेमोठे लिहिले, आम्ही ते संपादन करून प्रकाशितही झाले. 'ग्रंथाली'च्या दृष्टीने 'अंगणातले आभाळ'ला वेगळे मोल आहे, ते आमच्या वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचे. आम्ही दलित लेखनाचा सामाजिक दृष्ट्या विचार मांडला होता, तशाच प्रकारचे सामाजिक महत्त्व सवर्ण (ब्राह्मण) समाजातील दारिद्र्याला, पिळवणुकीला, शोषणाला आहे, हे त्यामुळे प्रकट झाले होते. समाजांतर्गत विषमतेला त्यामुळे तोंड फुटत होते. 'अंगणातले आभाळ' लोकप्रिय खूप झाले, परंतु त्याचा समाजशास्त्रीय अभ्यास



डॉ. यशवंत पाठक

मांडला गेला नाही. यशवंतचा लौकिक चहू बाजूंला पसरला. त्याने त्यानंतर अनेकानेक पुस्तके लिहिली. ती मुख्यतः 'ग्रंथाली'नेच प्रकाशित केली आहेत, 'कॉण्टिनेण्टल'ने त्याचा पीएच्.डी.चा प्रबंध छापला. 'मौजे'ने त्याची दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत.

यशवंतची स्वतःची रसाळ लेखन व संवादशैली होती. तो स्वाभाविकच संतसाहित्यात फार रमे. त्याची अभ्यासाची बाजू व वारकरी संप्रदायातील वावर यामुळे त्याच्या लेखन-भाषणांना संपृक्तता येत गेली. त्याला शब्द अफलातून सुचत असत. मात्र ते फेकता-फेकता, त्याच्या एकूण प्रतिपादनातील अर्थ तर हरवत नाही ना याची तो दक्षता घेत असे. दादरच्या नेरूरकर वकिलांनी इंद्र या संकल्पनेवर अभ्यासपूर्ण व ससंदर्भ पुस्तक लिहिले होते. मी यशवंतला त्या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ येण्याची गळ घातली. यशवंतच्या अभ्यासातील पुराणे हा विषय नव्हता, पण त्याने 'इंद्र' या अपूर्व संकल्पनेचा अर्थ मांडता-मांडता स्वर्गातील सारी प्रभावळ उभी केली. शेकडो इंद्रांच्या कहाण्या सांगितल्या आणि स्वर्गलोकीचे राज्य भौतिक सृष्टीत आणून ठेवले. त्याने स्वर्ग व त्यातील इंद्राचे स्थान ही तत्त्वज्ञानाधिष्ठित कविकल्पना आहे हे ठासून सांगितले. त्याच्या वाणीतील ती रसाळता त्याला कोठल्या कोठे घेऊन जाई! तो लेखन-भाषणात हरवून जात असे. आम्ही ठाण्याच्या एका शाळेच्या अमृत महोत्सवात एका बाजूला तो व समोर कलेतील आधुनिकता जाणणारा षांताराम पवार असे वक्ते योजले होते. यशवंत व षांताराम अगदी भिन्न प्रकृतीचे, भिन्न अभ्यासाचे वक्ते. दोघे त्यांच्या विषयात तल्लीन. दोघे शिक्षणाच्या अंगाने बोलले. दोघांचे अगदी वेगवेगळे अनुभव. त्यांची जी काही जुगलबंदी जुळली ती अवर्णनीयच! यशवंतच्या कीर्तनशैलीच्या भाषणाच्या ओढीने आलेल्या श्रोतृ महिला मात्र हिरमुसल्या. त्या समारंभानंतर त्या महिला किती तरी वेळ यशवंतभोवती कोंडाळे करून त्याच्या गप्पा ऐकत होत्या! तो महिला वर्गात विशेष प्रिय होताच. त्याच्या हरिकथा त्यांना लुभावत. तो मनाने धार्मिक-भाविक वृत्तीचा होता. त्याला भारतीय संस्कृतीतील 'सु' ही कल्पना (सुशील, सुपुत्र, सुविचार...) मोहक वाटे आणि तशा गोष्टी संस्कारशील वृत्तीने जपल्या गेल्या पाहिजेत असा त्याचा आग्रह असे.

तो आमच्या एका मित्राच्या अर्थसहाय्याने इंग्लंड-अमेरिकेचा दौरा करून आला. आमचे बुद्धिवादी मन आणि त्याचे भाविक मन यांचे वादसंवाद वारंवार होत असतच. त्याने त्या दौऱ्यात विशेषतः इंग्लंडमधील चर्चना मुद्दाम भेटी दिल्या. तेथे त्याला ख्रिश्चन धर्मातील 'करूणा' तत्त्वाचा प्रत्यय आला. त्याने परतल्यानंतर त्यासंबंधीचा लेख लिहिला. त्यात तशी 'करूणा' भारतीय संस्कृतीत प्रत्ययाला येत नाही हे नमूद केले. पण त्याचे लेखन व्यक्तिनिष्ठ असे. त्यास वस्तुनिष्ठेचा क्वचित केव्हा स्पर्श होई, तो आमच्या सहवासात.

एकूण महाराष्ट्र, पण नाशिककर विशेषच कुसुमाग्रजांच्या प्रेमात इतके असतात, की आम्ही त्याना त्यांचे 'हनुमंत'च म्हणतो.

म्हणजे त्यांची हृदये फाडली तर तेथे कुसुमाग्रज दिसणार! यशवंत तसाच. कुसुमाग्रजांनी त्यांना ज्ञानपीठ मिळाल्यावर एका वर्षी, काही निमित्ताने चार-पाच विविध भाषी ज्ञानपीठ विजेत्यांना नाशिकला दोन दिवस मुक्कामाला बोलावले. त्यावेळी यशवंतवर जबाबदारी के. शिवराम कारंत यांच्याबरोबर सतत राहण्याची होती. तो कार्यक्रम संपल्यावर आमची जेव्हा भेट झाली तेव्हा यशवंतने मोकळेपणाने कबूल केले, की कन्नड साहित्यिक जीवन तत्त्वज्ञानाच्या अंगाने मराठी साहित्यिकांपेक्षा खूप सखोल व ज्ञानी असतात. आलेली ती सर्व मंडळी ज्ञानी होती. त्यांच्यापुढे मराठी साहित्य व साहित्यिक अभ्यासदृष्ट्या खुजेच वाटतात. यशवंतने हे विधान वस्तुनिष्ठ विचाराने केले, परंतु त्याच्या मनाचा कल तसा नव्हता. त्यामुळे त्याला तोपर्यंत असलेला मोठमोठ्या मराठी साहित्यिकांबद्दलचा आदर कमी झाला नाही. तो स्वत: लेखक असून दुसऱ्या लेखनाबद्दल मनात आदरभाव बाळगणे हे तसे अवघडच असते, पण यशवंत ते व तशा प्रकारची मूल्ये भाविकतेने जपत जगला.

यशवंतचे व्यक्तिगत जिव्हाळ्याचे प्रसंग तर अनेक आहेत. तो 'ग्रंथाली'च्या यात्रांमध्ये व कार्यक्रमांत समरसतेने सहभागी होई. त्याने १९८२ च्या ग्रंथयात्रेत प्राचार्य म.सु. पाटील यांच्या सहकार्याने कॉलेजमार्फत यात्रेकरूंची राहण्या-जेवण्याची सर्व तजवीज केली होती. मनमाडला पाण्याचे कायम दुर्भिक्ष. तशा परिस्थितीतदेखील आम्हा पंचवीस-तीस मंडळींची उत्तम सोय झाली. त्यासाठी पाण्याच्या मोठमोठ्या टाक्या मांडल्या होत्या आणि जेवणाचा बेत तर भाकरी-वांग्याची भाजी व लोणी असा फर्मास केला होता! यात्रेच्या वीस दिवसांतील मोजकी जेवणे लक्षात राहून गेली आहेत. त्यातील एक मनमाडचे होते. यशवंतने तेथील कार्यक्रमही छान जुळवून आणले होते. स्थानिकांची तयारी करून घेतली होती. तो नंतरच्या 'ग्रंथमोहोळ' व अन्य उपक्रमांत ठिकठिकाणी येऊन गेला. तो कित्येक वर्षे, २५ डिसेंबरच्या वाचकदिनी मुंबईला येई व कार्यक्रमांवर त्याची रसपूर्ण टिकाटिप्पणी करे. त्याने आमच्या मुलीच्या लग्नात छान चकवलेन. अहेर न घेण्याची पद्धत तेव्हा सुरू झाली होती. त्याने नाशिकहून येऊन हळूच चांदीचा करंडा माझ्या पत्नीच्या हातात ठेवलान. म्हणाला, 'आईने पाठवलाय.' कोणती भारतीय स्त्री कुंकवाचा करंडा, तोही आईने पाठवलेला नाकारू शकेल?

त्याच्या लेखना-भाषणांतून-व्याख्यानांतून भारतीय संस्कृती-तत्त्वज्ञानाचा आध्यात्मिक गाभा सुगमरित्या, बऱ्याच वेळा कहाणीरूपाने प्रकट होई. त्या प्रकारच्या लेखनाची गरजच ही असते, की वाचक त्याच्याशी एकात्म झाला पाहिजे. त्यासाठी लेखन सुबोध हवे, रसपूर्ण हवे, त्यात 'पल्याडची ओढ' लागेल अशी गूढताही हवी. ते सारे गुण यशवंतच्या लेखन व संभाषणशैलीत होते. त्याला कौटुंबिक संस्कार व नाशिकचा पावन परिसर तसाच आयुष्यभर लाभला. त्याचे त्या परिसरातील लेखन अनुभवरूपाने 'अंगणातले आभाळ'मध्ये प्रकटले, परंतु ते त्याने सघनरित्या व अधिक अर्थपूर्णतेने 'ब्रह्मगिरीची सावली', 'नक्षत्रांची नाती' यांसारख्या पुस्तकांतून मांडले. त्यांतील प्रत्येक लेख म्हणजे एकेका अनुभवाचे सार आहे. कुंभमेळा, त्यातील साधू, त्यांचे आखाडे - त्यांची विक्षिप्त जीवनशैली... सारे सारे यशवंतने रसरसून अनुभवले, त्यातील ज्ञानकण वेचले आणि तितक्याच उत्कटतेने मांडले. त्याचे 'ब्रह्मगिरीची सावली' हे तर माझ्या लेखी कोरले गेलेले पुस्तक आहे. त्या पुस्तकातून भारतीय अध्यात्माची व सनातन संस्कृतीची जाण होत जाते.

तो एकदा कुमार गंधर्वांना घेऊन, त्यांना काही धुना ऐकवण्यासाठी एका साधूच्या आखाड्यात गेला होता. कुमारांनी त्या साधूकडे कशा विविध विचारणा केल्या व तो साधू त्यांचे निरसन करू शकला हे वर्णन ग्राफिकरित्या सांगत असे. अशी अनेक मोठमोठी माणसे त्याला भेटत. त्याचेही शिक्षण-प्रशिक्षण त्या ओघात होत जाई. ती सर्व सघनता त्याच्या व्यक्तिमत्त्वाला येत गेली. ते त्याचे लेखन म्हणजे मोठा तत्त्वज्ञानपर आधार वाटतो. मी स्वत: तो अनुभवला आहे. माझा मोठा भाऊ वारल्याचा फोन ऑफिसात पुण्याहून आला. मी तसाच डेक्कन क्वीनने निघालो. समोर टेबलवर यशवंतचे पुस्तक होते. ते प्रवासभर वाचत होतो. मला माझ्या त्यावेळच्या खिन्न मनस्थितीत यशवंतच्या पुस्तकाने मोठा धीर दिला. त्याचे पुस्तक म्हणजे मला सोबतच झाली!

त्याची निवृत्तीनंतर पुणे विद्यापीठात ज्ञानेश्वर अध्यासनाचा प्रमुख म्हणून सुयोग्य ठिकाणी नेमणूक झाली. ती त्याची पाच-सात वर्षे फार मजेत व सुखासमाधानात गेली. त्याला नाशिकच्या पुढचा, वेगळा विद्वतपरिसर लाभला होता. विद्यापीठ पातळीवरील विचारणा व अपेक्षा याही वेगळ्या, अधिक शोधक बुद्धीच्या असतात. तो भाषणांना तर साऱ्या महाराष्ट्रात, सर्वत्र हौसेने जाई. त्याचा वक्ता म्हणून लौकीक वाढत असतानाच्या काळात शिवाजीराव भोसले, राम शेवाळकर, चंद्रशेखर धर्माधिकारी हे तुफान लोकप्रिय वक्ते होते. एका साप्ताहिकाने त्यांची व्याख्यानविशेषता, कौशल्ये असे फीचर केले. त्यात त्यांचे मानधनाचे आकडेही नमूद केले होते. त्यात उभरते वक्ते म्हणून यशवंतचे नावदेखील होते. पण त्या पुढील काळात सगळी जीवनपद्धत बदलली. लेखक-वक्ते अधिक प्रोफेशनल झाले. त्यामुळे यशवंतचा लौकिक वाढत गेला, पण त्याला ते वलय प्राप्त झाले नाही. भारतीय संस्कृतीक्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या सर्वांनाच एकोणिसशे नव्वदीनंतरच्या काळात त्या ताणाला सामोरे जावे लागले आहे - एकतर संतसाहित्य-अध्यात्म यांचा मठ निर्माण करून त्या तथाकथित अलौकिकात रमून राहायचे, अथवा जुन्यानव्याचा संघर्ष साहत जायचे. माझा व यशवंतचा सहवास गेली वीस वर्षे फार नव्हता. तो एक मान्यताप्राप्त लेखक-वक्ता प्राध्यापक होऊन गेला होता. त्याचा संतसाहित्याचा व्यासंग चालूच होता. त्याच्याशी बोलणे दोन महिन्यांपूर्वी झाले, ते मी नाशिकला जाणार होतो, म्हणून. पण त्यावेळी भेट मात्र झाली नाही. विविध पातळ्यांवर अशी चुकामुक होत असते. तेच जीवन असते.

**- दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

**अरुण ठाकूर यांच्या अकाली निर्वाणानंतर आपला मित्र गमावल्याचं दु:ख अनेकांना झालं. आनंदनिकेतनच्या विद्यार्थ्यांचा हा जिवलग दोस्त शिक्षणक्षेत्र आणि सामाजिक चळवळींमधला अग्रणी होय!**

♦ ♦ ♦


# आमचे अरुणदादा

**दीपा पळशीकर**

♦ ♦ ♦

अरुणदादांची सगळ्यात पहिली ओळख म्हणजे ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते अशी होती. 'आनंदनिकेतनच्या जन्मानंतर मात्र 'आनंदनिकेतन'चे संस्थापक, आनंदनिकेतनमधले इतिहासाचे शिक्षक, मराठी शाळा टिकवण्याच्या लढ्यातील बिनीचा शिलेदार, टीचर या पुस्तकाचे भाषांतरकार अशाच पद्धतीने अनेक प्रकारे त्यांची ओळख करून देता येईल. अनेक सामाजिक चळवळींशी जोडलेले अरुणदादा मूळचे नाशिकचे. तीन बहिणींच्या पाठीवरचे कुटुंबातील शेंडेफळ. त्यांच्या वडिलांचे निधन लवकर झाले, त्यानंतर त्यांच्या आईने धीराने आणि मोठा संघर्ष करून आपल्या मुलांना वाढवले. महाविद्यालयीन वयात अरुणदादांचा संबंध सेवादलाशी आला. लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही मूल्ये त्यांच्या मनात रूजली. सेवादलात कार्यकर्ता म्हणून घडताना त्यांनी अनेक चळवळींमधून भाग घेतला. मराठवाडा विद्यापीठाचा नामांतर आंदोलनात त्यांनी तुरुंगवासही पत्करला. अनेक समविचारी मित्र जोडले गेले. दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरीही सुरू झाली. समाजात परिवर्तन व्हायचं असेल तर तरुणांना हाताशी धरूनच हे काम होऊ शकेल अशी त्यांना खात्री होती त्यामुळे समता आंदोलनाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या विचारांना नेमकी दिशा देणे, त्यांची वैचारिक बैठक पक्की करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. त्यांच्या तालमीत तयार झालेले कार्यकर्ते आजही सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय आहेत. परित्यक्त्यांच्या समस्या आणि सफाई कामगारांच्या प्रश्नावर त्यांनी आवाज उठवला. सफाई कामगारांच्या प्रश्नावर शास्त्रशुद्ध सर्वेक्षण करून 'नरक सफाईची गोष्ट', या पुस्तकातून त्यांचे जीवन जगासामोर आणले. जिथे-जिथे व्यवस्थेकडून अन्याय होताना दिसला तिथे-तिथे त्यांनी आवाज उठवला. त्यामुळे शिक्षणाच्या प्रश्नातही त्यांना लक्ष घालावेसे वाटले. एखाद्या प्रश्नाला भिडले की त्याची तड लागेपर्यंत विवेकनिष्ठ कृती करण्याच्या त्यांचा स्वभावच होता. 'लोकशाही', 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' ही त्यांच्या आयुष्याची त्रिसुत्री होती. या मूल्यांवरची त्यांची निष्ठा अढळ होती. त्यामुळेच त्यांच्याभोवताली कायम कार्यकर्त्यांचा गराडा असे. त्यांच्या संपूर्ण सामाजिक कारकिर्दीतून आपल्याला हेच समजतं की त्यांची एक छोटीशीच अपेक्षा होती समाजाकडून...... ''माणसाने माणसाशी माणसासम वागणे!''

आनंदनिकेतन सुरू करतानाही हीच अपेक्षा मनात होती. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मुलांची होणारी कुचंबणा, प्रस्थापित मराठी शाळांमधली एका वर्गात असणारी भरमसाठ विद्यार्थीसंख्या, परीक्षेतील गुणांना आलेले अवास्तव महत्त्व आणि त्यात मारली जाणारी मुलांची सृजनशीलता आणि कल्पनाशक्ती ही परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करणाऱ्या गटाचं म्होरकेपण आपसूकच अरुणदादांकडे आलं! गटाला वैचारिक बैठक पुरवण्यामागे त्यांचं योगदान अतिशय महत्त्वाचं होतं. प्रयोगशीलतेचा अर्थ केवळ विषय शिकवण्याच्या विविध पद्धती असा सीमित न राहता विचारी, विज्ञाननिष्ठ, चांगला माणूस घडवणे आणि त्यातून चांगला समाज घडवण्यासाठी समाज आणि जीवनाशी जोडलेले शिक्षण असे



व्यापक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सुरू झालेले आनंदनिकेतन हा एक महत्त्वाचा सिद्ध झालेला शैक्षणिक प्रयोग आहे.

आनंदनिकेतन सुरू झाले तेव्हा आमच्याकडे कुठलाही आर्थिक आधार नव्हता. विनोदिनीताईंच्या हिंमतीला अरुणदादांचे भक्कम पाठबळ लाभले आणि हळूहळू विद्यार्थीसंख्या वाढत गेली, शाळा बहरत गेली. शाळा सुरू ठेवणे सोपे असते. मात्र शाळा ज्या उद्दिष्टांसाठी उभारली ती काळाच्या ओघात आणि समाजाच्या रेट्यात टिकवून ठेवणे खूप अवघड असते. प्रत्येक वर्गात सर्व धर्म, जाती, आर्थिक गटातील मुले असतील. शाळेची फी सामान्यांना परवडेल इतकी माफक असेल, ज्यांना तीसुद्धा परवडणार नाही त्यांच्यासाठी आपण स्पॉन्सर शोधू पण त्यांना पैशासाठी प्रवेश नाकारणार नाही, शाळेत कोणत्याही धर्माची शिकवण दिली जाणार नाही आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. सरकारचे अनुदान घेणार नाही. शाळेचे माध्यम परिसरभाषाच असेल. शाळेतील शिक्षण हे जीवनाशी जोडलेले असेल ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून १९९८ साली शाळेला सुरुवात झाली. एका छोट्याशा जागेत सुरुवात ते आज स्वत:ची परिपूर्ण छोटेखानी इमारत हा प्रवास खचितच सोपा नव्हता. या एकवीस वर्षांच्या शाळेच्या कारकिर्दीत शाळेने आपले वेगळेपण, प्रयोगशीलपण जपले, वाढवले, इतरांमध्ये रुजवले यात अरुणदादांचे योगदान महत्त्वाचे आहे.

अरुणदादांचा शाळेतील वावर हा सहज, अभिनिवेशरहित असा होता. आपण सगळीकडे पाहतो तशी संस्थाचालकांची मग्रूरी, ताठा त्यांच्यामध्ये नव्हता. त्यांनी स्वत:च्या वागण्यातूनच शाळेत जी कार्यसंस्कृती (work culture) दिसते तिची रुजुवात केली. शाळेत कुठल्याही प्रकारची अधिकारांची उतरंड नाही. मुख्याध्यापकांची, संस्थाचालकांची वेगळी खोली नाही. दिखाऊ आदर आणि शिस्त याला शाळेत थारा नाही. सरकारी नोकरीत राहूनही अरुणदादा अशाप्रकारे वागू शकले कारण लोकशाही आणि स्वातंत्र्य या मूल्यांवरची त्यांची अढळ निष्ठा! कुठल्याही व्यवस्थेचा स्वातंत्र्य हा प्राण असतो यावरचा ठाम विश्वास!

अरुणदादांचं नेहमी सगळ्यांना सांगणं असायचं की, ‘सेवा आणि निष्ठा ही सरंजामशाहीची मूल्ये आहेत, ती कालबाह्य झाली आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये मागे पडून या माहिती विस्फोटाच्या या काळात सत्य, प्रेम आणि अहिंसा ही मूल्येच आपल्याला स्वीकारावी लागतील.’ त्यामुळे इतिहास हा विषय शिकवतानाही त्यांची संपूर्ण मांडणी याच अंगाने असायची. मुलांना समजेल अशा भाषेत सहज संवाद त्यांना साधता येत असे. समकालीन घटनांना जोडून इतिहास सांगणे त्यांना महत्त्वाचे वाटे. हसत खेळत, नर्मविनोदी खुसखुशीत शैलीत मुलांशी बोलणारे अरुणदादा हा एक विशेष अनुभव होता. ऐतिहासिक संदर्भांचा खजिनाच त्यांच्याकडे होता. इतिहासातील एखादी घटना स्थानिक आणि जागतिक परिप्रेक्ष्यातून बघण्याची सवय सर्वांनीच लावून घ्यावी असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी मुलांना वेगवेगळे चित्रपट दाखवणे, लेख वाचून दाखवणे, नाशिकला कोणी सामाजिक कार्य



अरुण ठाकूर

कारणारी व्यक्ती आली की त्यांना शाळेत बोलावून त्यांच्याशी गप्पा मारण्यासाठी त्यांना शाळेत बोलवणे असे अनेक प्रयत्न अरुणदादा करत असत. अनिल अवचट, मेधा पाटकरांपासून डॉ. कोल्हेंपर्यंत सर्वांशी मुलांना बोलायला मिळाले. अरुणदादा सातवीपासून इतिहास विषय शिकवत असल्याने सहावीपासूनच मुले वाट बघत असत, आपण कधी सातवीत जातो आणि अरुणदादा आपल्याला शिकवायला येतात!

मुलांना सगळ्या बाबतीत स्वातंत्र्य द्यावे असे त्याचे ठाम मत होते. अगदी गणवेशही नको, असे त्यांना वाटत असे. व्यावहारिक अडचणींमुळे इयत्ता नववीचा रात्रनिवास बंद करावा का याची चर्चा होत असताना त्यांच्या चेहऱ्यावरील अस्वस्थता अगदी स्पष्ट दिसत होती. स्वंयशिस्तीबद्दल मुलांशी ते वारंवार संवाद साधत असत. त्यांच्या अकाली निर्वाणानंतर आपल्याला समजून घेणारा, ज्याच्याकडे आपण हट्ट करू शकू असा आपला एक दोस्त गमावल्याचे दु:ख सर्वच मुलांना झाले आहे.

केवळ मुलांशीच नव्हे तर आपल्या सहकार्यांशीही त्यांचं नातं अत्यंत खास होतं. खरं तर ते आम्हा चाळीस शिक्षिकांमध्ये एकमेव शिक्षक होते. पण स्टाफरूममध्ये आम्हाला त्यांचं असणं कधीच अवघड वाटलं नाही. आपली जिवाभावाची मैत्रीण असावी असाच त्यांचा वावर असे. अगदी सहजपणे ते आमच्यात सामावले होते. इतकंच नव्हे तर प्रत्येकीशी एक विशेष नातंही त्यांनी जपलं होतं. वर्गातील चर्चा कधी आरक्षण, राखीव जागा, गांधीजींविषयीचे गैरसमज अशा विषयांवर गेली तर अरुणदादांबरोबर आता पुढची चर्चा करा, असं सांगून आम्ही निर्धास्त होत होतो. शाळाप्रवेशाबाबतचे धोरण, सण-समारंभ शाळेत साजरे करण्याबाबतचे धोरण अशा अनेक चर्चांमधून अरुणदादांनी शाळेतील आम्हा शिक्षकांचीही वैचारिक बैठक पक्की करण्याचा प्रयत्न

सातत्याने केला. आमचे सामाजिक भान वाढावे म्हणून ते सतत चर्चा करत कोणाचेही अंधभक्त होऊ नका स्वत: विचार करुन वागा हे समजावत. ताईंप्रमाणेच मुलांचीही विचारशक्ती जागृत ठेवण्यासाठी त्यांची धडपड होती. अर्थात या सर्व चर्चा अतिशय सौम्य शब्दात, खेळीमेळीच्या मैत्रीपूर्ण वातावरणातच झाल्या. त्यामुळे शाळेतील वातावरण नेहमीच आनंदी आणि उत्साही राहिले. सर्वांना आपलेसे करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे ते ताईंपासून मुलांपर्यंत सर्वांचे लाडके झाले होते. शाळेतल्याच नाही तर आपल्या वैयक्तिक शंका, अडचणींसाठी कोणीही त्याच्याशी सहजपणे बोलू शकायचे.

शाळेच्या शिक्षण संकल्पनेच्या प्रसारासाठी त्यांनी अनेक लेख लिहिले, व्याख्याने दिली. शिक्षणविषयक चांगल्या पुस्तकांचे अनुवाद केले. सरकारच्या चुकीच्या शैक्षणिक धोरणांविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी अनुवाद केलेल्या 'टीचर' या जगप्रसिद्ध पुस्तकामुळे महाराष्ट्रभरातील शिक्षकांमध्ये त्यांची ओळख निर्माण झाली. मराठी शाळांच्या आंदोलनामुळे ती अजून व्यापक बनली. जेव्हा सरकारने मराठी शाळांना मान्यता देणेच बंद केले तेव्हा महाराष्ट्रातील सरकारी अनुदान नको असणाऱ्या अनेक शाळांनी एकत्र येऊन मान्यतेसाठी मोठा लढा उभारला. या लढ्याच्या नेतृत्वाच्या गटात अरुणदादा अग्रस्थानी होते. यासाठी त्यांनी आझाद मैदानात उपोषणही केले आणि सरकारला या सर्व शाळांना मान्यता द्यायला भाग पाडले.

आनंदनिकेतनचा शिक्षणविचार सर्वदूर पसरणे त्यांना महत्त्वाचे वाटे. त्यामुळे ते स्वत:ही याबद्दल लेखन करत असत आणि आम्हा शिक्षकांनाही वेळोवेळी लिहिण्यासाठी प्रोत्साहित करत. टीचर हे त्यांनी अनुवादित केलेले पुस्तक हे महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रात एक महत्त्वाचे संदर्भपुस्तक बनले आहे. शाळेची आणखी एक शाखा काढा, असे सुचवणाऱ्यांना ते म्हणत की, 'शाळा मोठी करून, विस्तार करुन साम्राज्य उभारण्यापेक्षा प्रत्येकाने आपापल्या परिसराचा विचार करुन आपल्या गरजांप्रमाणे जीवनाचे शिक्षण देणारी शाळा उभारली पाहिजे. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य आम्ही करू.'

असे हे आमचे अरुणदादा! त्यांच्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच! त्यांच्या अशा अकस्मात निधनाने आनंदनिकेतन परिवार सुन्न झाला आहे. पण त्यांनी आखलेल्या मार्गावरून पुढे जाण्याची उमेद मात्र शाबूत आहे. त्यांची जागा भरून काढणे अशक्य आहे. आज शरीराने आपल्यात ते नसले तरी त्यांच्या चैतन्याची, विचारांची बीजे आमच्या सर्वांमध्ये, आमच्या विद्यार्थ्यांमध्ये झिरपली आहेत. त्यांचे विचार पुढे घेऊन जाण्याचा, त्यांच्या स्वप्नातील समाज निर्माण करण्याचा आम्ही निर्धार केला आहे. त्यामुळे आमच्यामध्ये अरुणदादा जिवंतच राहणार आहे.

**– दीपा पळशीकर**
भ्रमणध्वनी : ९४०३७७४८०५
anandniketan98@gmail.com

॥ग्रंथाली॥

## अरुण शेवते संपादित पुस्तके


**स्वप्नपूर्ती**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

एखादं बीज आपल्या मनात निर्माण होतं, त्या बीजाचं रूपांतर सुंदर जाणिवेत होतं, ती जाणीव जगण्याला बळ देते. आपण जगत असताना, विचार करत असताना भावनांचं बीज आपल्या मनात रुजत जातं. पुढे ते बीज वाढता, वाढता आपलं आयुष्यही वाढवतं. त्यातूनच स्वप्न निर्माण होतात. आणि स्वप्नांची पूर्तताही होते. मेघना गुलजार, डॉ. पी.डी. पाटील, दीपिका पडुकोण, गुलजार, गिरीश कुबेर, जनार्दन वाघमारे, नागराज मंजुळे, तात्यासाहेब आर. ओ. पाटील, नीळकंठराव जगदाळे, हेरंब कुलकर्णी, केदार वैद्य, जयंती कठाळे, कल्पना दुधाळ या नामवंतांनी आपल्या प्रवासाचा पट उलगडून दाखवला आहे.

**तो कधी एकटा नसतो**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

कलावंताच्या मनात एखादं बीज निर्माण होतं, तेव्हा तो कधी एकटा नसतो, तर आपल्या अवतीभवतीचा भवताल त्याच्याजवळ असतो. त्यातूनच तो घडत असतो. वीरा शर्मा, अंबरीश मिश्र, प्रशांत गडाख, डॉ. आनंद नाडकर्णी, मुकेश माचकर, प्राजक्त देशमुख, दिनेश गुणे, दगडू माळी, अनिल साबळे, जुई कुलकर्णी, राधिका कुंटे, शुभांगी चेतन या नामवंतांनी आपण घडत गेलेल्या आठवणींचा सुंदर गोफ आपल्या आठवणीतून विणला आहे.

जागतिकीकरणाच्या तीन दशकांत भारतीय समाजाच्या लैंगिकताविषयक धारणा आणि व्यवहार यांत मोठा बदल झाला आहे. या बदलांची चर्चा करत स्त्री-पुरुषांतील निरामय नातेसंबंधांच्या आयामांची मांडणी करणारा रवींद्र रुक्मिणी यांचा दीर्घ लेख दोन भागांत प्रकाशित करीत आहोत. लेखाचा हा पहिला भाग...

♦ ♦ ♦

# एकविसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध आणि नवा 'मानुष'वाद

रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

♦ ♦ ♦



रेखाटन : ईशा सानेकर

**जागतिकीकरण आणि लैंगिकताविषयक बदल**

जागतिकीकरणाच्या तीन दशकांत झालेल्या अनेक बदलांपैकी सर्वात महत्त्वाचा व मूलभूत बदल भारतीय समाजाच्या लैंगिकताविषयक धारणा आणि प्रत्यक्ष व्यवहार ह्यांत झाला आहे, हे माझ्या प्रतिपादनाचे प्रमुख सूत्र आहे. ह्या परिवर्तनामुळे लैंगिकता व लैंगिक संबंध ह्यांचे पोतच नव्हे, तर आशयदेखील बदलला आहे. माझे व्यक्तिगत अनुभव, निरीक्षणे, विविध माध्यमांतून मिळणारी माहिती व ह्या संदर्भातील अध्ययने ह्यांच्या साह्याने ह्या बदलांची वैशिष्ट्ये व विविध आयाम मी आपणापुढे मांडेन. त्यानंतर त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कसा असावा ह्याचा आपण विचार करू. म्हणजेच प्रथम आपण खुलेपणाने वास्तव समजून घेऊ, त्याला जन्म देणारी जागतिक आर्थिक-राजकीय संदर्भचौकट समजून घेऊ आणि मग ह्या संबंधाना कोणत्या दिशेने वळवायला हवे, ह्याची चर्चा करू. मांडणीच्या दुसऱ्या भागात 'मानुषवाद' ही नवी संकल्पना समजून घेऊन २१व्या शतकातील मराठी साहित्यातील विचारव्यूहात तिची आवश्यकता व स्थान ह्यांची आपण चर्चा करू.

**पार्श्वभूमी**

जागतिकीकरणाच्या आगमनानंतर आपल्या देशात अनेक पातळ्यांवर परिवर्तन झाले. त्यांपैकी काही बदल तर कमालीचे उत्पाती (खोलवर परिणाम करणारे) व प्रपाती (वेगवान) स्वरूपाचे होते. त्यांतील अतिशय मूलभूत स्वरूपाचा, पण सर्वात दुर्लक्षित बदल हा आपल्या लैंगिकताविषयक जाणिवा, धारणा व व्यवहार ह्यांत झाला आहे. ह्या प्रक्रियेची सुरुवात नव्वदच्या दशकात झाली व त्याचे लक्षणीय परिणाम आपल्याला एकविसाव्या शतकात जाणवू लागले. ही प्रक्रिया अजून संपलेली नाही. हे बदल कशा स्वरूपाचे आहेत, हे आपण वेगवेगळ्या पद्धतींनी समजावून घेऊ.

सर्वप्रथम मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो, ज्यांची प्रामाणिक उत्तरे तुम्ही स्वतःशीच द्यायची आहेत व त्यांना आजच्या संदर्भात पडताळून पहायचे आहे:

समलैंगिकता, गे, लेस्बियन, ट्रान्सजेन्डर हे शब्द सार्वजनिकरित्या वापरायला केव्हा सुरुवात झाली? तुम्हाला ह्या शब्दांचा नेमका अर्थ कोणत्या वयात समजला? तुमच्या पुढच्या पिढीला तो केव्हा समजला?

बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड, डेटिंग, लिव्ह इन रिलेशनशिप ह्या शब्दांचा भारतात उदय केव्हा झाला? हे शब्द आपल्या आसपासच नव्हे, तर आपल्या घरात दाखल झाले आहेत हे तुम्हाला माहीत आहे का?

पुरुष वयात येतो, तेव्हा त्यात होणाऱ्या शारीरिक-मानसिक घडामोडींची-बदलांची माहिती त्याला कोठून मिळते? तुमच्या पिढीला ती कोठून मिळाली? तुम्हाला त्या वयात पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला कशातून मिळत होती? ती कितपत विश्वसनीय होती?

स्त्रीची मासिक पाळी हा मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा आधार. परंतु, तिच्याबद्दलची वैज्ञानिक माहिती तुम्हाला होती का? त्याविषयीचा सामाजिक व्यवहार कसा होता? शाळेत त्याबद्दल, तसेच स्त्री-पुरुषांच्या पुनरुत्पादक संस्थांबद्दल शिकविले जात

होते का?

मागील पिढ्यांतील पुरुष प्रेमभंग झाल्यावर काय करीत? आताचे काय करतात? आपापल्या काळातील सिनेमा-नाटके ह्यांत पडलेले त्यांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब काय दाखवते?

आपली लैंगिक ओळख काय आहे, ह्याबद्दल तुम्हाला काय वाटते व आजचे विज्ञान त्याबद्दल काय सांगते हे तुम्हाला माहीत आहे का?

आपण वयात येतो, तेव्हापासूनचा आपला स्त्रीत्व किंवा पुरुषत्व ह्याकडे जाण्याचा प्रवास वर्ग-जात-शहरी/ग्रामीण अशा विविध सामाजिक घटकांतून आकार घेत असतो. म्हणजेच, वरील प्रश्नांची सर्वांची उत्तरे सारखी असतील, असे नाही. पण तुमचे, माझे, नव्वदच्या दशकापूर्वी वयात आलेल्या असंख्य पुरुषांचे अनुभव बऱ्याच प्रमाणात समान आहेत, हे तुमच्या ध्यानात येईल. हीच बाब स्त्रियांच्या बाबतीतही खरी आहे. आपण सारेजण 'गप्प बसा संस्कृती'चे बळी होतो. स्त्री-पुरुष संबंधासारख्या नैसर्गिक व मूलभूत गोष्टीबद्दल आपल्याकडे प्रचंड गुप्तता राखली जात होती. अभ्यासक्रमात हा विषय असला, तरी तो शिकविला जात नसे. मासिक पाळी ही काहीतरी घाणेरडी बाब आहे असे मानून ती सुरू झाली की मुलीच्या वाट्याला आलेले थोडेफार मोकळेपणदेखील समाप्त होत असे. पुरुषांच्या बाबतीत वयात येणे ही रजोदर्शनासारखी 'घटना' नसल्यामुळे तर तिथे परिस्थिती अधिकच बिकट होती. एकीकडे शरीर-मनात होणाऱ्या प्रचंड बदलामुळे येणारे दडपण, कमालीची उत्सुकता आणि त्याविषयी कोणाला काही विचारणे म्हणजे 'फाजीलपणा', घाणेरडी वृत्ती, असा सार्वत्रिक समज. आपल्यासारख्याच अज्ञ, अननुभवी व गोंधळलेल्या मित्रांकडून व 'पिवळ्या पुस्तकांतून' मिळणारे ज्ञान हाच माहितीचा स्रोत. स्त्रियांच्या बाबतीत तर तोंड दाबून बुक्क्यांचा मार. एकूण लैंगिकता ही मानवी जीवनाच्या व एकूणच सृजनाच्या मुळाशी असणारी प्रेरणा असली तरी आपल्या दांभिक समाजात त्याविषयी बोलण्याची सोय नव्हती. स्त्री-पुरुष भेदभाव आणि स्त्रीच्या लैंगिकतेला नियंत्रित करण्याची पुरुषी लालसा इतकी तीव्र की त्याच्या खाणाखुणा सर्वत्र दिसून येत. एकीकडे मातृदेवतेची, शक्तीची पूजा, तर दुसरीकडे देवदासी म्हणून धार्मिक आधारावर तिचे होणारे शोषण. 'खानदानी' कुटुंबात विधवा विवाह मान्य नव्हता (अजूनही नाही). बालविवाह समाजात सर्रास सुरू आहेत ह्याचे कोणाला फारसे आश्चर्य वाटत नसे, असा हा काळ. स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्यांचे निकष इतके ठळक की आपली 'मधला' म्हणून हेटाळणी होऊ नये ह्याबद्दल स्त्री-पुरुष अतिशय दक्ष असत. मुंबईतल्या एक प्रतिष्ठित मराठी शाळेत मुला-मुलींनी परस्परांशी बोलायला बंदी होती. मुंबई-पुणे सोडल्यास इतरत्र कॉलेजातील मुला-मुलींनी एकत्र हिंडणे-फिरणे ही बाब समाजमान्य नव्हती. स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत होता, पण त्यांच्यासोबत वावरण्याची पुरुषांना सवय नव्हती. त्यामुळे खूप विचित्र गोष्टी घडत. १९७०च्या दशकात नागपूर शहरात विद्यापीठ परिसरात मराठी साहित्यात एम.ए. करणारा माझा रूम पार्टनर पूर्ण दोन वर्षांत वर्गातल्या मुलींशी एक शब्दही बोलू शकला नाही. तो भर उन्हातदेखील हॉस्टेलपासून कॅम्पसपर्यंत पायी चालत जाई कारण बसमध्ये गर्दीत मुलीचा स्पर्श झाला तर मनात वाईट विचार येतात, असे त्याचे मत. 'विवाहसंस्थेचा इतिहास' हे इतिहासाचार्य राजवाडेंचे पुस्तक वाच, असे म्हणणारे आम्ही मित्र त्याच्या दृष्टीने धर्म व संस्कृतीचे दुश्मन होतो. परंपरेला प्रश्न विचारण्याच्या कल्पनेनेच तो पार भेदरून जात असे, ज्यामुळे त्याची विलक्षण कोंडी व तगमग होत असे. एकूण आम्ही सर्व पुरुष तेव्हा दुभंगलेल्या मनोवस्थेत वावरत होतो. 'बायको असावी तर सात्विक 'जया'सारखी, पण तिच्या जोडीला 'रेखा' सारखी मैत्रीण असावी. ह्या दोन भूमिकांची चुकूनही अदलाबदल करू नये' ह्यावर आमच्या पिढीचे एकमत होते आणि बायकोला मित्र असण्याचा तर प्रश्नच नव्हता. उतारवयातील राज कपूर आणि राजश्री प्रॉडक्शन ह्या दोन्ही निर्मात्यांचे चित्रपट जोरात चालण्याचे ते दिवस होते.

**नवे पर्व, नवे प्रश्न**

नव्वदचे दशक आले. खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण (खाउजा) पर्व सुरू झाले आणि सर्व काही वेगाने बदलले. त्यापूर्वी शहरीकरण, आधुनिकीकरण, शिक्षणाचा प्रसार इ. घटकांमुळे खेडे व शहरांतील वातावरण हळूहळू बदलत होते. स्त्रीमुक्तीचळवळ आकार घेत होती. बलात्कार, माध्यमांतून घडणारे स्त्रीदेहाचे प्रदर्शन, असे प्रश्न सार्वजनिक चर्चेत आणण्याचा तिचा प्रयत्न सुरू झाला होता. पण ह्या नव्या पर्वातील बदल तर अतिशय तीव्र व वेगवान होते. ह्या काळात जीवनाची बहुतेक सूत्रे बाजारपेठेच्या हातात आली. त्यामुळे. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळी मागे पडल्या. सौंदर्यस्पर्धांचे वारे आले आणि जागतिक पातळीपासून गल्लीबोळापर्यंत त्याचे लोण पसरले. अगदी अर्धशहरी भागातही ह्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी तरुण मुलींना त्यांच्या मध्यमवयीन आया उत्तेजन देऊ लागल्या. स्त्रियांच्या कितीतरी पिढ्यांच्या मनात दबून राहिलेली वाफ वेगाने बाहेर पडू लागली. आता खुली लैंगिकता हा आपल्या रोजच्या जगण्याचा भाग झाला आहे. सर्वसंचारी व खाजगीपणा जपणाऱ्या सोशल मीडियामुळे हे बदल समाजाच्या सर्व स्तरांत जाऊन पोहचले आहेत, स्थिरावले आहेत. शहरातील उच्चभ्रू वर्गापासून अगदी लहान गावातील माध्यमिक शाळांपर्यंत सर्वत्र बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंडच्या जोड्या जमलेल्या आपल्याला दिसतात. ग्रामीण भागातील चित्र आणखी विचित्र आहे. तिथे सोशल मीडिया आणि दीड जीबी फ्री डेटामुळे पोर्नोग्राफी प्रत्येक घरापर्यंत पोहोचली आहे. मुलगे स्वैर झाले, पण त्याचवेळी मुलींवरील बंधने सैलावलेली नाहीत. मुला-मुलींमधील तारुण्यसुलभ आकर्षण नाकारणे, आपल्या मुलीने खालच्या जातीच्या मुलाशी बोलण्याने खानदानाची इज्जत जाते अशा सरंजामशाही कल्पना जोपासणे ह्यामुळे नवे पेच निर्माण झाले आहेत. किशोरवयीन मुलांचे काय करावे हे शिक्षक, पालक, समाज कोणालाच कळेनासे झाले आहे. ही मुले कोणाचेच ऐकत नाहीत. अभ्यासात त्यांचे लक्ष अजिबात नसते. मोबाईलवरील क्लिप्स पाहणे हे त्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे कार्य

होऊन बसले आहे. आमच्या परिसरात नुकतीच घडलेली दोन उदाहरणे बोलकी आहेत: एका शाळेतल्या मुलाने वर्गातील मुलीने 'फ्रेन्डशिप' नाकारली, म्हणून तिच्यावर बलात्कार करून तिचा खून केला. तो आता सुधारगृहात आहे. दुसऱ्या एका गावातील ज्युनियर कॉलेजात बारावीच्या परीक्षेचा फॉर्म भरायला जी विद्यार्थिनी आली, तिच्यासोबत तिचे १५ दिवसांचे मूल होते. त्याला कोठे ठेवण्याइतपतही आधार तिला मिळाला नाही. पूर्वी प्रेमभंग झाल्यावर तरुण दाढी वाढवून देवदास बनत. आता मात्र 'डर' चित्रपटातील 'तू हां कर, या ना कर, तू है मेरी किरन' हे गीत ब्रह्मवाक्य आहे, असे मानून आपली लैंगिक सुखाची मागणी झिडकारणाऱ्या मुलीला धडा शिकविण्याचे व्रत त्यांनी घेतले आहे. दिल्ली-बिहार सोडाच, मुंबई-पुण्यापासून महाराष्ट्रातील सुदूर गावांपर्यंत हे लोण पसरल्याचे आपल्याला दिसते. पेट्रोल, सुरी, तलवार, ॲसिड अशा अनेक साधनांचा वापर करून आपल्या तथाकथित प्रेयसीला 'धडा शिकविला पाहिजे' अशी ह्या युवकांची मर्दानगी त्यांना सांगते व त्याचे ते पालनही करतात. दुसरीकडे, मुलीने 'खालच्या जातीतील' मुलाशी लग्न करून खानदानाची इज्जत धुळीला मिळवली, म्हणून मुलगी-जावई ह्यांची कत्तल करण्याची साथही 'सैराट' सुटली आहे.

लैंगिकतेची ही लाट थोपवून धरणे केवळ अशक्य आहे. ऑनरकिलिंग, पॉर्नोग्राफी साईट्सवर बंदी, मुली-स्त्रिया ह्यांनी कोणते कपडे घालावे ह्याबद्दलचे फतवे अशा उपायांनी तिला वेसण घालता येणार नाही. आपल्या हातातील मोबाईलच्या माध्यमातून ती आपल्यापैकी प्रत्येकपर्यंत पोहोचण्याचा हरक्षणी प्रयत्न करीत आहे. मला ह्या माध्यमातून आठवड्यातून किमान दोनदा 'फ्रेन्डशिप क्लब' जॉईन करण्याची निमंत्रणे येतात. मी शहरातील ज्या रस्त्याने फिरतो, त्यात पावलोपावली पब्ज, क्लब्ज, डिस्कोथेक, हुक्का पार्लर आहेत. माझ्या शहरात 'पुरेसे नाईट लाईफ' नाही, त्यामुळे ते पुरेसे स्मार्ट नाही, ही माझ्या भाषेतील एका प्रमुख वृत्तपत्राला पडलेली चिंता आहे.

हे बदल केवळ महाराष्ट्रासारख्या शहरीकरण झालेल्या, आधुनिक विचारसरणीच्या राज्यात झालेले नाहीत. उत्तर प्रदेश, बिहारसारख्या हिंदी भाषिक गरीब राज्यांतदेखील कपडे, फॅशन, देहबोली, शारीरता, माध्यमे, ह्यांतून हे बदल ठळक होत जाताना आपल्याला दिसतात. जुने सरंजामशाही समाजमानस आणि लैंगिकतेची नवी लाट, पोट भरण्यासाठी पुरुषांचे इतर राज्यात होणारे स्थलांतर आणि स्त्रीगर्भहत्येमुळे स्त्री-पुरुष संख्येचा ढासळलेला समतोल अशा अनेक कारक घटकांच्या एकत्र येण्यातून तिथे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांची दखल समाजशास्त्रीय अभ्यासक, माध्यमे व विचारवंत घेत नसले, तरी 'पॉप्युलर कल्चर'मधून ते आपल्या समोर येत आहेत. एकेकाळी भोजपुरी लोकसंगीत हा भारतीय परंपरेतील मोलाचा ठेवा मानला जात असे. आता मात्र भोजपुरी गाण्यांतून उघडीनागडी लैंगिकता दुथडी भरून वाहताना आपल्याला दिसते. त्यात दूरदेशी गेलेला पती, बुभुक्षित पत्नी आणि कामातुर दीर ही थीम अगदी केंद्रस्थानी असल्याचे दिसते. अशा एका गाण्यात जेव्हा पत्नी 'दीर माझ्याशी वेळीअवेळी लगट करतो, तेव्हा तू आपली नोकरी सोडून लौकर इकडे ये' अशी तक्रार आपल्या पतीकडे करते, तेव्हा तो तिला 'सध्या दिरावरच काम भागवून घे', असा सल्ला देताना दिसतो. ह्या सगळ्याकडे केवळ धम्माल किंवा भावना उद्दीपित करण्याचे साधन असे न पाहता त्यामागील समाजशास्त्रीय वास्तव जाणून घेणे आवश्यक आहे.

कोणत्याही कारणाने का असेना, लैंगिकतेविषयीचे निषेध-निकष (taboos) बाजूला सारले गेले, ह्याचे काही चांगले परिणामही झाल्याचे आपल्याला दिसतात. निसर्गामध्ये स्त्री-पुरुष भेदांच्या पलीकडे अन्य भेदही आहेत, हे भान समाजाला ह्याच काळात आले. तृतीयपंथी व त्यातील उपभेद, तसेच समलैंगिकता ह्यांच्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन व्यापक झाला. मासिक पाळी हा उघडपणे बोलण्याचा, समजून घेण्याचा विषय झाला. लैंगिक शिक्षण हे जीवनशिक्षण आहे हे भानही काही प्रमाणात रुजले. विविध वयोगटातील स्त्री-पुरुष मैत्री ही बाब आता पूर्वीइतकी भुवया उंचावणारी राहिली नाही. विशेषतः मोठ्या शहरात मुला-मुलींचे गट मोकळेपणाने वावरताना दिसू लागले. त्यांच्यात नातेसंबंधांचे गोंधळ असले, तरी मैत्री हे मूल्य त्यांच्यात बऱ्यापैकी प्रस्थापित झाल्याचे दिसते. मुख्य धारा मानल्या जाणाऱ्या माध्यमांतून आजही स्त्री-पुरुषांचे ठोकळेबाज चित्रण होताना दिसत असले, तरी नाटक-चित्रपट, साहित्य, वेबसीरीज ह्या माध्यमांतून व्यक्त होणाऱ्या नव्या पिढीने त्यात अनेक अंगांनी नवेपण आणले आहे. शारीरिकता, लैंगिकता, मानसिकता यांचे कंगोरे संवेदनशीलता आणि धीटपणाने चितारण्याचे कौशल्य ही पिढी दाखवते आहे.

वर नमूद केलेल्या अनुभव-निरीक्षणात अनेक बाबींची भर घालता येईल, पण त्यांच्यामुळे माझ्या प्रमुख प्रतिपादनाला दुजोराच मिळेल. आपल्या अनुभव-निरीक्षणाला मर्यादा असतात हे मान्य करून, ह्या बाबतीत झालेली अध्यायने, संशोधने आपल्याला काय सांगतात त्याचा आपण विचार करू या.

**नववधू आणि कौमार्यपट्टा**

इला त्रिवेदी ह्या अमेरिकास्थित भारतीय अभ्यासकाने लिहिलेले "India in Love: Marriage and Sexuality in 21st Century" हे पुस्तक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने अलीकडेच प्रकाशित केले आहे. ह्या पुस्तकात त्यांनी भारतीय महानगरातील लैंगिकता आणि विवाहसंस्था ह्यांत घडणाऱ्या बदलांचा शोध घेतला आहे. विवाहसंस्था आणि लैंगिकता ह्यांच्यासी संबंधित शेकडो व्यक्तींच्या मुलाखतींवर आधारित ह्या पुस्तकातील महत्वाची निरीक्षणे व निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

स्त्री-पुरुष नात्यात गेल्या दशकात जेवढे बदल झाले तितके गेल्या ३,००० वर्षांतही झाले नाहीत.

आतापर्यंत बहुतेक भारतीयांचा प्राधान्यक्रम लग्न, सेक्स व त्यानंतर (मिळाले तर) प्रेम असा होता. आता प्रेम, सेक्स (किंवा उलट) आणि नंतर वाटले तर लग्न असा क्रम झाला आहे. अनेक युवक-युवतींना आयुष्यात फक्त सेक्स व प्रेम हेच महत्त्वाचे आहेत,

असे वाटू लागले आहे.

सेक्स आणि लग्न ह्या दोन्ही बाबींतील क्रांती ही एकाच वेळी होऊ घातली आहे. त्यामुळे होणारे परिवर्तन हे अतिशय वेगाने आणि अनेक क्षेत्रात होते आहे. स्त्रियांची मुक्तीची आकांक्षा वाढते आहे. त्या सारी बंधने नाकारीत आहेत. लैंगिक धारणा मुळापासून बदलत आहेत. युवा पिढीचा कल 'ठरवून लग्न करण्या'ऐवजी स्वतः जोडीदार शोधण्याकडे झुकला आहे. कुटुंब हे आता अर्थव्यवस्थेचे एकक राहिले नाही; त्याची जागा व्यक्तीने घेतली आहे.

आर्थिक विकास, शहरीकरण, जागतिकीकरण, विस्थापन, प्रसार क्रांती (मोबाईल क्रांती), चंगळवाद ह्या सर्व घटकांचा हा एकत्रित परिणाम आहे.

ही ओसरणारी लाट नाही, तर पुढे रेटणारा जबरदस्त प्रवाह आहे.

आज शहरे आणि महानगरे ह्यांत राहणाऱ्या स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही सेक्स ही क्रयवस्तू म्हणून सहज उपलब्ध आहे. कॉलेज युवती, मध्यमवयीन गृहिणी ह्यांना हे सहज कमाईचे साधन वाटत आहे.

मध्यमवर्ग हा ह्या परिवर्तनाचा वाहक आहे. त्यामुळे हा बदल दीर्घकाळ टिकणार आहे, कारण त्याचेच अनुकरण खालचा वर्ग करीत असतो. भारतातील मध्यमवर्ग आकाराने खूप मोठा – युरोपमधील अनेक राष्ट्रांएवढा आहे. आत्ता आत्ता त्याला आपल्या क्रयशक्तीचे आणि राजकीय ताकदीचे भान येऊ लागले आहे. त्यामुळे, आपल्याला हवे ते बदल समाजात घडवून आणण्याबद्दल तो आता आग्रही झाला आहे.

गेल्या दशकात प्रेमविवाहांचे प्रमाण ५% वरून ३०% वर गेले आहे. महानगरात ते ह्याहून अधिक असण्याची शक्यता आहे.

सेक्सची खेळणी, पुरुष वेश्या ह्या बाबी आता नवलाईच्या राहिलेल्या नाहीत.

लेखिकेच्या शब्दात ह्या पुस्तकाचे सार असे आहे – एखाद्या लाजऱ्या परंतु उत्सुक नववधूप्रमाणे हा देश हळूहळू आपला कौमार्यपट्टा दूर सारीत आहे.

**अन्य संशोधने**

गुगलने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार जगात पॉर्नोग्राफी पाहण्यात भारताचा सहावा क्रमांक लागतो. भारतात सर्वेक्षण केलेल्या पुरुषांपैकी ७५% पॉर्नोग्राफी बघतात. भारतीय स्त्रिया ह्यात पुरुषांच्या तुलनेत फारशा मागे नाहीत.

भारत सरकारने मध्यंतरी हजारो पॉर्नोग्राफी साईट्सवर बंदी घातली. पण ती कागदावरच उरली कारण वेबसाईटवरील सारा मजकूर काही तासात नव्या साईटवर टाकणे शक्य आहे. त्यामुळे अशी बंदी कधीच यशस्वी होऊ शकत नाही, असा आतापर्यंतचा इतिहास आहे.

आपली स्वतःची लैंगिक ओळख ही आतापर्यंत स्त्री किंवा पुरुष अशा द्वंद्वात्मक पद्धतीने होत होती. पण मेंदूविज्ञान, पुनरुत्पादक अंतस्रावविज्ञान इ. विषयांतील अभ्यासातून आता असे सिद्ध झाले आहे की असले ठोकळेबाज वर्गीकरण आता कालबाह्य झाले आहे. आपल्या सर्वांच्या शरीर-मनात स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्या दोन्ही प्रकारचे गुणधर्म आहेत. त्यांचे परस्परप्रमाण कमी जास्त होते, त्यानुसार आपण एखाद्या व्यक्तीला स्त्री किंवा पुरुष म्हणून संबोधतो, पण हे प्रमाणही बदलत असते. म्हणजे आपण काही प्रसंगात स्त्रीसुलभ भूमिका घेतो, तर कधी ती पुरुषत्व अधोरेखित करणारी असते. आपली लैंगिक ओळख ही आता स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्या दोन बिंदूंमधील गतिमान पटासारखी आहे, किंवा एखाद्या गोधडी (mosaic)प्रमाणे आहे, असे विज्ञान आपल्याला सांगते.

आपली इच्छा असो वा नसो, खा-उ-जाने आणलेल्या लैंगिकतेच्या ह्या तुफानाने भारतीय समाजजीवनात अतिशय महत्त्वाचे बदल घडविले आहेत व अनेक बदल भविष्यातही घडणार आहेत, हे वास्तव आहे. प्रश्न  हा आहे की आपण ह्यांकडे कसे पाहणार?

**दृष्टिकोन**

ह्या बदलांकडे पाहण्याचे प्रामुख्याने तीन दृष्टिकोन आहेत :

*पारंपरिक नैतिक :* आमची भारतीय संस्कृती थोर आहे, जिच्यात  ह्या 'थेरां'ना जागा नाही. ही सर्व पाश्चात्य संस्कृतीने आणलेली विकृती आहे. आमच्या संस्कृतीने अशी अनेक वादळे पचविली आहेत, असे मानणारी एक विचारधारा आहे. मुळात ती स्त्री-पुरुष विषमता आणि वर्णवर्चस्व ह्यांवर आधारित आहे. आज तिचे पाठीराखे मोठ्या संख्येने दिसत असले, तरी मुळात ती काळाच्या उलट दिशेने जाणारी विचारधारा असल्याने बदलत्या काळाने निर्माण केलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे तिच्याकडे नाहीत. स्त्रीच्या लैंगिकतेवर बंधने घालून तिला नियंत्रित करण्याचे ह्यापूर्वीचे प्रयत्न, उदा : सती, विधवाविवाहबंदी, कौमार्यचाचणी इ. यशस्वी झाले नाहीत आणि एकविसाव्या शतकात आत्मभान आलेल्या स्त्रीला बंदिस्त करणे, सार्वजनिक स्थळी दिसणाऱ्या जोडप्यांना मारहाण करणे आणि 'मर्यादाभंग करणाऱ्यां'ना जातपंचायतीनी शिक्षा ठोठावणे ह्या मार्गाने हे प्रश्न सुटणार नाहीत, हे निश्चित!

*यांत्रिक न-नैतिक :* हा तथाकथित आधुनिकतावादी विचार आहे. त्याच्या मते ह्या प्रश्नावर नैतिकतेची भूमिका घेणारे आपण कोण? काळाच्या ओघात होणारे बदल स्वीकारणे एवढेच आपल्या हातात असते व ते आपण केले पाहिजे. जगात घडणाऱ्या तंत्रज्ञानीय-राजकीय-अर्थशास्त्रीय बदलांतून खा-उ-जा घडले. त्याला पर्याय नाही व ते बदल परत फिरविता येणार नाहीत. त्यांच्यानुसार स्वतःला बदलून घेणे हाच एकमेव पर्याय आपल्यापुढे आहे. ह्या दृष्टिकोनामागे एक (अराजकीय म्हणविला जाणारा) राजकीय विचार आहे; पण त्याला मूल्यविवेकाची बैठक नाही. जे येईल ते कसलीही चिकित्सा न करता स्वीकारणे असा हा 'नव-नियतीवादी' विचार एकविसाव्या शतकाच्या आव्हानांना सामोरे जाताना पुरेसा आहे, असे वाटत नाही.

*विवेकवादी न-नैतिक :* हा विचारही स्त्री-पुरुष संबंधांच्या बाबतीत किंवा कोणाही व्यक्तीच्या आचार-विचाराच्या संदर्भात न्यायाधीशाची भूमिका घेत नाही. एखादी गोष्ट नैतिक आहे की नाही

ही संबंधित व्यक्तींनी ठरविण्याची बाब आहे, असे तो मानतो. पण लैंगिकता आणि समाज ह्याचे नाते काय असावे, ह्याबद्दल त्याची विशिष्ट भूमिका आहे. स्त्री-पुरुष (व अन्य) ह्यांच्या नात्याबद्दल काय चूक, काय बरोबर अशी निवड करता येते, करायला हवी, असे तो मानतो. मात्र केवळ परंपरा किंवा नवता ह्या आधारावर ही निवड न करता समानता, परस्परांचा आदर, वैविध्याचा स्वीकार, शोषण, दडपण व ब्लॅकमेलिंग ह्यांना नकार, कोणाही व्यक्ती किंवा नात्याचे बाजारीकरण करण्यास नकार ह्या निकषांवर ती करावी असे हा विचार मानतो. थोडक्यात त्यामागे मूल्यविवेकाची बैठक आहे. परंपरेतून येणाऱ्या सती, देवदासी, स्त्री-पुरुष भेदभाव व नैतिकतेचे दुहेरी मापदंड ह्या गोष्टीना तो नकार देतो, त्याचप्रमाणे खा-उ-जाने मानवी नात्याचे बाजारीकरण केले ह्याचीही त्याला चीड आहे. खा-उ-जा ही आकाशातून पडलेली गोष्ट नाही, तर अनियंत्रित भांडवलशाहीने आपल्या स्वार्थासाठी, जगभरातील नैसर्गिक साधनांचे दोहन करत यावे, ह्यासाठी उभारलेली ही व्यवस्था आहे, साम्राज्यशाहीचा हा नवा अवतार आहे, ह्याचे भान त्याला आहे. सौंदर्यस्पर्धा असोत की पॉर्नोग्राफीचे जगभर विणलेले जाले, त्यामागे नफ्याची गणिते आहेत, स्त्री आणि पुरुष हे केवळ देह आहेत व अमर्याद उपभोग हेच त्यांचे अंतिम श्रेयस व प्रेयस आहे, ह्या तत्वज्ञानातून ह्या व्यवस्थेचा जन्म झाला आहे, असे हा विचार मानतो. म्हणूनच जुन्या आणि नव्या सर्वच शोषकव्यवस्थांमध्ये गुदमरणारे स्त्री-पुरुष व अन्य ह्यांचे नाते नव्या शतकात तरी मुक्त व निरामय व्हावे ही त्याची आकांक्षा आहे.

एकविसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध कसे असायला हवेत, हे सांगण्यासाठी विसाव्या शतकातील प्रसिद्ध कवी-चित्रकार इमरोझ ह्यांची ही रचना पुरेशी आहे; ते म्हणतात-

पुरुष
स्त्रीसोबत
झोपतो,
जागत
का नाही?

शारीरिकतेच्या पलीकडे जाणारे, स्त्री-पुरुष ह्यांच्यातील वेगळेपण ओळखून त्यांच्यातील समता आणि पारस्परिकता जपणारे मैत्रीचे नाते त्यांच्यात उमलावे, अनेक शतकांच्या निद्रेतून दोघांनीही जागावे, ह्याहून वेगळे आपणही काय मागणार?

**- रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**
भ्रमणध्वनी : ९८३३३४६५३४
ravindrarp@gmail.com

॥ग्रंथाली॥

**मनोज बोरगावकर लिखित**

**नदीष्ट**




विषय चाकोरीबाहेरचा आहे. शैली पहिल्या धारेची आहे. थेट कोंडुरा किंवा बनगरवाडीची आठवण करून देणारे लिखाण आहे. 'नदीष्ट' ही मनोज बोरगावकर यांची केवळ कादंबरी नाही, तो आहे त्यांच्या प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवसिद्ध घटनांचा कसदार ललित गद्य हुंकार. 'नदीष्ट' ही मराठी कादंबरीविश्वातील अकरावी दिशा आहे.

**- विनायक पाटील, नाशिक**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

मुळातच शेतीची सुरुवात, संवर्धन आणि आधुनिक शेती तसेच बियाण्यांची जपणूक यात जगभरातील स्त्रियांचेच योगदान अधिक आहे. अनादी काळात पुरुष जेव्हा शिकारीच्या शोधात जात असत, तेव्हा बालसंगोपनासाठी थांबलेल्या स्त्रिया नदीकाठच्या गवतात खाण्यायोग्य बियांचे गवत शोधत असाव्यात.

♦ ♦ ♦

# बीज जपावे डब्यात । मग पीक वावरात ।।

डॉ. कैलास दौंड

♦ ♦ ♦

गोष्ट बियांच्या जतनाची आहे. मागच्या महिन्यात सह्याद्रीच्या कुशीत असणाऱ्या अकोले-राजुरच्या डोंगराळ भागात गेलो होतो. दिवस उन्हाळ्याच्या आगमनाचे होते खरे परंतु तरीही त्या उंचीवर वाहणाऱ्या वाऱ्यामुळे हवा आल्हाददायक होती. पट्टा किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याने कोंभाळणे गावातीलच पोपेरेवाडीच्या वळणावर असणाऱ्या एकुलत्या घराने माझे लक्ष वेधून घेतले. हे घर महाराष्ट्राची 'बीजमाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राहीबाई पोपेरे यांचे असल्याचे पाचपुते सरांकडून समजले. अर्थातच या ठिकाणी भेट देणे नक्की केले. म्हणून खिरविरे गावातून परतताना आवर्जून थांबून राहीबाईची भेट घेऊन तिचे घर, शेत व बीजसंग्रह पाहिला. सोबत असणाऱ्या दीपक पाचपुते या शिक्षक मित्रांची त्यांच्याशी चांगली ओळख होती. आजचा सगळा दिवस ते शिक्षक असलेल्या खिरविरे येथील हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसोबत व्यतीत केला होता. विद्यार्थी आणि शिक्षक यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. मुलांनी प्रश्न विचारून अक्षरशः भंडावून सोडले होते. शहरातल्या मानाने अधिक समजदार वाटावी अशी मुलं इथ भेटल्याने मनाला एक वेगळेच समाधान मिळाले असल्याने सायंकाळ झाली असूनही उत्साही होतो.

राहीबाई पोपेरे यांच्या कामाला आताशा प्रसिद्धी मिळू लागल्याने त्यांच्यातील उत्साह दुणावला आहे. बचत गट आणि 'बायफ मित्रा' संस्थेच्या सहकार्यामुळे त्यांच्या त्यांच्यात आत्मविश्वास आलेला आहे. आपण करीत असलेले काम महत्त्वाचे आहे. ते कोणीतरी पहात आहे, समजावून घेत आहे. आपला संदेश योग्य पोहोचतो आहे याचे समाधानही तिच्या चेहऱ्यावर दिसते.

साधारणतः साठीत पोहोचलेल्या राहीबाई उत्साहाने त्यांनी तयार केलेला 'बीजकोष' दाखवत असतात. परिसरात कधीकाळी येणारे सात्विक वाण तिने वेगवेगळ्या प्लॅस्टिक डब्यात भरून ठेवून त्याच्या बाहेरील बाजूस आतील बियांचे नाव डकवलेले आहे. तर बियांचे अनेक वाण त्यांनी उतरंडीतील मडक्यात भरून ठेवलेले आहेत. हे बी ठेवताना त्यांनी बियाणे जपवणुकीचा पारंपरिक व अल्पखर्चिक मार्ग निवडलेला आहे. 'मडक्यात राख टाकून त्यात बियाणी ठेवल्यास त्याला साधारणतः तीन वर्षे तरी कीड लागत नाही.' असे ती सांगत असते नि मी मडक्यातील राखेमधील मटकीचे बियाणे पाहत असतो.

काड्यांपासून विणलेल्या आणि गाई-बैलांच्या शेणाने सारवून घट्ट केलेला केलेल्या 'सलदा'मध्ये बियाणे साठा करून व त्यावरून पुन्हा तसेच झाकण लावून शेणाने लिंपून सीलबंद केलेला बियाण्यांचा साठा लक्ष वेधून घेत होता. तर घराच्या वलणीला लसूण, भेंडी, वाल, चवळी, दोडके, मक्याची कणसे, वांगे, दुधी, भोपळा, चक्की भोपळे, डांगर असे वाळवलेले नानाविविध वाण बांधलेले होते. त्यामुळे नैसर्गिक स्थितीतच बियाणे राहणार होते. घरात अनेक पुरस्कारांची स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्रे होती. मात्र राहीबाई ते दाखवण्याऐवजी बियाणे दाखवत होती हे विशेष. त्यांच्या घराच्या बाहेर पडल्यावर दाराकडे घेवड्याची बाग पाहिली तर त्यात किमान चार प्रकारचे घेवडे लावलेले होते. हे सगळे पाहून झाल्यावर आम्ही त्यांना शुभेच्छा देत मार्गस्थ झालो.



भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नारीशक्ती सन्मान स्वीकारताना राहीबाई पोपेरे.

कोंभाळणे गावात जन्मलेल्या आणि त्याच गावात माहेरवाशीण झालेल्या व शेती-मातीशी एकरूप झालेल्या राहीबाईच्या भेटीने मी नकळतपणे तीस चाळीस वर्षे भूतकाळात मागे गेलो.

तिने दाखवलेल्या बियांत गावठी हिरवे वांगे, लाल चवळी, तंबाटे, नागली, लांब हिरवा घेवडा, वरई, राळा, खुरासणी, रायभोग, काळभात, जिरवेल, तामकुड, खडक्या असे भाताचे विविध प्रकार, गोडवाल, कडूवाल, तांबडावाल असे वालाचे प्रकार, अनेक प्रकारचा घेवडा, मटकी, भोपळी अशा दोनशेपेक्षा अधिक बीजांच्या प्रकारांचा समावेश आहे. हे सगळे वाण अस्सल देशी गावरान वाण आहेत. ते पौष्टिक आणि पाण्याचा ताण सहन करणारे आहेत. त्यांच्या बियाणे बँकेच्या व बचत गटाच्या माध्यमातून दहा गावातील लोक एकत्र काम करून पंचवीस हजार पाकिटे बियाणे विक्रीसाठी ठेवतात. राहीबाई पोपेरे यांच्या कामाला आता अनेक हात जोडले गेलेले आहेत.

मला माझ्या बालपणी पाहिलेली बियाण्यांचे जतन करणारी माणसे आठवली. हे फक्त आमच्याच घरात होत होते असे नाहीतर जवळपास शेती असलेल्या सर्वांच्या घरी हे होत होते. घरच्या घरी एरंडाच्या एरंड्या काढून व त्यातील गोडंबी काढून घेऊन चुलीवरच 'आरड' घेऊन त्यातून खाद्यतेल काढणारी आजी व आई यांना मी त्या काळी वर्षातून एकदा दोनदा हमखासच पाहत असे. करडईच्या दाण्यांचा भाजीत वाटून वापर करणे तर उन्हाळ्याच्या दिवसात नित्याचेच होते. सर्वांच्या घरी वलनीला लसूण, मका, ज्वारीची कणसे, जवस, हुलगा सर्रास नजरेस पडे. गहू, हरभरा घरीच पिकलेला असे आणि तोच चांगला निवडून पेरणीसाठी ठेवलेला असे. ज्वारीसारख्या बियाण्यांना गंधक लावून पेरणी आधी जंतुनाशक केले जाई. उतरंडीच्या मडक्यात एरंड्या, करडई, चुका, भुईमूग हमखास बियाणे म्हणून ठेवलेला असे.

राहीबाई पोपेरे यांचे काम याच प्रकारचे आहे. त्यांच्या या कामामुळे नष्ट होऊ पाहणाऱ्या गावरान वाणांचे जतन केले जात आहे. कृषी शास्त्रज्ञांना या बियाण्यावर संशोधन करून पौष्टिकता कायम ठेवून, अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित बियाण्यांची निर्मिती त्यातून करता येऊ शकेल. मात्र राहीबाईंचा संकरित बियाणे वापरण्याला विरोध आहे कारण संकरित खाण्यामुळे आजार वाढतात, असे त्यांचे मत आहे. तर सर्वांना अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी अधिक उत्पन्न देणाऱ्या वाणाची गरज आहे असे संशोधकांचे मत आहे.

पाखरांची सुगी । पेरावया आले ।।
कनवाळू भले । शेतकरी
गोलक्या दांड्याची । खुडूनी कणसे ।।
राऊळाचे वासे । सजविती.
दाण्यातूनी विख । उगवूनी आले ।।
माळातून गेले । शेष सत्व.
कडू घास गोड । मानुनिया पक्षी ।।
उडाले आकाशी । भोवंडत.
('अंधाराचा गाव माझा'मधून पृष्ठ-२३)

मुळातच शेतीची सुरुवात, संवर्धन आणि आधुनिक शेती तसेच बियाण्यांची जपवणूक यात जगभरातील स्त्रियांचेच योगदान अधिक आहे. अनादी काळात पुरुष जेव्हा शिकारीच्या शोधात जात असत तेव्हा बालसंगोपनासाठी थांबलेल्या स्त्रिया नदीकाठच्या गवतात खाण्यायोग्य बियांचे गवत शोधत असाव्यात. त्यातीलच काही बी जमवून जमीन खणून त्यात टाकत असतील आणि त्यावर पाणी शिंपडून पुन्हा पीक घेत असतील. त्यातूनच गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, सातू अशी तृणधान्ये संवर्धित झाली. शेतीची सुरुवात ते आधुनिक शेती प्रत्येक टप्प्यावर महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. या कामाचे स्वरूप खूप कठीण आणि खडतर असणार हे नक्कीच!

अलीकडे दादाजी रामजी खोब्रागडे या संशोधक शेतकऱ्यांनी शेती करता करता शोधलेले आणि संवर्धित केलेले 'एचएमटी सोना', 'नांदेड हिरा', 'डी आर के-२' व इतर वाण जास्त उत्पादकता देणारे ही ठरले आहेत. दादाजींचे नवीन वाण शोधण्याचे कार्य आणि राहीबाईचे देशी बीज शोधण्याचे कार्य संशोधनाचे कार्य हे अगदीच लोकपरंपरा वाहकांचे कार्य आहे. दादाजींच्या वाट्याला कृषिभूषण सारखा एखादा सन्मान आला. राहीबाईंची दखल त्यामानाने बरी घेतली गेली. आता नुकताच महिलादिनाच्या औचित्याने त्यांना भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार मिळाला आहे. तरीही मुळातच लोकसाहित्याच्या-प्रमाणेच बीजसंवर्धन देखील अपौरुषेय आहे असे म्हणावे लागते. कारण कितीतरी अज्ञात लोकांचा या प्रक्रियेत सहभाग असतो. गवतातून अन्नधान्याचा घेतलेला शोध आणि बियांचे केलेले जतन हा शेती व्यवस्थेचा प्राथमिक आणि पायाभूत भाग आहे. याचा उपयोग शेती शास्त्रज्ञांना नक्कीच होत असतो. कसदारपणाचे गुणधर्म कायम ठेवून किंवा शक्य तर वाढवून त्यांची उत्पादकता वाढवणारे बीज विकसित करण्याचे कार्य त्यांना करावयाचे असते. पौष्टिक आणि कसदार अन्न ही सर्वांचीच गरज आहे हेच खरे!

हे झाले जीव जगवणाऱ्या बीजांच्या संवर्धन आणि संरक्षणाबाबत. माणसाला जगावेसे वाटणे ही त्याची नैसर्गिक प्रेरणा आहे. स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगाविषयी वाटणे ही त्याची मानसिक आणि सामाजिक प्रेरणा आहे. त्यासाठी त्याने काही सवयी विकसित केलेल्या आहेत तशीच काही बंधने ही स्वतःवर लादून घेतलेली आहेत. आपल्या पुढील पिढीत ही आत्मसन्मानाच्या आणि स्वाभिमानाच्या बीजाची रूजवण व्हावी म्हणून तो प्रयत्नही करत असतो. या बीजांचे संवर्धन करण्यासाठी काही लोक त्यागही करत असतात. जेव्हा एखादी बीज जमिनीत गाडून घेते तेव्हाच दाण्यांनी लदबदलेले कणीस मिळत असते.

एका बिजा नाश केला। मग भोगले कणीस।।

असे तुकोबांनी लिहून ठेवलेय ते का उगीच थोडे आहे?

मानवता, सामंजस्य, न्याय, समता, बंधुता, सामाजिकता, राष्ट्रीयता, देशभक्ती या भावनांचा परिपोष प्रत्येकाच्या मनामनात करण्यासाठी, त्या बीजाची पेरणी करण्यासाठी, त्यांचे संवर्धन करण्यासाठी, शेतीच्या बियांचे जतन करणारी राहीबाई किंवा दादाजी

सारखे लोक किंवा त्या आधी घराघरातून प्रयत्न करणारे निष्ठावान शेतकरी आता मानवी सद्वर्तनाच्या बाबतीतही तयार होण्याची निकड वाटते आणि वाढते आहे.

आपल्याकडे ही निकड विविध संप्रदायांच्या संतांनी, समाज सुधारकांनी आपापल्या परीने भागवण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजच्या बाजारीकरणाच्या अर्थप्रधान जगण्यामुळे या बियाण्यांच्या संवर्धन आणि विकसन करण्याच्या कामात गुंतवून घेणाऱ्या केशवसुतांच्या भाषेत 'सनदी' शेतकऱ्यांची गरज निर्माण झालेली आहे, हे मात्र नक्की. मला माहिती आहे की की तेजाचा आणि बीजाचा प्रवास कधीच संपत नसतो. एका कवितेत मी लिहिले आहे-

तेजाचा प्रवास थांबत नसतो म्हणतात,
मग माझ्या विझत जाण्याचे काय?
मला जपला पाहिजे अंगार
आणि त्याला केले पाहिजे वेगवान
पेरणीसाठी ठेवलेल्या कणसातच
मला दिसत आहेत अग्निबाण!

**- डॉ. कैलास दौंड**
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११
kailasdaund@gmail.com

---

# साप, काठी आणि शिकवण

## लखनसिंह कटरे

**बो**रकन्हार येथील आमच्या एका शेतीचे नाव आहे, आंबाबोडीच्या खाल्याचा वावर! या शेतात एकेकाळी दुबराज, लुचई, हिरानकी, सारखे भारी जातीचे/सुगंधित धान पिकविले जात होते. आता या गाव-धान-जाती जवळपास लुप्तप्रायच झाल्या असून आता या शेतात हलक्या जातीचे संकरित धानच पिकविले जाते. मी फेब्रुवारी २०१३ मध्ये निवृत्त झाल्यावर माझ्या गावी स्थायी झालो व जमेल तसे शेतीकडे लक्ष(!) देऊ लागलो. नोव्हेंबर २०१५ मधील एक घटना मला एक नवीन धडा शिकवून गेली.

झाले असे की, आमच्या या आंबाबोडी खालच्या वावरातील धान-कापणी होऊन भारे-बांधणी व डुहरणी सुरू होती. मजूर लोक कळपे सावरून भारे/बोझे बांधून ते भारे बैलगाडीने घरच्या वाडीत आणून तेथे तयार केलेल्या खऱ्यानीत पुंजना रचण्याचे काम करीत होते. वडील म्हातारपणामुळे शेतात जाऊ शकत नव्हते, आम्ही त्यांना शेतात जाऊ देत नसू. पाय घसरून पडले तर या वयात सावरणे कठीण असल्याने आम्ही त्यांना शेतात जाऊ देत नसलो तरी ते शेतात जाण्याचा हट्ट करीत. मी त्यांना समजावून स्वतः शेतात जाऊ लागलो होतो. मी शेताकडे जाताना सोबत एक काठी घेऊन जाण्यासाठी मला वडील(बाबूजी) नेहमी सांगत असत. पण मी त्याचे अनुपालन क्वचितच करीत असे.

त्यादिवशी सुद्धा मी घरून आंबाबोडी खालच्या वावराकडे जायला निघालो तेव्हा बाबूजींनी मला काठी सोबत घेऊन जाण्यास सांगितले. पण मी काठी न घेताच शेतात निघालो. आंबाबोडीच्या पारीवरून शेतात जावे लागते. पारीवर चार-पाच मोठमोठी आंब्याची झाडे आहेत. त्या झाडांखालूनच जावे लागते. मी त्या झाडांखालून पारीने जात-जात चार झाडे ओलांडली. पाचव्या झाडाखालून जाताना अगदी बुडाजवळ माझ्या डोक्याच्या उजव्या भागावर काहीतरी पडले. मी प्रतिक्षिप्त क्रियेने ती वस्तू झटकली व काय आहे म्हणून मागे वळून पाहिले असता झाडाच्या बुडाजवळ एक चार-पाच फूट लांबीचा साप/सरप माझ्या दृष्टीस पडला. मी लहानपणापासूनच सापाला अजिबात भीत नसल्याने मी न घाबरता त्याला हाट् हाट् केले. पण तो मात्र जागचा हलला नाही. त्याची माझी नजरानजर झाली, तो एकटक माझ्याकडे पाहत होता, पण जागचा हलत मात्र नव्हता.

मी तेथूनच बोझे/भारे बांधणाऱ्या मजुरांना हाक मारली व एक काठी घेऊन पळतच यायला सांगितले.

एक मजूर काठी घेऊन धावतच आला. तो माझ्याजवळ पोचेपर्यंत सुमारे चार-पाच मिनिटे लागली असावीत. या संपूर्ण कालावधीत तो साप माझ्याकडे एकटक पाहत निश्चल थांबून होता. हातात काठी घेतलेल्या मजुराची चाहूल लागताच मात्र तो साप पळू लागला व लवकरच बोडीच्या पाण्यात विलीन झाला. मजुराने त्याचा पाठलाग केला पण बोडीच्या पारीच्या उतारामुळे मजूर जोराने धावू शकला नाही व साप बोडीच्या पाण्यात विलीन होऊ शकला. मजूर म्हणाला, ''अजी, हा ढोंड्या सरप होय, जरासा नांगावानी दिसते मून लोक बेकारच बिह्यतत. याचा जहर नाही लागे.''

मग मी मजूरासोबतच शेतात गेलो व बोझे/भारे बांधत असलेल्या बांधीच्या धुऱ्यावर बसून निरीक्षण करू लागलो. बसल्या-बसल्या मी विचार करू लागलो की, शेतात जाताना काठी घेऊन जा, असे बाबूजी वारंवार कां सांगत होते? बिनविषारी सापालाही काठीशिवाय असलेल्या माणसाची बिलकुल भिती वाटत नाही, उलट तो त्याला घाबरवण्याचाच प्रयत्न करतो, हे मला अखेर प्रात्यक्षिकाद्वारे समजले होते.

२५ जानेवारी २०१८ ला वयाच्या ८८ व्या वर्षी बाबूजी गेले, त्याला चौदा महिने होत आहेत. शेतात जाताना हातात काठी असावीच, ही शिकवण मात्र कायम शिकवून गेले बाबूजी!

तर अशी ही साप, काठी आणि शेतशिवाराच्या फेरीची शिकवण या संबंधीची साठा उत्तराची संक्षिप्त कहाणी आहे!

**- लखनसिंह कटरे**
भ्रमणध्वनी : ७०६६९६८३५०
lskatre55@gmail.com

सामाजिक जाणिवेने लोकोपयोगी प्रकल्प-उपक्रम समाजमनात रुपजवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठ्या कल्पकतेने देवराई संवर्धनाच्या आधारे पर्यावरण संवर्धनाचीही संकल्पना राबवली आहे. गेल्या महिन्यात पार पडलेल्या (२१ मार्च) जागतिक वनदिनाची आठवण ताजी करणारा 'देवराई' संकल्पनेचा हा संक्षिप्त आढावा...

♦ ♦ ♦

# देवराई मानवीजीवनाचा आधारवड

**अरुण मळेकर**

♦ ♦ ♦

जर सामाजिक जाणिवेने एखादा लोकोपयोगी प्रकल्प-उपक्रम समाजमनात रुजविण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठ्या कल्पकतेने असलेल्या देवराई संवर्धनाच्या आधारे आपसूक पर्यावरण संवर्धनाची संकल्पना चालवली आहे, हे कौतुकास्पद आहे. देवराई क्षेत्रात विश्वव्यापी, कृपावंत परमेश्वराचा अधिवास आहे ही भावना तथा श्रद्धा त्यापाठीमागे असल्याने या क्षेत्रातील निसर्ग वैभवाचा वापर अर्थार्जनासाठी तसेच अन्य फायद्यांसाठीही करायचा नाही. आणि त्याला हानी पोचता कामा नये या भावना-श्रद्धेने देवरायांचे संवर्धन आपसूक होतेय.

ते क्षेत्र देवालाच अर्पण केल्याने त्या क्षेत्रात स्वत:च्या स्वार्थासाठी मानवी हस्तक्षेप होत नाही. हे वनक्षेत्र आहे त्याच स्थितीत पूर्वापार, विनासायास सांभाळले जाते. निसर्गनिर्मित जे आहे ते त्याच स्थितीत संवर्धन करणे हे तर पर्यावरणशास्त्राला अभिप्रेत आहे.

अशा निसर्गनिर्मित देवराईला कुंपण नसते, तसेच राखणदाराचीही आवश्यकता भासत नाही. सामाजिक-धार्मिक भावनेमुळे हे क्षेत्र निसर्गक्रमानुसार आपसूक, सुरक्षित वाढत असून ते सुरक्षित आहे. देवराई ओळखायला येणं तसं सोपंच आहे. ग्रामीण विभागात मानवी वस्तीपासून काही अंतरावर हिरवाईने व्यापलेले क्षेत्र दिसले की, ती देवराई आहे हे समजायला वेळ लागत नाही.

मानवी जीवनाला भरभरून देणाऱ्या हा निसर्गाच्या औदार्याचा अनुभव घेण्यासाठी प्रत्यक्ष देवराईला भेट दिल्यास वनपर्यटनाबरोबर परस्पर निसर्गवाचनाची सवय ही माणसाला लागणारच. कुठेच मानवी हस्तक्षेप नसल्याने आपल्याच मस्तीत उंचच उंच वाढणारी वनसंपदा जणू सूर्यप्रकाश, हवा-पाण्यासाठी एकमेकांशी स्पर्धाच करताना येथे आढळतात. येथील महाकाय वृक्षांच्या आधारावर अनेक प्रकारच्या आणि विविध आकाराच्या वेली, वृक्षांच्या सभोवतालचा झाडोरा, मुक्तपणे संचार करणारे विविध प्राणी, पक्षी- त्यांचा सुखद आवाज, त्यात एखाद्या जलाशयाची नीरव शांता, कधी वाहत्या ओढ्यांचा लयबद्ध आवाज ही भूलोकीची सारीच अद्‌भुत दुनिया म्हणजे परमेश्वराचं लख्ख दर्शन घडवणारा नजारा असतो.

आज जागतिक वारसायादीत समावेश झालेल्या आपल्या अगडबंब सह्याद्री घाटमाथ्यावरच्या अनेक देवरायांत हा साक्षात्कारी अनुभव घेणं शक्य आहे. देशभराच्या आज अस्तित्वात असलेल्या देवरायांच्या आकारमानासह त्यातील वनवैभवातील वैचित्र्यात विविधतेचे वैभव आढळते. देवराईचं महत्त्व हे तिच्या आकारमानापेक्षा तेथील आढळणाऱ्या वेगवेगळ्या प्रजातींवरही आहे.

महाराष्ट्र भूमीला वरदान लाभलेल्या पश्चिम घाटमाथ्यावरच्या दोन्ही बाजूकडील देवराई क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. त्यात प्रामुख्याने सातपुडा पर्वतरांगा, विदर्भातील भंडारा-गडचिरोली प्रदेशातील त्यांचे प्रमाण दखल घेण्यासारखे आहे. त्याचे एक कारण म्हणजे येथील आदिवासी भूमिपुत्रांची वस्ती हे आहे कारण या



मागासलेल्या वसाहतीतील लोकजीवनात सभोवतालच्या निसर्गत:च परमेश्वर आहे, ही त्यांची धारणा त्यापाठीमागे आहे. खरंतर पर्यावरण संवर्धनाचे अनमोल काम स्थानिक आदिवासी आणि पशु-पक्ष्यांनी निसर्गवेळापत्रकानुसार झकास सांभाळलं.

मानवी जीवन समृद्ध करण्यासाठी देवराईचा निसर्ग खजिना आपल्याला भरभरून देत असतो. तेथील जैवविविधतेसह अनेक प्रकारच्या वनस्पती वैद्यक अहवालाही उपकारक ठरल्यात, याशिवाय अनेक प्रकारच्या वेली, झुडपांचा परस्पर आपल्याला सुखद सहवास देतो. अनेक प्रकारचे कीटक, सस्तन प्राणी मुक्तपणे विविध आवाजांसह संचार करणारे अनेक प्रकारचे पक्षीराज आणि दुर्मिळ शांतता या देवराईत अनुभवताना निसर्गराजा आम्हाला किती मुक्तपणे देतोय आणि आम्ही कृतघ्नपणे त्याची परतफेड कशी करतो हा अंतर्मुख करणारा विचार आपल्याला अस्वस्थ करणारा आहे याची जाणीवही येथे वावरताना होते.

प्रत्येक गडकोटावर एकतरी मंदिर आणि जलस्रोत असतोच तसेच देवराईच्या वनवैभवातही हे असणारच. त्यामुळे देवराईचं वनवैभव सुरक्षित राहतं ही लोकांची भावना आहे. अखंड पाणीपुरवठा करणारी विहीर. सतत वहाता झरा, ओहोळ, ओढा किंवा नदीतरी असणारच. हा जलस्रोत म्हणजे चमत्कार आहे. परिसरात पाणीपुरवठ्याचे दुर्भिक्ष्य असते पण जवळील उंचावरच्या देवराईमधील जलसाठ्यावर स्थानिकांची गरज भागते. देवराईमुळे आपल्याला पाण्याचा दुष्काळ पडणार नाही ही ग्रामस्थांची भावना असल्याने देवराईचं आपसूक संरक्षण होते.

आज एकूण वनक्षेत्रापैकी ९ टक्के भागावर देवराई क्षेत्र आहे. महाराष्ट्रात सुमारे ३५ टक्के प्रजाती देवराईमध्ये आढळतात. थोडक्यात देवराईचं संवर्धन म्हणजे मानवी जीवनाला आधारवड आहे. कारण विपुल जलस्रोत, औषधी वनस्पती, जळाऊ, लाकूडफाटा, विविध प्रकारची फळं, फुलं हे सर्व देवराई क्षेत्रच आम्हाला उपलब्ध करून देत असते.

**देवराईतील मंदिरे**

देवराईच्या हिरवाईयुक्त वातावरणातील येथील प्राचीन मंदिरे ही स्थानिकांची श्रद्धास्थानं आहेत. बऱ्याच मंदिरांचा चेहरा हा पुरातन बाजाचा आहे. या मंदिर वास्तू उभारण्यासाठी सभोवतालच्या उपलब्ध नैसर्गिक सामुग्रीचा वापर केल्याने त्या सभोवतालच्या वातावरणाशी सुसंगत वाटतात. पण दुर्दैवाने त्यांची प्राचीन स्थापत्त्यकला दुर्लक्षितच आहे. हा प्राचीन वारसा संवर्धन व्हायला हवा.

वनराईतील बऱ्याच मंदिरांना इतिहासाबरोबर दंतकथेचे कोंदणही आहे. तर काही मंदिराच्या बांधकामावर यादवकालीन स्थापत्यकलेचा प्रभाव जाणवतो. काही मंदिरावर प्राचीन कलापूर्ण आविष्कार दाखवताना जे काष्ठशिल्प आहे, ते मंदिरांचे सौंदर्य खुलवते. या मंदिर वस्तूंच्या अस्तित्वाने वनराई क्षेत्राचे आपसूक संवर्धन होते. त्यापाठीमागे भाविकांची श्रद्धा आहेच. या श्रद्धेमुळेच



देवराई क्षेत्राचे संवर्धन होते.

विस्तारत चाललेल्या शहरीकरण, विकास कामांमुळे देवराई क्षेत्राला धोका निर्माण व्हायला लागलाय. त्यात वनपर्यटनाची संकल्पनाच न जाणणाऱ्या, स्वैराचारी पर्यटकांच्या स्वैर वागण्याने देवराईला धोका निर्माण झालाय. निसर्ग ओरबाडून आपला स्वार्थ साधताना श्रद्धा, पावित्र्य या गोष्टी गौण ठरताहेत. हा धोका रोखण्यासाठी स्थानिकांमध्ये लोकजागृतीबरोबर, लोकजागृतीसाठी प्रयत्न व्हायला हवेत. देवराई क्षेत्रांचा ऱ्हास हा आमच्या आरोग्यालाही घातक आहे. देवराईचा संबंध आमच्या अर्थकारणाशीही निगडित आहे. पूर्वजांनी देवराईला देवस्वरूप देऊन श्रद्धेने संवर्धन केले होते. दैनंदिन गरजेपुरती निसर्ग दौलत प्राप्त करून घेताना तितकीच त्याची कृतज्ञतेने परतफेड केली जायची. आता निसर्ग ओरबाडण्याच्या काळात या जाणिवेचीच उणीव आहे.

हा ऱ्हास वाचवण्यासाठी 'पर्यावरण दक्षता मंच'सारख्या अशासकीय सेवाभावी संस्थेचे एकाकी चाललेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांच्या सहभागानेही खूप काही साधता येईल, मात्र त्याकरता जाणीवजागृती हवी.

**- अरुण मळेकर**
भ्रमणध्वनी : ९८६९११८५०१
arun.malekar10@gmail.com

**गदिमा जन्मशताब्दी निमित्ताने त्यांनी लिहिलेल्या गीतरामायण व गीतगोपाल या दोन कलाकृतींच्या बलस्थानांचा आढावा घेणारा मर्मग्राही प्रतिभाशोध...**

♦ ♦ ♦

# दोन खंडकाव्य - गीतरामायण आणि गीतगोपाल

**मधुवंती सप्रे**

♦ ♦ ♦

**गीतरामायण**

गदिमांचा 'जोगिया' हा काव्यसंग्रह ते असतानाच प्रकाशित झाला. दुसरा 'पूरिया' हा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्यूनंतर आला. हजारो गीतं गदिमांनी लिहिली. संगीतिका लिहिल्या. परंतु गीतरामायण हे ५६ गीतांचं महाकाव्य आकाशवाणीने श्रोत्यांपर्यंत पोचवलं आणि संगीतकार सुधीर फडके यांनी रंगमंचावर सादर करून ते जनमानसात आणखी लोकप्रिय केलं. एकतर महर्षी वाल्मिकींनी लिहिलेली श्रीराम कथा ही आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. श्रीराम हे अनेकांचं दैवत आहे. ही रामकथा सर्वांना परिचित आहे. रामाचा वनवास, सीतेला रावणाने पळवलं, रावण वध, मारुतीचं लंका दहन, रामाने सीतेला युद्ध करून सोडवणं आणि लोकापवादामुळे तिला टाकून देणं. किंवा ती गर्भवती असताना तिचा त्याग करणं, इत्यादी कथा ज्ञात असताना त्या कथेला गीतरूपात लिहिणं आणि संगीतबद्ध करून सादर करणं आणि ते लोकप्रिय होणं या तिन्ही गोष्टी अद्‌भुत आहेत.

कविश्रेष्ठ गदिमांचे शब्द आणि बाबूजींचं सोज्ज्वळ संगीत व गायन असा एक सुवर्णयोग जमून आला. कुणाच्या ध्यानीमनी नसताना एक उच्च दर्जाची कलाकृती निर्माण झाली. नुसताच उच्च दर्जा नव्हे तर गीतरामायणाला अढळ असं ध्रुवपद मिळून गेलं. त्यासाठी कोणतीही खटपट करावी लागली नाही. सर्व थरातल्या लोकांनी, कलावंतांनी, बुद्धिमंतांनी, राजकारण्यांनी, संगीततज्ज्ञांनी, सर्वांनीच या अजोड कलाकृतीला मान्यता दिली.

गीतरामायण ही कलाकृती शब्द आणि संगीत यामुळे इतकी मान्यता का पावली? याचा शोध घेताना आज एक महत्त्वाची अशी गोष्ट लक्षात येते की संगीतबद्ध केलेलं गीतरामायण सुधीर फडके यांच्या गळ्यातून ऐकणं हा एक वेगळाच पैलू या कलाकृतीचा आहे. परंतु जेव्हा व्यक्ती एकटी असते. ती गीतरामायणाचं पुस्तक वाचते. तेव्हा पूर्वी ऐकलेल्या गीतरामायणाच्या चाली आठवतात, परंतु हातात असतात ती ५६ गीतं. स्वतःशी वाचताना त्या गीतामधले शब्दच आपल्याला भारून टाकतात. ती संगीतबद्ध गीतं ऐकायची असतील तर दुसरं काही साधन ते ऐकण्यासाठी उपलब्ध असावं लागतं. परंतु पुस्तक हातात घेतल्यावर त्या अभिजात शब्दाच्या वाचनाने, त्या शब्दांमधलं अर्थाचं, आशयघनतेचं, तरल कल्पनांचं, संगीत आपल्याभोवती दरवळू लागतं. 'नाद, रस, रूप, गंध' याचा प्रत्यय ही गीतं वाचताना येतो.

निवेदकापासून अयोध्यावासीपर्यंत प्रत्येकाने या गीतातून रामकथा उलगडली आहे. त्यात रामाच्या तीन माता, पत्नी सीता, तिच्या तीन बहिणी (ज्या तिच्या जावा होत्या), लक्ष्मण, भरत, दशरथ, शबरी, शूर्पणखा, हनुमंत, वाली, लवकुश इत्यादी. गदिमांनी या प्रत्येकाच्या शब्दांना जे वजन आणि चैतन्य प्राप्त करून दिलं आहे ते थक्कं करणारं आहे.

जेव्हा दशरथाला मूल नव्हतं तेव्हा दशरथाच्या तिघी पत्नी खिन्न असत. कौसल्या म्हणे,

'काय काज या सौख्य धनाचे ।
कल्पतरूला फूल नसे का ।



वसंत सरला तरी ।'

श्रीराम व त्याचे बंधू म्हणजे कल्पतरूचे फूल! गदिमा जे लिहितात, ते किती अंतःकरणापासून! त्यांचं मन संतपंत, शाहीर, आधुनिक कविता, इंग्रजी कविता व साहित्य इत्यादींनी काठोकाठ भरलेलं. इतकं त्यांनी पचवलं होतं. त्यांचं मन रत्नाचे हंडे जमिनीखाली असावेत तसं शब्दांनी आशयाने संपृक्त झालेलं होतं. ते सगळं उसळी मारून वरती येई जेव्हा ते लिहायला बसत तेव्हा. केवढं अपार धन त्यांनी आमच्या पुढ्यात आणून ओतलं त्याची मोजदाद आम्हाला करता येत नाही. कौसल्या म्हणते,

'गगन आम्हाहुनी वृद्ध नाही का ।
त्यात जन्मती किती तारका ।
अकारण जीवन हे वाटले ।'

तिला मूल नाही म्हणून ती असा विचार करते. स्त्रीचं मनही गदिमा परकाया प्रवेश करून जाणतात. जेव्हा राम जन्मला तेव्हा कौसल्येच्या डोळ्यांतून सुखाचे अश्रू ओघळले. पण संपूर्ण पृथ्वी डोलत होती.

बुडूनी जाय नगर सर्व नृत्य गायनी
सूर रंग ताल यात मग्न मेदिनी
डोलतसे तीही जरा शेष डोलला । राम जन्मला...

पुढे कैकयी दशरथाला त्याच्या वचनाची आठवण देऊन, भरताला राजा करा म्हणते आणि रामाला वनवासात पाठवते. हे जेव्हा भरताला कळतं तेव्हा भरत म्हणतो, 'माता न तू वैरिणी'

गदिमांच्या ५६ गीतांचा जरी इथे ऊहापोह शक्य नसला तरी गीतरामायणातली काही गीतं एखाद्या सुभाषितासारखी आपल्या मनात रुंजी घालतात. उदा.

'आकाशाशी जडले नाते धरणी मातेचे । स्वयंवर झाले सीतेचे'

देव आकाशात राहतात आणि सीता तर धरतीची मुलगी. म्हणून असे शब्द गदिमा सहज लिहितात तर राम वनवासाला निघाला तेव्हा सीता म्हणते,

'निरोप कसला माझा घेता । जेथे राघव तेथे सीता
जाया-पति का दोन मानता?'

असा प्रश्नही ती विचारते. गदिमांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संगीतबद्ध करण्यासाठी लिहिलेली गीतं ही ३-४ कडव्यांची असतात, पण गदिमा मात्र प्रत्येक गीत ८-१० कडव्यांचं लिहितात. कारण त्या प्रसंगाचा संपूर्ण भाव, विचार, व्यक्तीचा स्वभाव, तिचं मन जोपर्यंत त्यातून प्रत्ययाला येत नाही तोपर्यंत गदिमांची लेखणी थांबत नाही म्हणून इतकी प्रदीर्घ रचना ते लिहीत असावेत अशी कल्पना करता येते.

श्रीराम आईवडिलांशी बोलतो. पत्नी व लक्ष्मण, अयोध्यावासी यांच्याशी बोलतो, पण जेव्हा तो भरताला आयुष्याचं तत्त्वज्ञान सांगतो तेव्हा मात्र त्याचा वचन पाळण्याचा निर्धार, वडिलांची आज्ञा पाळण्याचा निग्रह आणि राज्याचा मोह तत्काळ सोडून देण्याचा मनाचा थोरपणा लक्षात येतो. तो कुणालाही दोषी मानत नाही. म्हणून तर...

दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा

या दोन ओळीतच केवढंतरी तत्त्वज्ञान सामावलेलं आहे. आजही आपण त्याचा अनुभव घेत असतो. कितीही कष्ट केले तरी जेव्हा संकटांचा रस्ता संपत नाही तेव्हा दैवजात दुःख भरलेली आहेत असं सामान्य माणसाला वाटत राहतं.

जिवासवे जन्मे मृत्यू जोड जन्मजात
दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत
पुढच्या कडव्यात ते लिहितात,
अतर्क्य ना झाले काही जरी अकस्मात
मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा

गदिमा सर्वसामान्यांना समजेल आणि बुद्धिवंतांना ही विचार करायला लावेल असं सुगम पण अर्थपूर्ण लिहितात. जन्माबरोबर मृत्यू जन्मतो आणि एकदिवस प्रत्येक गोष्ट लय पावतेच. किती शब्दशः क्षणभंगुर जीवनाचं चित्र ते समोर ठेवतात. पुढचा क्षण काय आहे कुणाला ठाऊक असतं?

काही अतर्क्य नाहीच आपल्याला ते अकस्मात घडलं असं वाटलं तरी. त्यामागे कार्यकारण भाव असतोच. विचारी माणूस ते जाणतोच म्हणून मरण कल्पनेशी थांबे. तर्क जाणत्याचा किंवा तर्क जाण त्याचा असे शब्द गदिमा लिहितात. तर्क जाणून घे किंवा जाणत्या लोकांचा तर्क हा विचारपूर्वक केलेला असतो हेही तू जाणून घे. जरामरण यातून कोण सुटलं? कोणी आयुष्यात दुःख मुक्त असतो का? 'वर्धमान ते ते चाले मार्ग रे क्षयाचा ।' तेच जे जन्मतं, ते नाश पावतंच. 'दोन ओंडक्यांची होते सागरात भेट ।' एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही गाठ । हे उदाहरण देतानाच ते पुढे लिहितात माणसांचा मेळ, माणसाचं एकत्र येणं, दुरावणं, एकमेकांवर प्राणांतिक प्रेम करणं हे सगळं क्षणिक आहे.

पुन्हा-पुन्हा गदिमा श्रीरामाच्या निवेदनातून जीवनाचं तत्त्वज्ञान मांडतात. ह्या गीतातल्या ओळी वर लिहिल्याप्रमाणे सुभाषितासारख्या, श्रोत्यांच्या-वाचकांच्या मनात घर करून आहेत.

श्रीरामाच्या गुणांचं, एक पत्नीत्वाचं गुणगान पूर्वी ऐकताना किंवा आता वाचत असताना एका गीताच्या दोन ओळी आपल्या काळजाचा ठाव घेतात. त्या म्हणते जेव्हा लक्ष्मण सीतेला ती गर्भवती असताना वनात वाल्मिकीच्या आश्रमापासून जवळ सोडायला जातो. तेव्हा सीता म्हणजे 'मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे?' हा तिचा प्रश्न आजही छळत राहतो. कारण, ती रामाला कोणतीही दूषणं देत नाही तर म्हणते,

'वनात विजनी मरूभूमीवर ।
वाढवीन मी हा वंशांकुर ।
सुखात नांदो राजा रघुवीर ।
जानकी जनातून आज उठे ।'

'जानकी जनातून आज उठे' या एका ओळीतच नवऱ्याने केलेला अन्याय ती सूचित करते. इतकंच काय 'जे शाश्वत त्याचा देठ तुटे' असंही ती म्हणते. संतापाच्या भरात अद्वातद्वा बोलून दाखवण्यापेक्षा ती 'जे शाश्वत त्याचा देठ तुटे'क म्हणते. ही केवढी क्षमाशीलता म्हणायची. चूक नसताना घरातून घालवलं जातं,

विजनात पाठवलं जातं, तेही ती गर्भवती असताना. तरीही ती आपण जनकाची मुलगी आहोत, आपल्यावरचे संस्कार, सुसंस्कृतपणा याचं भान ठेवूनच ती लक्ष्मणाला विचारते, 'सांग लक्ष्मणा जाऊ कुठे?'

गदिमांनी असा प्रश्न उपस्थित करून सीतेची व्यथा किती संयमी आणि अर्थपूर्ण शब्दात मांडली आहे, ते या शब्दांचा त्या मागील भावविभाव याचा शोध घेताना लक्षात येतं. इथे ती रामायणातल्या सर्व स्त्रिया व पुरुष आणि खुद्द रामापेक्षाही थोर ठरते. गदिमांनी तिचे हे साध्वी रूप तिच्यातलं संस्कारी मन, बुद्धीने विचार करणारी स्त्री, भावनांवर विजय मिळवणारी स्त्री अशा स्वरूपात मांडलं आहे. गदिमांनी केवढा विचार केला असेल, 'मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे?' हा प्रश्न विचारताना? असं वाटत राहतं, कारण असा प्रश्न विचारणं म्हणजे पुढे कडाकडा बोटं मोडून शिव्याशाप देणं हे ओघाने आलंच, पण सीतेचं एका स्त्रीचं अंतरंग जाणणारे गदिमा. असा प्रश्न विचारून वाचकांच्या विचारांना पूर्ण कलाटणी देणारं गीत लिहितात आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे जो काही रामाबद्दलचा राग असेल त्याचं रूपांतर करुणेत होऊन सीतेची मनस्थिती ते फक्त सूचित करतात.

संगीतबद्ध गीतरामायण ऐकून एक वेगळ्या प्रकारचा आनंद मिळतो. पण गीतरामायणाचं पुस्तक वाचताना गदिमांच्या प्रतिभेची अधिक प्रखर जाणीव शब्दाशब्दातून होत राहते. वाचक समृद्ध होत जातो. त्या गीतांचे अर्थ फक्त रामकथा इतकीच न राहता मराठी भाषेचा साहित्याचा, वाङ्मयाचा भारतीय सनातन पण आधुनिक अशा मूल्यांचा पैस अर्थ व आशयासह विस्तारत जातो. यात निसर्ग असतो. पंचमहाभूतांचं साहचर्य असतं. मानवी मनाचे अनेक पापुद्रे उलगडलेले असतात. तत्त्वज्ञान असतं आणि या पार्श्वभूमीवर प्रेमही झंकारत असतं. असं हे गीतरामायण म्हणजे कवितेचं अस्सल रूप आहे. तुकारामांनी लिहिल्याप्रमाणे आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने,

शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ।<br>
शब्द हे आमुच्या जीवीचे जीवन ।<br>
शब्द वाटू धन जन लोका ।

गदिमांनी हे शब्दांचं धन लोकांना वाटून टाकलं आहे. त्याचा आस्वाद, उपभोग आम्ही घेत राहणार आहेत. 'गदिमा वा!' इतकंच म्हणण्याइतके शब्द आम्हाला सापडतात.

**गीतगोपाल**

श्रीरामावर गीतरामायण तर श्रीकृष्णावर गीतगोपाल या दोन गदिमांच्या निर्मिती म्हणजे खंडकाव्य आहेत. दोन्हीमधे देवपदाला पोचलेले नायक श्रीराम आणि श्रीकृष्ण जनमानसात रुजलेले देव. त्यातही श्रीकृष्ण जास्त लोकप्रिय असलेला देव; प्रियकर, राजकारणी, संगीततज्ज्ञ, मित्र, धोरणी, डावपेच खेळणारा, गीता सांगणारा व 'न धरी शस्त्र करी मी' म्हणूनही युद्धात भाग घेणारा. असं लोकप्रिय नाव. भारतीय भाषांमधल्या सर्व कवींना भुरळ घालणारा कृष्ण, लहानपणी खोड्या करणारा, दही, दूध, लोणी चोरणारा, बासरी वाजवणारा, गाई वळवणारा गौळी, तरीही गीतेचं तत्त्वज्ञान सांगणारा तत्त्ववेत्ता म्हणून पुढे कीर्तीवंत झाला. श्रीकृष्णावर अनेक गीतं मराठीत लिहिली गेली. तरीही गदिमांसारख्या महाकवीला परत कृष्णगाथा गीतातून सांगावी अशी मानसिक निकड निर्माण झाली हे आश्चर्यकारकच.

श्रीराम सत्यवचनी, एक पत्नीव्रत पाळणारा तर श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा व्यामिश्र, आणि कुणालाही मोहून टाकील अशी. श्रीरामाचा महिमा संस्कृती गात राहिली. पण श्रीकृष्ण आजही इथे आपल्या जवळचा वाटत राहतो. गाण्यातून आणि गीता या ग्रंथामुळे. कारण आज न्यायालयात सत्य बोलण्याची शपथ 'गीते'वर हात ठेवून घेतली जाते. त्या अर्थाने श्रीकृष्ण आजही आपल्यात आहे. त्याची आणखी एक स्मृती आजही कायम आहे. म्हणजे श्रावणातला गोपालकाला किंवा दहीहंडीचा उत्सव. आज त्याचा इव्हेंट झाला आहे. हा भाग वेगळा पण श्रीकृष्ण सर्वसामान्यांच्या मनात अशा तऱ्हेने वसलेला आहे. पुन्हा ते राधाकृष्णाचं प्रेम हा एक सार्वकालीन विषय आहे. राधा ही काल्पनिक व्यक्तिरेखा आहे असं संशोधकांनी लिहून ठेवलं असलं तरी राधाकृष्ण ही जोडी मानली जातेच.

गीतरामायण आणि गीतगोपाल हे दोन्ही कविता खंड लिहिले गेले. त्याची पार्श्वभूमीही भिन्न आहे. 'गीतरामायण' ही आकाशवाणीची गरज होती. काहीतरी नवीन असं श्रोत्यांना द्यावं हे त्यावेळचे पुणे आकाशवाणीचे केंद्राधिकारी श्री. लाड यांना स्फुरलेली कल्पना. त्या कल्पनेचं रूपांतर महाकाव्यात आणि संगीतात करण्याचं श्रेय गदिमा आणि सुधीर फडके यांचं. पुढे ते अजरामर ठरलं.

तर गीतगोपाल हे सह्याद्री साप्ताहिकात प्रसिद्ध होत होतं. गीतगोपालची ३५ गीतं गदिमांनी लिहिली. कृष्ण जन्मापासून ते गोकुळात तो वाढला आणि अक्रूराबरोबर मथुरेला जाईपर्यंतची कथा या गीतामधे आहे. श्रीरामाप्रमाणे इथे कृष्णाचं पूर्णचरित्र किंवा जीवनपट आलेला नाही. श्रीकृष्णाचं जगणं हे वेगवेगळ्या पातळ्यांवर झालेलं आहे. एकदा गोकुळ आणि बासरी मागे सोडून दिल्यावर परत त्यानं तिकडे वळूनही पाहिलं नाही. तो पुढेपुढे जात राहिला आणि महाभारतात सल्लागाराची, मैत्रीची, तत्त्ववेत्त्याची जागा पटकावून अजरामर झाला.

कृष्णाचा जन्मच मुळी तुरुंगात झाला. बालपण, गंमतीजमती, खोड्या, खेळ, आपल्या मोहक रूपाने, गुणाने, ग्रामस्थांना, स्त्रियांना वेड लावणारा लोभस कृष्ण, पण दुष्टाचं परिमार्जन तो त्या लहान वयातही करीत होताच. पूतना, कलिया इत्यादी राक्षस त्याने मारून टाकले. पुन्हा मी त्यातला नाही, हा भाव. तर आईला विश्वदर्शन घडवलं. श्रीकृष्णाची अफाट बुद्धिमत्ता स्तिमित करणारी आहे. गदिमा त्याचं पूर्ण चरित्र गीतातून लिहू शकले असते. इतकी उत्तुंग प्रतिभा त्यांच्याकडे होती परंतु गदिमा अनेक पातळ्यांवर काम करीत होते. चित्रपट कथा, पटकथा, गीतं, अभिनय, कादंबरी, नाटक, कथा, संगीतिका, आत्मचरित्रात्मक लेखन यात ते खूप व्यस्त होते. तरीही वयाच्या अठ्ठावन्न वर्षापर्यंत त्यांनी जे लेखन केलं ते अफाट असंच आहे. त्यात ते आमदारही होते. वयाच्या विसाव्या वर्षापासून ते अज्ञाताकडे जाईपर्यंत ३८ वर्ष ते सतत लेखन करत होते. हा लेखन यज्ञ पुन्हा अभिजात वाङ्मयात रूपांतरित होत गेला. त्यांची शब्दकळा म्हणजे फादर स्टीफन यांनी लिहिल्याप्रमाणे,




जैसी हरळा माजी रत्नकिळा । की रानामाजी हिरा निळा
तैसी भासा माजी चोखळा । भासा मराठी
मराठी असा प्रत्यय देणारी आहे.

गीतगोपाल म्हणजे कृष्ण मथुरेला जाईपर्यंतचं चरित्र. राधा सांगायला सुरू करते. सुरवातीला निवेदक आहे. बलराम (त्याचं बोबडं गीत) यशोदा, गोपी, नारद, कृष्ण, पेंद्या अशा वेगवेगळ्या लोकांच्या सांगण्यातून ही कथा आली असली. तरी मुख्य कथा सांगणारी 'राधा' आहे. सुरवातीला निवेदक म्हणजे कवी सांगतात,

शरच्चंद्रिका मूक हुंकार देते ।
वनी राधिका गीत गोपाल गाते
कदंबातळी बैसुनी सांजवेळी ।
खुळी आसवे बाळ कृष्णार्थ गाळी
व्यथा अंतरीची कथा रूप घेते ।।१।। वनी राधिका...

आणि मग राधा सांगते आहे. ते कृष्णाच्या जन्मापासून काय काय घडलं ते. ती म्हणते,

अजन्मा जन्मासी आला
कारागारी अंधःकारी कृष्ण जन्म झाला ।।धृ।।

मग देवकीने वासुदेवाला सांगितलं तेही राधाच सांगते आहे,

देवकी सांगे वासुदेवा
बाळ हा नंद घरी न्यावा
हाच अपेक्षित पुत्र आठवा
रक्षणार्थ या दूर पाठवा
गगन भाषिते जुनी आठवा ।। बाळ हा नंद घरी न्यावा ।

अजन्मा जन्माला आला किंवा 'गगन भाषिते' म्हणजे पूर्वी झालेली आकाशवाणी आठवा, कारण आठवा पुत्र कंसाचा वध करणारा आहे. गदिमा शब्दांचे विभ्रम इतके पेरीत जातात की त्याची लुसलुशीत रोपं मनात डोलायला लागतात.

वासुदेव मध्यरात्री निघालेही कृष्णाला टोपलीत घालून. पण पावसानं कहर केला.

निजवंश दीपका धरून शिरी । वासुदेव निघाले नंदघरी
स्वयेच वाटा पथ उलगडती ।
बाळ सुरक्षित अचल टोपली । चहुदिशी तमिस्त्रा रडे तरी ।
निजवंश दीपका धरून शिरी..

तमिस्रा म्हणजे अंधारी रात्र, त्यात मुसळधार पाऊस. पण वाटेत पावसाचं पाणी घेऊन फुंफाट धावणारी यमुना आडवी आली. त्या पुरातच वसुदेव उतरले पण यमुनेच पाणी चढत राहिलं, वासुदेव घाबरले. टोपली तरी किती उंच धरणार? नदीच्या पुरातच अडकले. पण यमुनेच्या पाण्यानं एक झेपेत कृष्णाचा अंगठ्याला स्पर्श केला आणि ती दुभंगली. तिने रस्ता तयार केला.

दुभंगले जळ बघता बघता
मार्ग झळकला दिसली सिकता
भांग जणू की रमणी माथा
जल शैल दोन त्यामधून दरी ।। वासुदेव निघाले नंदघरी

गदिमांची लेखणी शब्द कसे प्रसवते पाहा. नदीने रस्ता करून दिला. मार्ग झळकला. दिसली सिकता. सिकता म्हणजे वाळू. आणि रस्ता कसा रमणीच्या भांगासारखा सरळ रेषेतला आणि पाण्याचे ते डोंगर बाजूला होऊन त्यामधे दरी तयार झाली त्यात हा रस्ता.

गदिमांनी जणू चित्रच काढलं आहे. नाहीतरी थोर कलावंतांकडे अनेक कला सामावलेल्या असतातच.

या गीतगोपालमधेही गीतरामायणाप्रमाणे पुत्र जन्माचा सोहळा आहेच.

'मधुभाष दुंदुभीनी । सानंद घोष केला
नंदास पुत्र झाला ।'

असं म्हणून ते शेवटी लिहितात,

'कालिंदीच्या तटाकी ये पूर कौतुकाला ।'

मग कृष्ण दिसामासांनी वाढू लागला. तेव्हा 'समय पुरुष भूवरी स्वर्गचित्र काढतो.' असं वर्णन करताना ते लिहितात कृष्णाचा भाऊ बलराम, त्याला प्रश्न पडतो. हा कृष्ण रंगाने काळा का बरं आहे? आपल्या बोबड्या भाषते तो आई यशोदेला सांगतो, 'दूद नको पाज्यु हलीला काल्या कपिलेचे। काला या मनती आई ग पोल गुलाक्याचे ।' मग पूतना येते. कृष्णाविरुद्ध कागाळ्या करणाऱ्या गौळणी येतात. राधा स्वतःबद्दलच म्हणते, 'वाढ वयाची नवरी सुंदर पती चिमुकला दामोदर ।'

तर पेंद्या म्हणतो,

'बलवंताहुन बळी बाळ हा दिसतो जरी पोरगा ।
कृष्ण हा देवाहून दांडगा ।'

गावातल्या म्हाताऱ्या म्हणतात, 'अवतार म्हणा की म्हणा आणखी काही । या नंद सुताचे लक्षण बरवे नाही.' तर कुणीतरी षोडशी पाणवठ्यावर जाताना राधेला सांगते, 'प्रियकर माझा हरि । अगदी नकळत येतो जातो माझ्या मनमंदिरी । प्रियकर माझा हरी' तर गौळणी कृष्णाच्या खोड्यांनी हैराण झाल्याने यशोदेकडे तक्रारी घेऊन येतात. तेव्हा कृष्ण म्हणतो,

सांगती खोटे त्या गौळणी
आई ग मी न चोरीले लोणी ।
मला न चोरी शब्द ठाऊका
आळच घेती वृथा गोपिका ।
ऐकवती तरी कशी तुलाही निंदेची बोलणी ।।धृ।।

कृष्णाने यमुनेतला कालिया नावाचा सर्प मारला, बकराक्षस मारला. गोपी आंघोळीला गेल्या तेव्हा त्यांची वस्त्रे पळवली. अशी प्रत्येक कथेवरची ही गीतं आहेत परंतु कालिया मर्दन हे गीत तब्बल

२१ कडव्यांचं आहे.

'सर्प फणीवर कृष्ण नाचला. यमुनेच्या डोही
अशी अलौकिक कथा कधी कुणी ऐकलीच नाही.'
सगळं गोकुळ काठावर जमलं आणि शेवटी...
'आणि अचानक जल पृष्ठावर चमत्कार झाला
सूर्यबिंबसे दिसले श्रीमुख गोप सखा आला'
कृष्णाच्या बासरी वादनाचं वर्णन राधा करते,
'पावा वनी वाजतो
मधुर मनोहर तो मुरलीरव
भुलवी यौवन फुलवी शैशव
युवती युवती व्हावी हरिरत मंत्र असा योजतो ।'

कृष्ण पावा वाजवू लागला की अपरात्रीही गौळणी ह्या अनुरोधाने धाव घेत. तेव्हा कृष्ण त्यांना म्हणे, 'आलात कशाला येथे अपरात्री यमुनातीरी । गोकुळच्या गौळणींनो जा आपुल्या घरी माघारी' गोकुळात कृष्ण घरीदारी सर्वांनाच प्रिय होता, पण तिकडे मथुरेत नारदमुनी कंसाकडे आले आणि म्हणाले,

'अनंत जन्मांतरीचा वैरी
तुझ्या भगिनीच्या येऊन उदरी
वाढत आहे व्रजी श्रीहरी
ठावठिकाणा तुला न ठावा
गर्व शक्तीचा धरिसी अकारण
श्री नारायण जय नारायण

अर्थातच कंसाने अक्रूराला गोकुळात पाठवले, श्रीकृष्णाला आणायला.

श्रीकृष्ण - सख्यांनो मथुरेसी जातो
दानपति हा अक्रूर आम्हा सन्मानाने नेतो ।।धृ।।

तो आईवडिलांना वंदन करतो. पेंद्याला भेटतो. राधेला येतो म्हणतो. आणि सर्वांना सांगतो. 'माझी ही मोहनमुरली सांभाळा हिची संगत आता संपली.' अक्रूराला म्हणतो,

'गाई वत्से यमुना काळी
नमन कदंबा या शुभवेळी
धूळ येथली धरितो भाळी
चला अक्रूरा हय हाकारा
व्यर्थ उशीर होतो
सख्यांनो मथुरेसी जातो.'

कृष्ण गेला तो गेलाच. परत आलाच नाही. आणि शेवटी राधा म्हणते,

'माझ्यासाठी तरी एकदा
गोकुळी येऊनी जाई मुकुंदा
पाजिलेस तू अमृत पार्था
एक अश्रू रे मजला आर्ता
तव पुरुषार्था पूजीत राहीन
आठवीन तुज लाखलाखदा'

३५ गीतांमधे गदिमा कृष्णाचं गोकुळापर्यंत चरित्र सांगतात. ते सांगताना कृष्णाचे आई-वडील, यशोदा-नंद, भाऊ, गौळणी, गावकरी, अधेमधे येणारी विघ्नं या सर्वांचं वर्णन त्या त्या भूमिकेचा आत्मा सांभाळत लिहितात. सगळ्यांना ठाऊक असलेली कथा आपल्या आपण घडवलेल्या सुंदर शब्दांनी मांडतात. तेव्हा त्या शब्दांनी त्यातल्या आशयाने, अर्थाने आपणच श्रीमंत होत चाललो आहोत असं वाटत राहतं.

गीतगोपाल मधली काही गीतं मुंबई आकाशवाणीवर गायली गेली. नंतर संगीतकार सी. रामचंद्र यांनी या गीतांना रंगमंचीय स्वरूप दिलं. परंतु गीतरामायण जितकं गाजलं तितकं यश गीतगोपालला लाभलं नाही. पुढे संगीतकार यशवंत देव यांनी मुंबई दूरदर्शनवर यातली गीतं नव्यानं सादर केली. तरीही उत्कृष्ट असलेली आणि उत्कटता भरलेली ही गीतं जनमानसात रुजली नाहीत. परंतु पुस्तकरूपाने गीतगोपाल उपलब्ध असल्याने गीतं-कविता म्हणून त्याचा आस्वाद घेता येतो. ही कवितेवर प्रेम करणाऱ्या सर्वांना आश्वस्त करणारी गोष्ट आहे.

कवितेचं गीत रूप आणि गीत रूपातली कविता हा चमत्कार गदिमांचा. त्यांच्या आधी कुणी असं अलौकिक लिहिलं नाही. आणि त्यांच्या नंतरही नाही. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या दोन खंड काव्याचा पुनर्विचार करावा असं मनात आलं आणि गीतं वाचतावाचता त्यातली कविता दिसू लागली. त्यातल्या अर्थवाही भावपूर्ण शब्दांनी फेर धरला त्यात माझं मन ओढलं गेलं.

शतकात एखादाच असा प्रतिभावंत जन्माला येतो. ते नेहमी आपल्या पत्नीला सांगत, 'मला पुनर्जन्म नाही.' 'मी ७७ साली जाणार आहे.' असंही त्यांनी लिहून ठेवलं होतं.

शेवटच्या आजारात त्यांनी लिहिलं,
पान पिकले पिकले
आला शिशिराचा ऋतू
आता वाऱ्याच्या वेषाने
येई अनंत बाप्पा तू

माडगूळ या त्यांच्या गावची माती, औंधमधलं वास्तव्य आणि आईकडून आलेलं पुराणकथा मधलं भाषा वैभव, शाहिरीचा सहवास अशा अनेक संस्कारांनी विश्रब्ध असलेली त्यांची प्रतिभा मराठी भाषेला इतकं देऊन गेली की हे भांडार कधी रिकामं होणारच नाही. याची ग्वाही गदिमांची कविता देते. आणि हा महाकवी आपल्या सन्निध असल्याची जाणीव मनाला स्पर्श करून जाते.

शब्दार्थ :
सिकता - वाळू
तमिस्त्रा - अंधारी रात्र
हय - घोडा

**- मधुवंती सप्रे**
भ्रमणध्वनी : ९८२११७५३४९
madhuvanti.sapre@yahoo.com

**यंदाचे ज्ञानपीठ विजेते इंग्रजीतील लेखक अमिताव घोष यांच्या 'सी ऑफ पॉपीज' या कादंबरीचा अनुवाद नुकताच प्रकाशित झाला. या पुस्तकाचे अनुवादक कुमार नवाथे सांगताहेत या अनुवादाच्या प्रक्रियेचा अनुभव!**

♦ ♦ ♦

# अत्तराच्या कुपीची खाण

**कुमार नवाथे**

♦ ♦ ♦


**या** वर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे अमिताव घोष त्यांच्या इंग्रजी भाषेतील डौलदार लिखाणामुळे आधीच प्रसिद्धी पात्र झाले होते. मॅनबुकर आंतरराष्ट्रीय पुरस्काराकरिताही त्यांना नामांकन मिळाले होते. पद्मश्री देऊन भारत सरकारने त्यांची दखल घेतलीच होती. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या या पदवीधराच्या लिखाणाचा दबदबा एवढा होता व आजही आहे की, अमिताव घोष वाचणारा वर्ग हा खास वर्गात मोडणारा असाच जणू झाला होता.

मी स्वत: कधीही यापूर्वी अमिताव घोष यांची एक ओळही वाचली नव्हती. त्यांची पुस्तके जरूर हाती घेऊन ती चाळण्याचा प्रयत्न केला होता, पण तो तितकाच कारण एकतर त्या पुस्तकांचा लठ्ठपणा चारशे-पाचशे बारीक अक्षरातील पाने, एखादच पान उघडून जरा वाचायला घ्यावं तर त्यातील कठीण वाक्यरचना, कुठले तरी नवीनच एक-दोन अवघड शब्द-सारं अवसानच गळून जायचं. पुन्हा कधीतरी वाचू असं म्हणून पाहिलेलं पुस्तक-पुस्तके बाजूला पडायची. पण त्याचवेळी काहीही न वाचलेल्या या लेखकाबद्दलचा भितीयुक्त आदर द्विगुणित होत राहायचा.

पाचेक वर्षांपूर्वी लोकसत्तेमध्ये मी इंग्रजी पुस्तकांवर परिचयात्मक लिखाण वर्षभर करीत होतो. त्याकरिता बाजारात आलेली, गाजलेली नवीन विषय असलेली पुस्तके मी शोधून काढत होतो आणि तीन-चार दिवसात वाचून वर्तमानपत्राचे अर्धे पान एवढा त्याचा सारांशात्मक परिचय करून देत होतो. सारं वर्ष त्यामुळे मला तुडुंब आनंदाचं जगायला अनुभवायला मिळालं.

त्यातील काही पुस्तकांनी मनाचा ठाव घेतला. आपण समजतो त्यापेक्षा जग किती वेगळं आहे, भयाण आहे-क्रूर मतलबी आहे-सुहृदयी आहे. विविध स्वभाववैशिष्ट्यांनी परस्परविरोधी आहे. सारं वाचताना त्याविषयी लिहिताना सतत मनात येत राहायचे, ही सारी पुस्तके मराठी भाषेत यावयास पाहिजेत.

साऱ्या जगाने डोक्यावर घेतलेले अतीव स्वच्छ सुंदर, शिस्तबद्ध प्रामाणिक शहर सिंगापूर. हेच शहर फाशी शिक्षेची अंमलबजावणी करणारे, जास्तीत जास्त गुन्हेगारांना फाशीवर चढविणारा देश म्हणून कुख्यात आहे. ब्रिटिश पत्रकार ॲलन रॉडरक यांची तुरुंगातून सुटका झाली अशी वर्तमानपत्रात बातमी वाचली. त्यांचा गुन्हा काय होता तर त्यांनी या अमानवी शिक्षेची, अन्याय्य पद्धतीने राबवणी करणाऱ्या या देशाची लक्तरे 'True stories from Singapore's Deat Row - ONCE a Jolly Hang Man' हे पुस्तक लिहून जगासमोर आणली. त्याचदिवशी हे पुस्तक मिळवून जेव्हा मी त्यावर लिहिले, तेव्हा दहा वेळा जाऊन प्रत्यक्ष पाहून न कळलेला हा देश मला समजला. पत्रकार (मिड डे चे) ज्योतिर्मय डे यांची मुंबईत हत्या झाली. (तो खटला अजूनही चालू आहे) कारण त्यांनी लिहिलेले पुस्तक - Zero Dial - The Dangerous world of Informers' ज्या दिवशी त्यांच्या हत्येची बातमी आली, तेव्हाच हे पुस्तकही मी मिळवीत त्यावर लिहिले. लंडनच्या चेरींगक्रॉस या पुस्तक बाजारात फिरताना Bloody Foreigners हे रॉबर्ट विंडर यांचं पुस्तक मी पाहिलं मात्र, मीच फॉरिनर असल्याने लगेचच घेतलं,



वाचलं आणि माझ्या इतिहासाच्या ज्ञानात भरपूर भर पडली. अशीच अनेक पुस्तकं, प्रत्येक वेळी वाटायचं ही पुस्तकं मराठीत यावयास पाहिजेत. पद्मगंधाचे अरुण जाखडे यांस नंतर मी सांगू लागलो, तुम्ही पुढाकार घ्या. ही पुस्तकं, त्यांचे भाषांतराचे अधिकार तुम्ही मिळवा आणि मराठीत ती आणाच. अरुण जाखडेंनी प्रामाणिक प्रयत्न केले, पण कुठला व्यवहार होऊ शकला नाही.

असंच वर्ष गेले. माझे इतर लिखाण वगैरे चालू होते पण भाषांतर या प्रांतात शिरण्याचे माझ्या कधीही मनात आले नाही. जरी अनेक पुस्तके मी अनुवादित व्हावी म्हणून सुचवित होतो तरी.

आणि काही महिन्यानंतर अचानक अरुण जाखडेंचा पुण्याहून फोन आला, विचारायला की मी पुण्यास कधी येणार आहे म्हणून. नशिबाने त्याच दिवशी संध्याकाळी मी पुण्यास पोहोचणार होतो. तेव्हा त्यांनी लगेचच सांगून टाकले की त्यांना अमिताव घोष यांच्या पुस्तकाच्या भाषांतराचे अधिकार मिळाले आहेत आणि ते पुस्तक तुम्ही (म्हणजे मी) भाषांतरित करावे. कराल ना? त्यांचा प्रश्न. मला दोन मिनिटे काय उत्तर द्यावे हे समजेनाच. पण तो माझा होकार समजून त्यांनी सकाळीच घरी बोलाविले आणि अमिताव घोष यांचे पाचशे पानी पुस्तकी 'सी ऑफ पॉपीज्' हाती ठेवले. 'या पुस्तकाचा अनुवाद तुम्हाला करायचा आहे', असं म्हणून ते बहुधा माझ्या प्रतिसादाची वाट पाहू लागले.

मी यापूर्वी अमिताव घोष या व्यक्तीचा थोडा धसकाच घेतला होता, त्यातून बाहेर येऊन थोडं पुस्तकच लागतो आणि ती बावीस मोठमोठी प्रकरणं बघताना, प्रत्येक प्रकरणात नवीनच नावे, जागा, प्रसंग पाहाताना - आपल्यापुढे किती कठीण काम वाढून ठेवले आहे याची लगेचच खात्री पटली आणि त्याहीपेक्षा ही त्रिखंडात्मक कादंबरी आहे हे समजल्यावर माझी विचारशक्ती काही काळाकरिता थिजूनच गेली आणि त्याचं एकमेव सत्य, अगदी शंभर टक्के सत्य असण्याचे कारण एकच होते, की मी जरी सर्वप्रकारची पुस्तकं वाचत असलो तरी मला कादंबरी-मराठीतील सुद्धा वाचताच येत नाही. मी आतापर्यंत एकही कादंबरी वाचलेली नाही. माझ्या या अशिक्षितपणाची मला टोच आहे, पण कोणतीही मोठी कादंबरी वाचणं मला नेहमीच आव्हानात्मक वाटत आलंय आणि कदाचित म्हणून ती भीती माझ्या मनात घरच करून राहिली आहे.

अलिबाग कोकण मराठी साहित्यसंमेलनातील एक प्रसंग यावेळी प्रकर्षाने आठवतो. संमेलनाध्यक्ष श्री.ना. पेंडसे, यशवंत देव आणि मी लिमये वकिलांच्या बंगल्यावर वास्तव्यास होतो. त्यामुळे भरपूर गप्पा चालूच होत्या. माझ्याकडे असलेल्या पण न वाचलेल्या श्री.नां.च्या साऱ्या कादंबऱ्या मी त्यांची सही घेण्याकरिता म्हणून घेऊन गेलो होतो. सह्या करण्याचा सोपस्कार संपल्यावर श्री.नां. नी जणू परीक्षा घेण्याच्या थाटात मला एकेका कादंबरीबद्दल, तुम्हाला कोणती आवडली? का आवडली? त्यातील कोणतं पात्र आवडले असे (माझ्या दृष्टीने अवघड) प्रश्न विचारायला सुरुवात केली की त्या गाण्यातही माझ्या घशाला कोरडच पडली. नशिबाने शशी मेहताचे त्याचवेळी आगमन झाले आणि माझ्या अनुत्तीर्णतेचा शिक्का मारायचे वाचले.

'सी ऑफ पॉपीज' ही माझी कठीण परीक्षा ठरणार का याचं उत्तर 'हो... हे कठीणच काम आहे', हे मी थोडीशी पानं चाळल्यावरच जाणलं आणि आता ते पार पाडावयासच पाहिजे म्हणून मनाची सशक्त तयारीही केली.

ही संपूर्ण कादंबरी अद्‌भुत आहे, रसाळ आहे, कठीण आहे, गुंतागुंतीची-आनंदी देणारी, प्रचंड त्रास देणारी...! सारं सारं मी पुढील दोन वर्षे रात्रंदिवस अनुभवलं. पण मी पुढे पुढे जात राहिलो. एवढा वेळ लागण्याची कारणं अनेक होती. आमच्या घरातच एक लग्न होतं, मग मी लंडनला गेलो होतो. परत आल्यावर काही दिवसांनी नेपाळला कुटुंबीयांबरोबर सहलीला गेलो आणि शेवटी अमेरिकेत एक महिन्यांकरिता पण या साऱ्या ठिकाणी या कादंबरीची मला सतत सोबत होती. मोठ्या वहीचं बाड, डिक्शनरी, दोन-तीन फाउंटन पेन्स आणि हाताळून-हाताळून जीर्ण होत जाणारी 'सी ऑफ पॉपीज'.

अमिताव घोष यांची लेखणी वेगळीच आहे. त्यांचं राजकीय-सामाजिक भान सजग आहे. इतिहासाचे त्या त्या काळातील संदर्भ जागोजागी खुलवून वर्तमानातून ते आपणास लीलया शंभर-दीडशे वर्षे मागे नेतात. त्या रम्य भूतकाळात गुंतवून टाकतात. ब्रिटिशांची व्यावसायिक नीती, चिनी लोकांची त्याला काटशह देणारी भेदक वृत्ती यांची वर्णने, त्याचबरोबर भारतातील ब्रिटिशांचे त्यांच्या उद्योगविस्ताराकरिताचे जुलमी वर्तन आपल्याला अस्वस्थ करते. कादंबरी वाचताना भारताच्या ग्रामीण भागाचे, अफूच्या सततच्या सक्तीच्या शेती उत्पादनामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या हालांची वर्णने, शेतकरी त्या काळातही कसा पिचला गेलेला होता हे दाखविणारी आहेत.

सुरुवातीस गुंतागुंतीच्या पात्ररचनेमुळे, त्यांच्या तोंडी घातलेल्या देशी भाषेच्या सहभागाने, मोडलेल्या इंग्रजी शब्दांमुळे, बोटीची त्याच्या अंर्तभागाची बारीक-बारीक वर्णने विपुल प्रमाणात आल्यामुळे सारं भाषांतर म्हणजे वैताग झाला होता. आहे तसं सोडून द्यावं इतक्या टोकापर्यंत तो गेला होता, पण पुन्हा एक-दोन दिवसानंतर तो ठिकाणावर येत होता. सारं भाषांतर हा मिश्र अनुभव होता. त्रासदायक जेव्हा वाटायचा, तेव्हाच 'दीती', 'कालुआ', 'कबुतरी' यांचे घरगुती प्रसंग, 'आह फॅट', 'राजा नील' यांच्या कहाण्या वेगळ्याच विश्वात घेऊन जायच्या. रात्री उशिरापर्यंत बसून ती प्रकरणे पूर्ण व्हायची.

भाषांतर ही सोपी गोष्ट नाही हे मला स्वानुभवाने पटले. ज्यांनी अनेक पुस्तकांचे अनुवाद केले तो अशोक जैन नेहमी म्हणायचा, ''पुस्तकाचा अनुवाद म्हणजे एका कुपीतील अत्तर दुसऱ्या कुपीत ओतणे, जे ओतताना ते थोडंही सांडता कामा नये, ना त्याचा स्वाद जराही बिघडता कामा नये.''

अमिताव घोष ही भलीमोठी अत्तराच्या कुपीची खाण आहे. मी त्यांच्या विद्वत्तेने, लिखाणाने, सर्वदूर ज्ञानाने प्रभावित झालो. एवढी मोठी कादंबरी, (मी तर फक्त पहिला भागच अनुवादित

केला आहे) त्याचा तोल साऱ्या पात्रांसह सांभाळणे, पुढे पुढे नेणे प्रसंगानुरूप हुगळी घाटाचे, समुद्राचे, रोहिंग्या मुस्लिमाचे, तास्कर, राजा नीलमणी, ब्रिटिश अधिकारी, बोटीचे त्याच्या बारीकसारीक अंतरंगाचे यथानुरूप वर्णन प्रासादिक भाषेत खुलविणे ही उत्तम साहित्यिकाचीच पावती आहे. मी त्यात गुंतून गेलो या अनेक पात्रांपैकी एक होऊन गेलो. कधी त्या साऱ्या वाचनाने हळवा झालो, मनस्वी दु:खी झालो, क्रोधितही झालो. पण एका सुंदर कादंबरीच्या प्रेमात तुडुंब भिजलो.

आज पुस्तकरूपात–मराठीत 'सी ऑफ पॉपीज्' पाहताना मला क्षणभर खरंच वाटत नाहीय की हे काम आपल्या हातून होऊन गेले आहे. अरुण जाखडेंचे मनापासून आभार की त्यांनी विश्वासाने हा भाषांतर प्रकल्प माझ्यावर सापेवला. त्याला मी कितपत न्याय दिला आहे... सुजाण वाचकच ठरवतील.



**– कुमार नवाथे**

भ्रमणध्वनी : ९९७०२१७२६१/९८६९०१४४८६

kumar.nawathe@gmail.com



**ग्रंथाली**





## मु.पो. आई – संपादन : संदीप रामराव काळे

संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले की जाणवतं, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, न डगमगणारी, मुलांसाठी तगमगणारी, कधी हळवी, कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. ह्या पुस्तकाच्या बुद्धिजीवी संपादकांच्या हृदयातील हळवं संचित संकलनाच्या माध्यमातून वाचकांसमोर येतंय. हा ठेवा जपून ठेवण्यासारखा आहे.

**– शरद पवार**

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

## आमची आई – किशोर कुळकर्णी




जळगावच्या किशोर कुळकर्णींचं 'आमची आई' हे आई या विषयावरचं पुस्तक म्हणजे 'ग्रंथाली'नं साहित्य प्रकारात घातलेली मोलाची भर होय. जळगावच्या सामाजिक, औद्योगिक, राजकीय, साहित्यिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या नामांकित व्यक्तींनी त्यांच्या आईविषयीच्या आठवणी, त्यांना मिळालेले संस्कार इथे आहेत. या आठवणींचं, मातृस्मरण शब्दांकन म्हणजे हे पुस्तक!

**– सुधीर जोगळेकर**

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**




## मी आणि माझी आई – संपादन : अरुण शेवते

आईचे आणि आपले नाते शब्दांपलीकडचे असते. हे जरी खरे असले, तरी आपण आईसोबत कसे घडत जातो, तो अनुभवांचा पट मांडणे महत्त्वाचे असते. आई हीच आपल्या आयुष्यातली पहिली गुरू असते. आईला आपले मूल नेहमी लहानच वाटत असते; पण त्याचे मोठेपण ती आपल्या हृदयात जपत असते. गानसम्राज्ञी किशोरी आमोणकर, सुशीलकुमार शिंदे, रामदास भटकळ, भारतकुमार राऊत, यशवंतराव गडाख, संजय कृष्णाजी पाटील, ज्योत्स्ना कदम या नामवंतांनी आपले आणि आपल्या आईचे नाते उत्कटपणे मांडले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# जागतिक पुस्तकदिनानिमित्ताने...

## पुस्तक

हवं एक पुस्तक कायम जवळ
शब्दांचं आयुष्य असतं का एवढं सरळ?
कथा, लघुकथा, गोष्टीबिष्टी
फुलवली जाते संकुचित कल्पनासृष्टी
चरित्र, आत्मचरित्र, माहिती, संदर्भ
सत्य-असत्याचे मांडले जातात दर्भ
निबंध, स्फुटं, ललित
वेगळेपणा असतो खचित
पाककृती, स्वओळख, प्रवासवर्णनांचा नूर
स्वादिष्ट, सकारात्मक, स्थलदर्शनानुभवांचा सूर
डाव्या-उजव्यासह अनेक वादांचा भोवरा
'हम सब एक है...' मानवतेचा पोहरा
आस्वाद, रसग्रहण, समीक्षांचे डोंगर
वाचलं, अनुभवलं, गाठलं कठीण शिखर
व्याकरण, नियमांना कसं विसरावं
त्या आधारे तर शब्दांनी चालावं
शब्दांचे अर्थ, अर्थाचे अनर्थ
योग्य जागा, नेमकेपणा ठरतो सार्थ...
उंच उडी, लांब उडी, धावणं-पळणं
पुस्तकातल्या शब्दांना किती हो वळणं?
शब्दांचे स्वभाव, शब्दांचे विभाव
कसा काय लागावा वाचकांचा निभाव
शिवाय खिशाला परवडणं, वेळ दवडणं
कष्टानं समजणं, आकलनाचं असणं
एवढं सगळं असून, भाषेच्या हिकमती साधून
पुस्तक घेतं आकार, पानांचा भार वाहून
कल्पनेचं बीज रुजतं, फॉर्ममध्ये फोफोवतं
लेआऊटमध्ये घडतं नि फॉण्टमध्ये दिसतं
तरीही काही क्षणांचे, काही दुवे
लेखकमनी करतात थवे
मुखपृष्ठाचं सार, शब्दांचा चित्रकार
चित्रकाराच्या आकलनानं होते नैय्या पार




पुस्तक जुळणी, छपाई, गठ्ठे
रचू लागतात मनोरथं पठ्ठे
होतं अभिवाचन, प्रकाशन, भाषण
पडतं वाचकहाती, शब्दांना मिळतं नवभान
वाचकागणिक नवनवीन ज्ञान
शब्दांमध्येही येते जान
जात्या वेळीही व्हावी पुस्तकांची बात
लाभावी कायमच शब्दांची साथ
हवं एक पुस्तक कायम जवळ
शब्दांचं आयुष्य असतं का एवढं सरळ?

**– राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com

# ‘आनंदी गोपाळ’ बायोपिकच्या निमित्तानं

प्रत्यक्षात होऊन गेलेल्या एखाद्या व्यक्तीवर चित्रपट तयार केला जातो वा ग्रंथ लिहिला जातो तेव्हा आपण एक जबाबदारी स्वीकारत आहोत आणि ती गंभीरपणे, सत्यानिष्ठेनं पार पाडावी लागते. याचं भान संबंधितांनी ठेवावं लागतं...


♦ ♦ ♦

अंजली कीर्तने

♦ ♦ ♦

**स**ध्या चरित्रात्मक चित्रपटांचा अथवा बायोपिकचा जमाना आवतरला आहे. म. गांधी, सानेगुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके यांच्यावरील चित्रपट काही वर्षांपूर्वी चांगलेच गाजले होते. गतकाळातील लोकप्रिय अभिनेते काशीनाथ घाणेकर, महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल .देशपांडे, शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे आणि पहिल्या भारतीय स्त्री-डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या चरित्रांवर आधारित चित्रपट गेल्या काही महिन्यांपासून गाजत आहे. या साऱ्याच व्यक्तिमत्त्वांना लोकमानसात जिव्हाळ्याचं स्थान आहे. बायोपिकचं स्वरूप कसं असावं, त्यात सत्याचा अंश किती असावा, काल्पनिकतेचा अंश किती असावा, पात्रांचं, त्यांच्या जीवनातील घटना-प्रसंगांचं, नातेसंबंधांचं आणि ती माणसं ज्या काळात जगली त्या काळाचं चित्रण करताना कोणत्या गोष्टींचं भान राखावं, कोणती बंधनं पाळावीत, असे अनेक प्रश्न या चरित्रपटांच्या संदर्भात निर्माण होतात. १९९२ साली डॉ. आनंदीबाई जोशी यांच्यावरील माझ्या संशोधनावर आधारित चरित्रात्मक लघुपट मी केला. त्यांचं चरित्रही लिहिलं. त्यानंतर गेल्या पंचवीस वर्षांत मी सातत्यानं लघुपट आणि ग्रंथ या दोन्ही माध्यमांत काम केलं. डॉ. आनंदीबाई जोशी, विदुषी दुर्गा भागवत, ग्वाल्हेर घराण्याचे सुस्वरकंठी गायक पं. दत्तात्रय विष्णू पलुस्कर आणि आता संगीतज्ज्ञ पं. विष्णू नारायण भातखंडे यांच्यावरील चरित्रात्मक कलाकृतींची निर्मिती, दिग्दर्शन आणि पटकथा व संवादलेखन करताना अशा प्रश्नांची उत्तरं मलाही सातत्यानं शोधावी लागली. आनंदी गोपाळ हा चित्रपट मी बघितला तेव्हा बायोपिक्स या विषयावर लिहायला हवं, त्याच्या रूपवैशिष्ट्यांचा चिकित्सकपणे विचार करायला हवा, असं मला तीव्रतेनं वाटलं.

चित्रपट हे अत्यंत लोकप्रिय, वेगानं सर्वदूर पसरणारं आणि जनमानसावर ग्रंथांपेक्षा जलद प्रभाव करणारं, ज्यांना लिहिता-वाचता येत नाही, त्यांच्यापर्यंत पोहोचणारं माध्यम आहे. पात्रांचं जे चित्रण चित्रपटात असेल तेच प्रेक्षकांना वाटण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वास्तवात होऊन गेलेलं वा अस्तित्वात असलेलं एखादं व्यक्तिमत्त्व आणि त्याची जीवनकथा या माध्यमातून चित्रित करणं हे अत्यंत जबाबदारीचं आणि आव्हानात्मक काम असतं. ‘आनंदी गोपाळ’ या चित्रपटाच्या प्रारंभी एक निवेदन आहे. ते लिखित रूपात तर पडद्यावर दिसतंच, शिवाय ऐकूही येतं. या चित्रपटात कोणाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू नाही; आनंदीबाईंच्या जीवनातील काही घटनांवर हा चित्रपट आधारित आहे; त्यात काल्पनिकतेचा भाग आहे आणि हा चित्रपट सत्यतेचा दावा करत नाही; असं स्पष्टीकरण या निवेदनाद्वारा देण्यात आलं आहे. चरित्रपट करताना आधाराला चरित्र घेऊन, त्यातील सत्याशी, वास्तवाशी प्रतारणा न करता त्या व्यक्तीच्या जीवनातील घटनाप्रसंग पुनरुज्जीवित करावे लागतात. हे करताना कल्पनाशक्तीचा वापर हा होतोच. पात्राच्या चरित्राचं आणि चारित्र्याचं, त्या काळच्या भाषेचं, परिस्थितीचं आणि काळाचं भान राखून चरित्रपटात घटना, प्रसंग, संवाद हे कल्पावेच



लागतात. ही मुभा पटकथाकाराला, संवादलेखकाला, दिग्दर्शकाला निश्चितच असते. असायलाच हवी. मी निर्मिलेल्या चरित्रपटांसाठी मी डॉक्युड्रामा हा शब्द वापरते तो याच अर्थी. त्यात दस्तावेजीकरण (डॉक्युमेंटेशन) असतं आणि ड्रामा अथवा नाट्य देखील असतं. लघुपटाऐवजी पूर्ण लांबीचा चित्रपट केला तरी तोही डॉक्युड्रामाच असतो. किंबहुना 'बायोपिक' या शब्दांतही याच छटांचा अंतर्भाव आहे. चित्रपट हा बायोग्राफिकल म्हणजे चरित्रात्मक असतो आणि त्याच वेळी तो चित्रपटही असतो. त्यामुळे कल्पनेच्या वापरावर बंदी नाहीच. मग 'आनंदी गोपाळ' या चित्रपटाच्या प्रारंभी एवढया आवाजी पद्धतीनं काल्पनिकता अधोरेखित करण्यामागचं कारण काय? चरित्रात्मक भागाला मर्यादित ठेवून, कल्पनाशक्तीला मोकळं सोडलेल्या या चित्रपटात नेमकं काय घडतं, हे पाहण्यासारखं आहे. एकोणिसाव्या शतकात स्त्री-शिक्षण, समुद्रोल्लंघन, परदेशगमन ही महापातकं मानली जात. या बुरसटलेल्या समाजकल्पनांना दूर सारून आपलं डॉक्टर होण्याचं ध्येय आनंदीनं प्राणपणानं साकार केलं. तिचे पती गोपाळराव यांनी तिच्या स्वप्नाला खंबीर आधार दिला. त्यांचं जीवन मुळातच प्रासंगिक, सामाजिक, वैचारिक, भावनिक नाट्यानं आणि समरप्रसंगांनी ओतप्रोत भरलेलं आहे. त्यांच्या जीवनातील अन्य पात्रं, त्यांचे नातेसंबंध, स्वभाववैशिष्ट्यं यांसंबंधीची माहितीही उपलब्ध आहे. त्यामुळे चरित्राच्या पावलावर पाऊल टाकून, वास्तवाशी इमान राखून चित्रपटनिर्मिती करणं अजिबातच अशक्य नव्हतं. पण प्रत्यक्षात घडतं ते वेगळंच. कलात्म स्वातंत्र्याच्या नावाखाली, मन मानेल तसे बदल करताना, इतिहासात स्थान असलेल्या व्यक्तीचं जीवनचित्र आपण रंगवत आहोत आणि हे एक जोखमीचं काम आहे, याचं भान सुटलेलं आहे. त्यातून चित्रपटात वेगवेगळ्या प्रकारच्या त्रुटी निर्माण झाल्या आहेत.

**१. कृतक नाट्याच्या मोहापोटी काही पात्रांवर झालेला अन्याय–** आनंदीबाईंचे वडील गणपतराव हे स्त्रीशिक्षणाच्या बाजूनं होते. आपल्या मुलीतील बौद्धिक चमक प्रथम त्यांनीच ओळखली आणि घरच्या मंडळींचा विरोध असतानाही तिला बालपणापासून शिकवायला त्यांनी सुरुवात केली. ही मुलगी प्रज्ञावती आहे, मोठेपणी कर्तृत्ववान होणार आहे, याचं भान पहिल्यांदा कोणाला आलं असेल तर ते आनंदीच्या वडिलांना. त्यांच्या घरी येणंजाणं असलेल्या गोपाळरावांशी जर तिचं लग्न झालं तर ते तिला धडाडीनं शिकवतील असा त्यांचा कयास होता. लग्नापूर्वीही गोपाळरावांनी यमूला शिकवलं होतं. ही माहिती आनंदीबाईंनीच अमेरिकेतील त्यांची मैत्रीण कॅरोलीन डॉल यांना दिली होती, परंतु चित्रपटात गणपतरावांना स्त्रीशिक्षणाचे विरोधक ठरवलं आहे. आनंदीला शिक्षण देण्यापासून गोपाळरावांना परावृत्त करताना या चित्रपटातील गणपतराव म्हणतात, ''कुलवंतांच्या घरात मुलींना शिकवणं शोभेल का? स्त्रीचा महत्त्वाचा गुण म्हणजे संसारदक्षता.'' आनंदीच्या वडिलांना ते जसे होते तसे का रंगवलं नाही? काल्पनिकतेच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीवर असा अन्याय का करावा? आनंदीबाई आणि तिचे वडील यांतील नातं अतिशय मधुर आणि त्या काळातील बापलेकींच्या नात्यापेक्षा वेगळं, अधिक मनमोकळं होतं. गणपतराव हे काळाच्या पुढे गेलेले होते. मग त्यांना परंपरावादी ठरविण्याचं कारण काय?

तीच गोष्ट आनंदीबाईंच्या व्यक्तिरेखाटनाची. 'मी अमेरिकेला एकटी जाईन,' असा एकदा शब्द दिल्यावर आनंदीबाई त्यावर सदैव ठाम राहिल्या होत्या. चित्रपटातील आनंदी मात्र बोटीवर चढेस्तोवर गोपाळरावांना चिडकेपणी विरोध करते, ''का तुमचा मला अमेरिकेला पाठवायचा हट्ट?'', ''मी नाही म्हटलं तर?'' ''माझी अमेरिकावारी काही चुकत नाही.'' ''तुम्ही येणार नसाल तर मी जाणार नाही.'' अशी विधानं करून अमेरिकेला एकटीनं जायची आपली इच्छा नसल्याचं दर्शविते. सतत कुरकुर करते. गोपाळरावांवर मनानं अवलंबून असते. तिला जणू तिच्या मनाविरुद्ध बळेबळे गोपाळराव अमेरिकेला पाठवतात, असा समज या चित्रपटातून निर्माण होतो. चित्रपटातील आनंदी इतकी नासमज दाखवली आहे, की गोपाळरावांनी आपल्याला एकटं पाठवलं याबद्दलचा तिचा राग अमेरिकेला गेल्यावरही टिकून राहतो. हे संपूर्ण चित्रण ध्येयनिष्ठ आनंदीवर अन्याय करणारं आणि तद्दन खोटं आहे. गोपाळरावांचं गुणगान करण्याच्या नादात आनंदीवर अन्याय होतो आहे, हे लक्षात आलेलं दिसत नाही. ही कथा जर पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्याऐवजी, एकोणिसाव्या शतकातील एखाद्या काल्पनिक मुलीवर असती तर पटकथाकार व दिग्दर्शक हवं ते रंगवायला मोकळे होते. पण हे मात्र चारित्र्यहनन आहे.

चित्रपट अथवा लघुपट हा प्रतिमा-प्रतीकांच्या आणि चित्रांच्या भाषेत बोलतो. शब्दांचा मोजका वापर करूनही अबोल बोलीत खूप काही बोलू शकतो. या चित्रपटातील काही प्रसंग अशा अबोल बोलीत चांगले रंगविले आहेत. छोटी आनंदी बावऱ्या, रडवेल्या अवस्थेत गोपाळरावंच्या शयनगृहात जाते आणि तिला घरच्या बायकांनी पढवल्याप्रमाणे म्हणते, ''तुम्हाला काय करायचं ते करा.'' या बालवधूची अवस्था गोपाळरावांच्या लक्षात येते. ते वात्सल्यानं तिचे अश्रू पुसतात आणि म्हणतात, ''मला एवढंच करायचं होतं.'' त्यांचा समंजसपणा, भावनाशीलता, आपल्या छोट्या पत्नीला समजावून घेणं या गोष्टी त्या एका वाक्यात प्रकटतात. अलिबागला बोटीतून आणि नंतर बैलगाडीतून, जाताना आनंदी मराठी शब्दांचे इंग्रजी भाषेतील पर्याय उत्सुकतेनं विचारते. ''कळसाला काय म्हणतात?'', ''बैलगाडीला काय म्हणतात?'' इत्यादी. यांतून अगदी सहजपणे तिची ज्ञानोत्सुकता प्रकट होते. बाळाच्या मृत्यूनंतर गोपाळराव तिला सांगतात, ''आता दु:ख विसर आणि उद्यापासून अभ्यासाला लाग.'' तेव्हा ती पट्कन म्हणते, ''आजपासून.'' या एका शब्दातून आनंदीचा खंबीरपपणा, तिचं स्वत:ला सावरणं, तिची ज्ञानलालसा व्यक्त होते. जेव्हा प्रथमच मिशनरी शाळेत ती पाय ठेवते तेव्हा तिच्या समोर एक लांबलचक व्हरांडा दिसतो. आपल्याच तंद्रीत चालणाऱ्या आनंदीसमोर उलगडलेली ज्ञानवाट म्हणजे तिच्या भविष्याकडे जाणारा मार्ग असतो आणि त्या वाटेवर आनंदीचा एकटीचा प्रवास सुरू झालेला

असतो. गोपाळराव दूर उभे राहून पाहत असतात. एकही शब्द न वापरता चित्रपट कसा बोलू शकतो, याचं हे उदाहरण आहे. मात्र असे अबोलपणी बोलणारे क्षण अपवादात्मक आहेत. चित्रपट माध्यमाची ही शक्ती पुरेशी वापरली गेलेली नाही. आपल्यासमोर येते ती एक अतिरंजित कथा.

**२. कालविपर्यास –** विशिष्ट कालमानपरिस्थितीचं, तेव्हाच्या वातावरणाचं भान न राखता, त्या काळाचं चुकीचं चित्रण करणं, ज्या गोष्टी त्या काळात घडल्याच नाहीत, भविष्यात वा भूतकाळात घडल्या, त्या गोष्टी कथावस्तूत घुसडणं हा कालविपर्यास असतो. गोपाळरावांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याचं नाटक केलं आणि नंतर त्यांनी परत हिंदू धर्मात प्रवेश केला, ही घटना आनंदीच्या मृत्यूनंतरची आहे. त्यामागे जी कारणं होती त्याचा आनंदीच्या अमेरिकेला जाण्याशी काहीही संबंध नव्हता. आनंदीचा हात धरून त्यांनी तिला चर्चमध्ये नेणं, तिला बांगड्या, नथ, सौभाग्यलक्षणं उतरवायला लावणं आणि मंगळसूत्र काढण्याची मागणी होताच तिनं संतापणं व निघून जाणं या गोष्टी म्हणजे पटकथाकाराच्या कल्पनाशक्तीचा खेळ आहे. तो अत्यंत भडक, संपूर्णपणे असत्य आणि विपरित आहेत. ''जो देश मला माझ्या धर्मासकट मानत नाही तो देश मला मान्य नाही.'' हे टाळ्यांचं वाक्य आनंदीच्या तोंडी घालण्यासाठी हा आटापिटा केला असल्यास न कळे! आनंदीच्या पदवीदान समारंभासाठी आलेल्या गोपाळरावांनी चक्क पिटातल्या प्रेक्षकाप्रमाणे शिट्टी वाजविणं आणि आनंदी गोपाळांनी एकमेकांना मिठी मारणं या गोष्टी तर काळाचं आणि पात्रांच्या मनोभूमिकांचं भान नसल्याचं द्योतक आहे. काल्पनिकतेच्या नावाखाली काय वाट्टेल ते करण्याची मुभा घेतली आहे आणि ती हानिकारक ठरली आहे.

आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभासाठी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत लंडनहून पंडिता रमाबाई आवर्जून आल्या होत्या. त्या मात्र कोठेच दिसत नाहीत. त्यांना आणि आनंदीबाईंना मोठ्या सन्मानानं व्यासपीठावर बसवलं होतं. इथे मात्र आनंदीला दोन स्त्रिया हात धरून व्यासपीठावर नेताना दिसतात. आनंदीच्या जीवनातलाच तो सुवर्णक्षण होता. हिंदुस्तान या देशाच्या इतिहासातील ऐतिहासिक क्षण होता. पण या तेजस्विनीच्या स्वप्नपूर्तीचा आनंद या प्रसंगातून फुललेला नाही. त्याची भव्यता जाणवत नाही. तिला सतत खोकायला, थबकायला लावून तिचं आजारपणच जास्त गडद करण्यात आलं आहे. आनंदीच्या जीवनातील या प्रसंगाचे अनेक सुंदर तपशील उपलब्ध आहेत. त्याचा उपयोग करून घेतलेला नाही. गोपाळराव या प्रसंगी ओरडून सांगतात, ''She is the first. She is the first.'' पण first काय? गोपाळरावांचा गहिवर दाखविण्यासाठी ''She is the first Indian woman doctor'' हे वाक्य त्यांना पूर्ण करू दिलेलं नाही. गहिवराचा इतका अतिरेक केला नसता, तर आनंदीबाई या पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर होत्या, ही वस्तुस्थिती बापड्या प्रेक्षकांच्या मनावर ठसली तरी असती.

**३. तपशिलांच्या चुका –** काहीही कारण नसताना चुकीचे तपशील वापरून त्यावर घटनांचे इमले रचणं हे तर केवळ धक्कादायक




आहे. उदाहरणार्थ, कलकत्त्यातील एक प्रसंग. प्रत्यक्षातील आनंदीगोपाळ कलकत्याला असताना त्यांच्या प्रत्ययाला आलं होतं की बंगालमधलं वातावरण महाराष्ट्रापेक्षाही सनातनी आहे. नवराबायको एकमेकांबरोबर फिरायला गेली तर ती स्त्री वेश्या असावी, असा समज लोकांचा होई. आनंदी अमेरिकेला जाणार कळताच बंगालमधील श्रीरामपूर येथे आनंदी गोपाळांच्या घराभोवती जमून लोकं दिवसभर कसा आरडाओरडा करत असत याचं वर्णन खुद्द आनंदीनंच केलेलं आहे. चित्रपटात मात्र आनंदी म्हणे बंगाल मेडिकल कॉलेजात जाते. कोठून आलं हे स्त्रियांना प्रवेश देणारं बंगालचं कॉलेज? शिवाय हिंदुस्तानात शिक्षणाची सोय झाली असेल तर मग ते शिक्षण अर्धवट सोडून आनंदी कशाला अमेरिकेला गेली? गोपाळरावांकडे काय पैशांची खाण होती, अकारण कॉलेज बदलून अमेरिकावारी करायला? हे अगदी साधे प्रश्न पटकथाकाराला वा दिग्दर्शकाला पडू नयेत, याचं नवल वाटतं. याच बंगाल प्रांतातील श्रीरामपूर गावी आनंदीनं ''मी अमेरिकेस का जात आहे,'' या विषयावर जाहीर भाषण दिलं. गोपाळरावांना वाटत होतं की आपण भाषण द्यावं; पण स्वतंत्र बाण्याच्या आनंदीला आपल्या वतीनं दुसऱ्या कोणी, अगदी गोपाळरावांनीही बोलावं हे मान्य नव्हतं. हातात टिपणांचे कागद न घेता, अस्खलित इंग्रजीत ती बोलली आणि आपल्या विरोधकांना एकदाच पण ठामपणे तिनं उत्तर दिलं. तिच्या धीरोदात्तपणामुळे ब्रिटिश मंडळींनीही तिचं कौतुक केलं.

प्रगल्भ आनंदीच्या व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीनं अनिवार्य असलेला हा प्रसंग चित्रपटात गाळलेला आहे. मूळ रूपात उपलब्ध असलेल्या आनंदीच्या भाषणातील काही अंश जरी चित्रित केले असते तरी आनंदीनं आत्मविश्वासानं व शांतचित्तानं विरोधकांना कसं उत्तर दिलं आणि त्या एकाच भाषणानं समाजमनात तिची प्रतिमा कशी तयार झाली, ते कळलं असतं.

समाजाकडून आनंदी गोपाळांना कसा विरोध झाला, हे दाखविण्यासाठी चित्रपटात काही खरेखोटे प्रसंग रंगविले आहेत. पैकी गावकऱ्यांनी गोपाळरावांच्या मुलाला पळवून नेणं आणि त्याची विटंबना करून त्याला बांधून ठेवणं, गोपाळरावांनी आणि त्यांच्या फौजफाट्यानं, शिवाजीच्या काळात वावरत असल्याप्रमाणे हातात मशाली घेऊन गावभर भटकणं हा तर अतिरंजिततेचा कळस आहे. घरातला कंदील गोपाळरावांना सापडला नाही म्हणायचं का? गावभरचे लोकदेखील मशाली घेऊन शोधात सामील होतात. याचं कारण मशालीच्या प्रकाशात सुंदर दिसणाऱ्या शॉटचा मोह दिग्दर्शकाला आवरला नाही. अलिबागला गोपाळरावांनी आनंदीच्या डोक्यात गजरा माळणं आणि आपल्या या कृतीनं चकित झालेल्यांशी वादावादी करणं हा प्रसंगही नाटकी वाटतो. त्या काळच्या बायका केसात हौसेनं फुलं माळत, हे खरं. परसदारी वा घरापुढे छोटीशी बाग असणं ही सामान्य गोष्ट होती. पण गजरा माळणं हे गरती स्त्रियांचं लक्षण मानत नसत. अशा परिस्थितीत अलिबागसारख्या तत्कालीन खेड्यात, मालाला उठावच नसताना रानावनासारख्या दिसणाऱ्या परिसरात कोणता वेडा गजरे विकत बसेल? हे तपशील बारीकसारीक वाटले तरी तो काळ उभा करण्याच्या दृष्टीनं महत्त्वाचे असतात. एकंदरच विक्षिप्त गोपाळराव रंगविण्याचं आव्हान जड गेलं आहे. सामान्य परिस्थितीतल्या या असामान्य जोडप्याला झालेला समाजविरोध लहान, सुबक पण वास्तवपूर्ण प्रसंगातून टोकदारपणे उभा करता आला असता. खोट्यानाट्या आणि तथाकथित सिनेमॅटिक फापटपसाऱ्याची त्यासाठी गरज नव्हती. त्यावर जे अतोनात फुटेज वाया गेलं तेही वाचलं असतं आणि आनंदीच्या जीवनातल्या अस्सल नाट्याला अधिक जागा मिळाली असती. अनावश्यक प्रसंगांच्या भरताडभरतीतून चित्रपटातील अवकाश वाया गेला आणि काही मौलिक प्रसंग टाळल्यामुळे चित्रणाला अधुरेपणा आला.

**४. काल्पनिक पात्रांची निर्मिती –** असत्यावर आधारित पात्रांची निर्मिती करून त्यांचंही बरंच स्तोम या चित्रपटात माजवलं आहे. प्रत्यक्षात आनंदीबाईंच्या विवाहानंतर त्यांची विधवा आजी लाडक्या नातीला संसारात मदत करायला, सोबत करायला म्हणून आनंदी गोपाळांबरोबर राहत असते.गोपाळरावांचा धाकटा भाऊ आप्पा देखील तिथेच असतो. या आजीच्या ऐवजी गोपाळरावांच्या पहिल्या बायकोची आई म्हणजे गोपाळरावांच्या सासूबाई विमलाबाई आणि भावाच्याऐवजी गोपाळरावांचा मुलगा कृष्णा यांना आणलं आहे. सत्याचा अपलाप करून पात्रांची पार्श्वभूमी बदलण्याचं कारण काय? त्यानं कोणता परिणाम साधला? घरासमोर कचरा टाकणाऱ्या विरोधकांचा विमलाबाईंनी प्रतिकार करणं हा एक असाच नको इतका लांबलेला प्रसंग आहे. एकंदरच चित्रपटात या पात्राला अतोनात महत्त्व दिलं गेलं आहे. आनंदाबाईना अमेरिकेत जाताना पैशांची गरज असते, तेव्हा याच विमलाबाई आपले दागिने गोपाळरावांच्या हवाली करतात, असाही एक प्रसंग रंगवला आहे. खरं तर आनंदीबाई स्वत:चे दागिने विकतात आणि पैसे उभारतात. त्याचप्रमाणे त्यांच्या भाषणानं प्रभावित झालेले हिंदुस्तानच्या पोस्टखात्याचे डायरेक्टर जनरल एच.इ.एम. जेम्स वृत्तपत्रातून जाहीर आव्हान करून एक फंड उभारतात. या मनस्वी दांपत्याची नड नेमकी ओळखतात. अन्य पाश्चात्य मंडळीही फंडाला मदत करतात. ख्रिश्चनांचा धर्मांतराचा प्रयत्न, कावेबाजपणा, या गोष्टी रंगवून सांगितल्या जातात. पण ब्रिटिशांच्या या औदार्याचा उल्लेख साध्या संवादातूनही केला जात नाही. हा पक्षपातीपणा वाटतो.

**५. गाळलेली पात्रं –** आनंदीबाई आणि पंडिता रमाबाई यांच्यात मनोज्ञ स्नेहबंध होता पण त्यांना चित्रपटात स्थान नाही. इतकंच नव्हे तर ज्या कार्पेंटरबाईंनी आनंदीबाईंना अमेरिकेत माहेरघर दिलं, ज्यांच्या घरच्या माणसांशी आनंदीबाईंचं अत्यंत प्रेमाचं नातं जुळलं, ते घर आणि ती माणसं चित्रपटात कुठेच दिसत नाहीत. आनंदाबाई कार्पेंटरबाईंना पत्र लिहिते आहे, अशा पद्धतीनं चित्रपट सुरू केला आहे. पण या कार्पेंटरबाईंना मात्र अंधारात ठेवलं आहे. कार्पेंटरबाई फक्त एकदा दाताच्या डॉक्टरांकडे बसलेल्या दिसतात तेवढ्याच. कार्पेंटरबाईंनी आनंदीला आपल्या घरी ठेवून ममत्वानं तिचा प्रतिपाळ केला. त्यांच्या कुटुंबात आनंदीला आपलं हरवलेलं बाळपण आणि प्रेम लाभलं. अशा या आनंदीच्या हितकर्त्या कार्पेंटर मंडळींना पूर्णतया गाळून टाकलं आहे. डीन बॉडले व तिच्या इतर शिक्षिका, कॅरोलीन डॉल, यांसारख्या व्यक्तींशी आनंदीचे अमेरिकेमध्ये उत्कट भावबंध निर्माण झाले होते. त्यांचा मागमूसही चित्रपटात लागत नाही. आनंदीबाईंच्या कॉलेजजीवनाचं चित्रण देखील अतिशय चुटपुटतं झालं आहे. आनंदीबाईंचं कॉलेज हे जगातलं पहिलं स्त्रियांचं वैद्यकीय विद्यालय होतं. त्या मागे जागतिक लढ्याची पार्श्वभूमी होती. मात्र आनंदीचा तेथला वावर, तेव्हाचं वातावरण, वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी तिथं आलेल्या जगभरच्या स्त्रिया, आनंदीनं लिहिलेला प्रबंध आणि तिचा अभ्यासक्रम यांना वाव दिला असता तर सुंदर कालचित्रण झालं असतं. आनंदाबाई अमेरिकेत शिकायला का गेल्या हे प्रेक्षकांच्या मनावर बिंबलं असतं. पण तसं होत नाही. एकंदरच अमेरिकेतील आनंदीचं जीवन फार चुटपुटतं, ढोबळ आणि वरवरचं रंगवलं आहे.

अमेरिका ही आनंदीची कर्मभूमी होती. याच देशानं तिचं स्वप्न साकार केलं. म्हणूनच मृत्यूनंतरही तिला याच देशात चिरविश्रांती घ्यावाशी वाटली. तिचा रक्षाकलश पोकीप्सी गावी कार्पेंटरमावशींच्या माहेरच्या दफनभूमीत पुरला गेला. आनंदीला अवघं २१ वर्षांचं आयुष्य लाभलं. पण एकोणिसाव्या शतकातील आनंदीबाई आज एकविसाव्या शतकातही जिवंत आहेत. त्यांच्यावर कादंबरी, नाटक, लघुपट, दूरदर्शनमालिका निर्माण झाली. कोणी

एकपात्री कार्यक्रम केले तर कोणी तिच्या चरित्राचं अभिवाचन आजही करत आहे. आनंदीबाईंची जीवनकथा समजमनात खोलवर झिरपली आहे. वादळात फडफडणाऱ्या एका ज्योतीनं किती तरी मनं प्रज्ज्वलित केली.

आनंदीबाईंची जीवनकथा किती प्रेरक आहे, याचा अनुभव मी माझ्या वैयक्तिक जीवनात घेतला आहे. १९९१ साली अशोक गोरे आणि त्यांचे स्नेही विराज सरदेसाई यांच्या मदतीनं मी पोकीप्सीच्या दफनभूमीतील समाधी शोधली. तो दिवस माझं जीवन बदलणारा ठरला. आनंदीबाईंवर लघुपट करावा, हे स्वप्न उराशी घेऊन मी परतले. चरित्राआधी लघुपट केला आणि लघुपटासारख्या समर्थ माध्यमानं मला झपाटून टाकलं. आज मी जी काही आहे ती आनंदीबाईंमुळे. त्या भेटल्या नसत्या तर लघुपट माध्यम मला गवसलं नसतं. त्यांच्यावरील चित्रपट खरोखरच कसदार आणि या विलक्षण बुद्धिमत्तेला न्याय देणारा झाला असता, तर मला अत्यानंद झाला असता. मात्र काल्पनिकतेच्या अतिरेकामुळे आणि कलात्मक स्वातंत्र्याच्या नावाखाली कथेची हानी करणारे बदल केले गेले. त्यातून या चरित्रात्मक चित्रपटाला अतिरंजित, भडक आणि उथळ स्वरूप आलं.


या संदर्भातील माहिती उपलब्ध नव्हती असा दावा करता येणार नाही. कारण मी लिहिलेल्या 'डॉ. आनंदीबाई जोशी : काळ आणि कर्तृत्व' या चरित्रात इत्थंभूत माहिती उपलब्ध आहे. ज्या अर्थी विशेष आभारात माझं नाव आवर्जून घातलं आहे, त्याअर्थी माझं पुस्तक निर्माता-दिग्दर्शकांना ठाऊक होतं. हे आनंदीगोपाळ या कादंबरीचं चित्रण आहे, असा त्यांचा दावा असेल, तर मग मला न विचारता, माझी परवानगी न घेता माझ्या नावाचा वापर केला तो कशासाठी? तेही चुकीचंच आहे. या चित्रपटातील चुकांना मी जबाबदार नाही हे मी जाहीरपणे सांगू इच्छिते. प्रत्यक्षात होऊन गेलेल्या एखाद्या व्यक्तीवर चित्रपट तयार केला जातो वा ग्रंथ लिहिला जातो तेव्हा आपण एक जबाबदारी स्वीकारत आहोत आणि ती गंभीरपणे, सत्यानिष्ठेनं पार पाडावी लागते. याचं भान संबंधितांनी ठेवावं लागतं. त्या चरित्रातील कोणत्याही माणसाचं असत्य, अप्रामाणिक, विकृत चित्रण करणं हे सर्वथैव गैर आहे. म. वा. धोंडासारख्या समीक्षकांनी आनंदी गोपाळ, रघुनाथाची बखर यांसारख्या चरित्रात्मक कादंबऱ्यांची समीक्षा करताना अशा प्रवृत्तीवर अचूक प्रहार केला होता. एकंदरच आनंदी-गोपाळांच्या जीवनाचा सखोल अभ्यास न केल्याचे दुष्परिणाम या चित्रपटाला भोगावे लागले आहेत. त्यावर प्रतिक्रिया देणं हे मला माझं कर्तव्य वाटलं, म्हणून हा लेखप्रपंच केला.

**– अंजली कीर्तने**
भ्रमणध्वनी : ९९६७५१६९१३
anjalikirtane@gmail.com

॥ग्रंथाली॥

## शिवकुमार आडे लिखित

# गुंफण




शिवकुमार आडेंच्या कवितेत आदिवासी जीवनाचा भूतकाळ आहे. शोषणाचे हल्ले सोसत संविधानाने दिलेले नवे जीवन निर्माण करण्यासाठी आदिवासी जीवनाचा धडपडणारा वर्तमानकाळ आहे आणि त्यापुढेही 'आम्ही भारतीय नागरिक' म्हणून भौतिक आणि नैतिक सन्मानाचे भावी जीवन निर्माण करण्याचे स्वप्नही आहे. शिवकुमारची प्रतिभा अनुभवांच्या निखाऱ्यांवर पोसली गेली आहे, म्हणून या कवितेत आपल्याला अस्वस्थतेने पेटणारे कवीचे मन दिसते. मन दुःखातही जगताना चांदण्याच्या पहाटेचे स्वप्न पाहणाऱ्या लोकसमूहाचे प्रतिनिधित्व करणारी कविता आहे. तिच्यातल्या 'मी'ला 'आम्ही'चा अर्थ आहे. ही दुःखामधून वाट काढणारी जिद्दी कविता आहे.

**– यशवंत मनोहर**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

**खेळ खेळताना प्रतिस्पर्धी संघावर मात करण्याची इर्षा निर्माण होतेच पण त्याही पेक्षा महत्त्वाचं म्हणजे खेळ माणसं जोडतो, सांघिक भावना निर्माण करतो. जात, धर्म, देश यांच्या पलीकडे जायला शिकवतो. केरळमधील 'सुदानी' हा चित्रपट हा आशय समर्थपणे मांडतो...**

♦ ♦ ♦

# 'सुदानी'

**संतोष पाठारे**


♦ ♦ ♦

**भा**रतात दर मैलावर भाषा बदलते तसंच प्रांत बदलला की संस्कृतीचं नवीन रुपही नजरेस पडतं. प्रत्येक प्रांतातल्या लोकांच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. खाण्याच्या जिन्नसापासून खेळापर्यंत असलेली ही भिन्नता ठळकपणे जाणवते. महाराष्ट्रातले तरुण क्रिकेटवेडे तर बंगाल आणि केरळमध्ये फुटबॉल हा खेळ सर्व थरांतील मुलांना अतिप्रिय! आपल्याकडे ज्याप्रमाणे प्रत्येक गल्लीत एक क्रिकेटचा संघ असतो, त्याचप्रमाणे केरळमध्ये फुटबॉलचे संघ आपल्या प्रतिस्पर्धी संघाशी मैदानात झुंजायला तयार असतात. केरळमधील मल्लपुरमसारख्या जिल्ह्यांमध्ये फुटबॉलचं प्रस्थ सर्वाधिक आहे. पोर्तुगीजांचा अंमल असलेल्या गोव्यातून फुटबॉल खेळाचं लोणं केरळमध्ये पसरलं. स्थानिक पातळीवर संघ उभे राहिले, स्पर्धा सुरू झाल्या, जिंकण्याची ऊर्मी आली. प्रेक्षकांमध्ये कोणता संघ जिंकणार याबद्दलची कुतूहलं आणि बेटिंग सुरू झालं.

खेळ खेळताना प्रतिस्पर्धी संघावर मात करण्याची इर्षा निर्माण होतेच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे खेळ माणसं जोडतो, सांघिक भावना निर्माण करतो. जात, धर्म, देश यांच्या पलीकडे जायला शिकवतो.

आशुतोष गोवारीकरांच्या 'लगान'ने खेळावर आधारित चित्रपटांना लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर आलेल्या बहुतांश चित्रपटात भारतीय खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जिंकलेले सामने, निवड समितीतील राजकारण आणि एखाद्या खेळाडूची देदीप्यमान कारकिर्द यांचं चित्रण केलं गेलंय. केरळमधील झकारिया मोहम्मद या तरुण दिग्दर्शकाचा पहिलावहिला चित्रपट, 'सुदानी फ्रॉम नायजेरिया'! हा चित्रपट क्रिडा चित्रपटांपेक्षा हटके आहे. फुटबॉल, फूड आणि फॅमिली या तिन्ही गोष्टी बद्दल पॅशन असणाऱ्या मलाबारमध्ये जन्मलेल्या झकारियाने चित्रपटाचं प्रशिक्षण केरळच्या फिल्म फेस्टिव्हलमधले चित्रपट पाहता पाहता घेतलं. महोत्सवातल्या ओपन फोरममध्ये दिग्गजांकडून चित्रपटनिर्मितीच्या कथांनी त्यालाही चित्रपट निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. अँड एजन्सीमध्ये कामाचा अनुभव घेतल्यानंतर त्यानं पहिला चित्रपट बनवला तो त्याच्या गावातल्या लोकांच्या फुटबॉल प्रेमावर! या चित्रपटाने त्याने केरळ महोत्सवात फ्रिप्रस्कीचं पारितोषिक मिळवून दिलं.

सुदानी फ्रॉम नायजेरियामध्ये फुटबॉल मॅचेसच चित्तथरारक चित्रण आहे, दोन संघामध्ये असलेली ठस्सन आहे. मात्र दिग्दर्शकाचा फोकस त्यापलिकडे जाऊन फुटबॉलमध्ये आकंठ बुडालेल्या खेळाडूंच्या परस्पर संबंधाचा वेध घेण्यावर आहे. चित्रपटाचं वेगळेपण त्याच्या 'सुदानी फ्रॉम नायजेरिया' या शीर्षकापासून सुरू होतं. सॅम्युअल ही या चित्रपटातील प्रमुख व्यक्तिरेखा. सॅम्युअल नायजेरियावरून भारतात आलाय. साधारण आपल्याकडे निग्रो



लोकांना ते कोणत्याही आफ्रिकन देशातले असले तरीही सुदानी म्हटलं जातं. आपलं भौगोलिक अज्ञान प्रकट करणारं 'सुदानी फ्रॉम नायजेरिया' हे शीर्षक लक्ष वेधून घेत. चित्रपटाचा दुसरा नायक आहे मजिद. मजिदने सॅम्युअलला त्याच्या फुटबॉल संघात खेळण्यासाठी नायजेरियावरून आणलंय. चांगले पैसे मिळतील या आशेने सॅम्युअल आपली आजी व बहीण यांना एकटं सोडून केरळमध्ये आलाय. सॅम्युअल हा मजिदच्या टीमचा हुकमी एक्का आहे. त्याच्यामुळे मजिदची टीम मॅच जिंकत असते पर्यायाने मजिदला बऱ्यापैकी पैसे मिळत असतात. बाथरुममध्ये पडल्याचं निमित्त होऊन सॅम्युअल जखमी होतो. त्याला तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येतं. पाठीला आणि पायाला फ्रॅक्चर झालेल्या सॅम्युअलला दोन महिने हॉस्पिटलमध्ये ठेवण्याचा खर्च मजिदच्या आवाक्याबाहेर असतो. नाईलाजाने त्याला सॅम्युअलला आपल्या घरी आणावं लागतं. मजिद आणि सॅम्युअलमध्ये असलेलं मॅनेजर आणि खेळाडू हे संबंध संपून जिवाभावाच्या मैत्रीचं नातं निर्माण होतं त्याची गोड गोष्ट 'सुदानी फ्रॉम नायजेरिया'मध्ये पहायला मिळते या गोष्टीत मजिदची आई, त्याचे सावत्र वडिल, प्रेमळ मित्र आणि गावातल्या विविध स्वभाव धर्माची माणसं याचं लोभस चित्र झकारिया मोहम्मदने चित्रपटात उभं केलंय हे चित्र त्यातल्या प्रादेशिकतेच्या रंगामुळे अधिक विलोभनीय झालंय. अत्यंत छोट्या छोट्या प्रसंगातून गावातलं जनजीवन झकारियाने निगुतीने टिपलयं. मजिदची आई, तिच्या मैत्रिणी यांनी सॅम्युअलची काळजी घेणं, त्याला मायेने खाऊपिऊ घालणं, त्याची स्वच्छता राखणं यातून खेड्यातील स्त्रियांच्या स्वभावातील वात्सल्य अधोरेखित होतं. सॅम्युअल मजिदच्या घरी आल्यावर एखादं नवलविशेष झालं असावं अशा तऱ्हेने प्रत्येक गावकरी मजिदच्या घरी येऊ लागतात. बेडवर पडलेल्या सॅम्युअल बरोबर सेल्फी काढणार जोडपं, योगाची प्रात्याक्षिक दाखवणारे नव्वदीतले आजोबा, त्याला गुपचुपपणे बियर आणून देणारा मित्र आणि त्याच्या खोलीत टिव्ही आणून फुटबॉलची मॅच बघण्याचा आनंद मिळवून देणारी मित्रमंडळी ही ग्रामीण भागातील लोकांच्या सहृदयतेचा दाखला देतात.

मजिद सुरुवातीस सॅम्युअलबद्दल साशंक असतो. त्याने आपल्या प्रतिस्पर्धी संघाच्या मॅनेजरकडून पैसे घेतले असल्याचा आरोपही तो करतो, मात्र हळूहळू सॅम्युअलबद्दल तो हळवा होत जातो. सहानुभूतीची जागा प्रेम घेतं. मजिद आपल्या वैयक्तिक आयुष्यात दुःखी आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या आईने केलेल्या दुसऱ्या लग्नामुळे तो दुखावलेला असतो, त्यातच कायमस्वरुपी नोकरी नसल्यामुळे मुलीकडून त्याला नकार येत असतो. नोकरी, लग्न या आघाड्यांवर अपयशी ठरलेल्या मजिदला सॅम्युअलच्या येण्यामुळे भावनिक आधार मिळतो.

'सुदानी फ्रॉम नायजेरिया'चा आशय मजिद व सॅम्युअल या दोन पात्रांपुरता मर्यादित रहात नाही. स्थानिक पातळीवरील लोकांचे परस्परसंबंध, एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती टिपता टिपता तो स्थलांतरांच्या मुद्यालाही पृष्ठपातळीवर आणतो. नायजेरीयासारख्या गरीब देशातून कामाच्या निमित्ताने स्थलांतरित होऊन भारतात येणाऱ्या तरुणांकडे नेहमी संशयाच्या नजरेतून बघितलं जातं. सॅम्युअलला मात्र मजिद व त्याच्या मित्रमंडळीकडून सुखद अनुभव येतात. आजी वारल्याची बातमी कळल्यानंतर आपल्या बहिणीची अवस्था काय झाली असेल, या विचाराने तो अस्वस्थ होतो. त्याला पुन्हा नायजेरियात पाठवण्यासाठी मजिदला पोलिस यंत्रणेशी झगडा द्यावा लागतो.

'सुदानी फ्रॉम नायजेरिया' त्यातील कलावंताच्या सहज नैसर्गिक अभिनयामुळे प्रसन्न झाला आहे. सॉबिन साहिर या दिग्दर्शक अभिनेत्याने या आधी 'प्रेमम', 'महेशीन्ते प्रतिकारम' यासारख्या सुपरहिट चित्रपटांतून अभिनय केलाय. 'सुदानी फ्रॉम नायजेरिया' मधील मजिदची भूमिका त्याच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉईंट आहे. सॅम्युअलचं प्रत्यक्षातील नावं ही सॅम्युअलच आहे. परप्रांतातील लोकांशी तोडक्या मोडक्या भाषेत संवाद साधत त्यांना आपलासा करणारा हा सॅम्युअल त्याच्या निरागसतेमुळे लक्षात राहतो.

रेक्स विजयनने संगीतबद्ध केलेली दोन्ही गाणी सहज गुणगुणावीत अशी झाली आहेत. गावकऱ्यांचं फुटबॉल प्रेम आणि तिथल्या वातावरणाचं वर्णन करणारं गाणं, त्यातील शब्द रचना व चाल यामुळे लक्षात राहतं. आपल्याला भाषा समजत नसली तरीही त्यातील भावार्थ नेमकेपणाने पोहचतो हे त्या गाण्याचं श्रेय आहे.

सॅम्युअलला फुटबॉलपेक्षाही एका सुंदर जगाची अपेक्षा आहे. पैशांसाठी फुटबॉल खेळताना त्याला मजिदमुळे या सुंदर जगाची ओळख होते. आपल्या देशात परत जाताना तो त्याचा टी शर्ट मजिदला देतो व मजिदचा टीशर्ट घालून प्रवासाला सुरुवात करतो. सॅम्युअलच्या वास्तव्यामुळे मजिदचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोणही बदलून जातो. आपल्या कौटुंबिक नात्यांना नवा अर्थ देण्याचा निर्णय तो घेतो. खेळामुळे दोन व्यक्तींच्या आयुष्यात झालेले हे बदल प्रेक्षकांना सुखावतील असेच आहेत. सुदानी फ्रॉम नायजेरिया आपल्याला त्या माणसांच्या प्रेमात पडायला भाग पाडतो.

**– संतोष पाठारे**

भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७

santosh_pathare1@yahoo.co.in

## स्वागत नवनवीन लेखनाचे!

'शब्द रुची' हा एक व्यापक विचारमंच आहे. विविध विषयांवरील मनमोकळी चर्चा हे 'शब्द रुची'चे वैशिष्ट्य. आपले सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन विषयांवरचे लेखन तसेच वाचकांनी त्यांचा प्रतिसादही कार्यकारी संपादक डॉ. वीणा सानेकर यांच्या खालील मेलवर पाठवावा.

veenasanekar2018@gmail.com

खरं तर माणसाला स्वत:चा चेहरा आरशाशिवाय थेटपणे आणि नीट निरखता येत नाही. असं असताना माणूस नावाचा अक्कलवान प्राणी दुसऱ्यांच्या चेहऱ्याचं वाचन आपणास करता येतं असा वृथा अभिमान का बाळगतो?

♦ ♦ ♦

# 'त्या बायका'

श्वेतल परब

♦ ♦ ♦

मुंबईच्या लोकलमधून प्रवास करताना प्रचंड गर्दी हा अनुभव काही अचंबित करणारा नव्हे. असंच एकदा माझं माझ्या काकींबरोबर जाणं झालं. त्या प्रवासात काकींच्या तोंडून ऐकलेले 'त्या बायका' हे शब्द अजूनही मी विसरू शकले नाही. त्या दिवशी डब्यात प्रचंड गर्दी होती. काकींचा तर तो नेहमीचाच अनुभव होता. माझ्यासाठी मात्र ती गोष्ट नवीन होती. गर्दीत कुणी सीटवर बसण्यासाठी, तर कुणी हात पकडून नीट उभं रहाण्यासाठी धडपडत होत्या. काहीजणी आक्रस्ताळेपणी एकमेकींच्या अंगावर खेकसत होत्या. तर काहीजणी एकमेकांच्या झिंज्या उपटण्याच्या तयारीत होत्या. पहिल्या वर्गाच्या डब्यातून नेहमी प्रवास करणाऱ्या काकींना, त्या दिवशी माझ्याबरोबर सामान्य दर्जाच्या डब्यातून प्रवास करावा लागला. इंग्रजी शब्दांचा अधूमधून भडिमार करत काकी बोलत राहिल्या. बोलता बोलता म्हणाल्या, 'त्या बायकांच्या' तोंडी आपण लागत नाही गं, आम्हाला हे रोजचंच आहे. माझ्या अंदाजानं 'त्या बायका' सगळ्या बहुधा कामगार वर्गातल्या असाव्यात. पण माझ्या मनाच्या कोपऱ्यात त्या बायकांनी कधी जागा घेतली ते कळलंच नाही.

आपल्या चर्चेत नेहमी 'ती बाई', 'तो पुरुष' 'त्या बायका', 'ते पुरुष', 'त्यांनी', 'त्यांचा', असे तृतीयपुरुषी सर्वनामनिर्देशक शब्द कधी रिघतात ते कळत नाही. त्यातला 'त्या बायका' हा शब्द उपरोधात्मक वाटावा एवढा मनाला टोचणी लावल्याशिवाय राहत नाही. बऱ्याच ठिकाणी चारचौघात बोलताना बिनदिक्कतपणे 'त्या बायका' हा शब्द उच्चारला जातो. अर्थात चर्चेत सहभागी असणाऱ्यांना सोडून तो शब्द वापरला जातो. अशावेळी माझ्यासारख्या अनेकांना हा प्रश्न देखील पडत असेल की 'त्या बायका' कोण? त्यांना चेहरा असतो का? आणि असलाच तर तो माणसांचा असतो का?

खरं तर माणसाला स्वत:चा चेहरा आरशाशिवाय थेटपणे आणि नीट निरखता येत नाही. असं असताना माणूस नावाचा अक्कलवान प्राणी दुसऱ्यांच्या चेहऱ्याचं वाचन आपणास करता येतं असा वृथा अभिमान का बाळगतो? कॉलेजमध्ये असताना माझ्या मैत्रिणीने सांगितलेला एक अनुभव मला आठवतो. माझी मैत्रीण संगीता एकदा फिरतफिरत गावकुसाबाहेरच्या वस्तीत गेली. तिचा जन्म गावातल्या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या घरात झाला होता. माझ्या कॉलेजजीवनात तिच्याइतकीच मी समाजवास्तवाबद्दल अनभिज्ञ होते. त्या वस्तीमध्ये तिला प्रत्येक घरातल्या बायका दारातच कपडे धुणे, मुलांना आंघोळ घालणे, भाज्या धुणे ही कामे करताना आढळल्या. तिला हे सगळं अजब वाटलं. तिच्या तोंडून चटकन उद्गार बाहेर पडले, ''बरं झालं, त्या बायका आमच्या वस्तीपासून लांब आहेत. किती घाणेरडेपणा! सगळं हगणंमुतणं एकाच जागेवर करतात. त्यांच्या हातचं कोणी पाणीसुद्धा पिणार नाही.'' तिच्या तोंडून त्यावेळेस बाहेर पडलेल्या 'त्या बायका' या शब्दांनी माझ्या काळजाला कात्री लावली. त्या बायकांच्या जागी मी जन्माला आले असते तर! असं क्षणभर वाटून गेलं.आणि 'त्या



रेखाटन : ईशा सानेकर

बायका' आणि 'या बायका' हा भेदाभेद कुणी निर्माण केला?

काहीवेळा घराघरात देखील चार बायका एकत्र जमल्यावर चर्चेला ऊत येतो आणि त्या चर्चेत 'त्या बायका' अधूनमधून हजेरी लावत असतात. आपण कसं सरळ अगदी नाकासमोर चालणारी माणसं. त्या बायकांना कसा जमतं, नवरे घरात नसताना नट्टापट्टा करायला? आम्हाला साधं पावडर लावणं पण जमत नाही. दुसरी कोणीतरी म्हणते, आमच्या ह्यांना आम्ही तसं वागलेलं चालत नाही, उगाच नाही त्यांना त्यांचे नवरे त्रास देत, 'त्या बायकाच' तसल्या. एकंदरीत 'त्या बायका 'म्हणजे त्यांच्यासाठी टापटिपीची आवड असलेल्या, नटणाऱ्या, बिनधास्तपणे पुरुषात वावरणाऱ्या असाव्यात असा सूर दिसत होता. आणि प्रत्येक बाईनं नवऱ्याची सावली बनून राहावं हा पारंपरिक सूर देखील त्यातून निघत होता. खरं तर चारचौघात कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या त्या बायका आत्मनिर्भर असतात, ही जमेची बाजू असताना त्या निंदेच्या किवा कुचेष्टेच्या विषय ठराव्यात ही अंत्यत खेदजनक बाब वाटते. त्या बायका अर्धशिक्षित असल्यानं थोड्या उद्धट वाटाव्यात अशा असतात. पण त्यांच्या अंतरंगात डोकावून पाहिल्यास तिथे आपल्याला माणुसकीचा झरा सापडेल. मला अनेकवेळा वाटतं परिस्थिती माणसाला घडवते माणूस परिस्थितीला नाही.

असंच एकदा वैशाली हळदणकर या बारबालेच 'मी बारबाला' हे आत्मचरित्र वाचनात आलं. खरं तर आत्मचरित्र ही थोरामोठ्यांची असतात. पण समाजातील या पतित गटात मोडणाऱ्या बाईचं आत्मचरित्र वाचताना शुचिर्भूत समाजाचं वास्तव माझ्या नजरेसमोर आलं. शहरातील अशा कितीतरी मुली, बायका आणि तृतीयपंथी महिला कुटुंबाचा भार खांद्यावर घेऊन बार, पब किंवा हॉटेलमध्ये नृत्य किंवा गायनाचं काम करतात. आपण त्यांच्याकडे केवळ 'रात्र संपवणाऱ्या बायका' याहून वेगळ्या नजरेनं बघत नाही. अगदी शेजारी राहूनदेखील त्यांच्यापासून किंवा त्यांच्या मुलांपासून फटकून वागणारी माणसं आढळतात.

कधीकधी ही परिस्थिती आपल्यापैकी कोणावर ओढवेल, अशी कल्पना नसताना अचानक एखादं दाहक वास्तव समोर येतं. मीना नावाची माझी एक विद्यार्थिनी, शिक्षिका आहे. ती एकदा मला एका शिबिराला भेटली. मी तिच्याकडे तिच्या वर्गात सर्वात हुशार असलेल्या 'रेवा' नावाच्या मुलीबद्दल चौकशी केली. ती म्हणाली, ''मॅडम, ती आता आपल्यातली नाही राहिली.'' मी दचकून विचारलं, ''काय झालं गं रेवाचं?'' ती म्हणाली,'' रेवाच्या बाबतीत खूप वाईट घडलं. बारावी झाल्यावर ती मुंबईला नोकरीला गेली. तिथेच तिच्याबरोबर काम करणाऱ्या एका मुलाबरोबर तिने लग्न केलं. वर्षभरातच तो मुलगा तिला कामाठीपुरा भागात विकून आपण आखातात निघून गेला.'' मीना एकदा आपल्या नातलगांकडे मुंबईला गेली असताना, तिला अंधेरी स्टेशनला रेवा भेटली दोघीही अगदी जिवलग मैत्रिणी असल्याने, मीनाला फार आनंद झाला. पण तो आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसला नाही. बोलताबोलता तिने आपल्या बाबतीतील भयानक वास्तव सांगितलं आणि मीनाला म्हणाली, ''तू लवकर इथून निघून जा, कारण मी आता तुमच्या जगातील राहिले नाही. मी आता 'त्या बायका'तील एक झालेली आहे. तुला माझ्याबरोबर कुणी बघितलं तर तुझी बदनामी होईल.'' अशा कितीतरी मुली स्वत:चा चेहरा लपवत समाजबाह्य म्हणून जीवन कंठत आयुष्य घालवतात. त्यांना बघून 'आतल्या बायका' नाकं मुरडतात.

दुसरी एक माझ्या मैत्रिणीला अनुभवास आलेली गोष्ट. ठाण्यातील एका उच्चभ्रू वस्तीतील इमारतीमध्ये माझी मैत्रीण आपल्या पोलीस इन्स्पेक्टर असलेल्या नवऱ्याबरोबर व आपल्या मुलांसोबत राहत होती. त्या इमारतीमधील काही मुली व बायका डान्सबारमध्ये कामाला जात असत. रोज संध्याकाळी मुखवटे रंगवून कामाला जाणाऱ्या बायकांपासून त्या इमारतीत राहणारी सगळी माणसं अलिप्त राहत असत. माझ्या मैत्रिणीलादेखील तिच्या नवऱ्यानं त्या बायकांबरोबर किंवा त्यांच्या मुलांबरोबर कोणतेही संबंध ठेवायचे नाहीत, असं दटावून सांगितलं होत. मजबुरी म्हणून शहरात अशाप्रकारचं काम करणाऱ्या बायका या आपल्या समाजाच्या घटक नसतात काय? आणि असतील तर त्यांना अशाप्रकारचं जिणं जगायला भाग पडणाऱ्या व्यवस्थेबद्दल आपल्याला काहीच कसं वाटत नाही?

या बारबालांप्रमाणे शहरात सेक्सवर्कर्स म्हणून काम करणाऱ्या बायका हा चर्चेचा विषय बनतो. समाजातील उपेक्षित घटकांपैकी त्या एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. अशा बायकांकडे पाहून आपण तोंड फिरवतो. अशावेळी समाजातील वासनांध आत्म्यांना शुद्ध करणाऱ्या या बायकांबद्दल आपल्या मनात ती एक स्त्री म्हणून यत्किंचितही करूणा पाझरत नाही. अलीकडे मीना सरस्वती सेषु यांचा 'जगण्याचा संघर्ष 'हा लेख वाचनात आला. ज्यामध्ये त्यांनी या सेक्सवर्कर्स बायकांच्या जगण्याचा संघर्ष मांडला आहे. त्यातीलच एक किरण देशमुख नावाची बाई म्हणते, ''आम्ही कुटुंबप्रमुख आहोत. आमचे कुटुंब, मुलाबाळांचे शिक्षण व आरोग्य यासाठी कुटुंबप्रमुख म्हणून आपण जबाबदारी सांभाळतो. वेश्याव्यवसाय हे आमचे उदरनिर्वाहाचे साधन आहे, हेच आमचे काम आहे.'' यावरून त्यांच्या कौटुंबिक आणि सामाजिक स्थितीची आपल्याला कल्पना येऊ शकते. कोणत्या शारिरिक आणि मानसिक यातनांना 'त्या बायका' सामोऱ्या जात असतील, त्या वेदना आपल्यापर्यंत पोचल्याच तर आपली प्रतिक्रिया काय असते हे आपण सगळे जाणून आहोत. ही देखील आपल्या समाजातील वेगळी कुटुंब आणि अर्थव्यवस्था आहे हे आपण मान्य करायला तयार होत नाही.

प्रसिद्ध लेखिका कविता महाजन यांच्या 'ब्र' या कादंबरीवर अशीच एकदा चर्चा सुरू होती. त्या चर्चेत साहित्यक्षेत्रातील मातब्बर असे जाणकार सहभागी झाले होते. त्यातलाच कोणीतरी म्हणाला, ''कसं काय जमलं तिला त्या बायकांबद्दल लिहायला. आम्ही पंचवीस-तीस वर्ष लेखन करतोय तरी आम्हाला ते जमत नाही.'' दुसरा चट्कन म्हणाला, ''ती बाई तशीच असणार. तिला त्याच गोष्टीत जास्त रस असेल, नाहीतर पुण्यामुंबईतल्या 'त्या'सारख्याच.''

माझ्या कानात पडलेल्या 'त्या बायका' या शब्दांनी मला वास्तवाची जाग आणली. जगण्याच्या धडपडीत आपणच ठरवतो इतरांनी कसं वागावं, काय करावं ? इतरांचं जीवनविश्व समजून न घेता आपलीच जीवनपद्धती वा मतं त्यांच्यावर लादण्याचा अघोरीपणा आपण करत असतो, पिंडे पिंडे मती र्भिन्नः। याप्रमाणे प्रत्येक माणसाची जीवन जगण्याची पद्धत वेगळी असते. त्याचं असं एक स्वतंत्र अनुभवविश्व असतं. त्या त्या काळातील वास्तवाला भिडून माणूस लेखन करत असतो. त्यामध्ये तो कोणत्या धर्माचा, जातीचा किंवा पंथाचा आहे असा विचार करणं चुकीचं आहे. तसेच लिंगभेद मनात ठेवून चांगल्यावाईटाची शहानिशा करणं हे देखील कोत्या मनाचं निर्देशक मानावं लागेल. शहरी भागात राहणाऱ्या त्या स्त्रीनं जर तेथील वास्तवपट उलगडून दाखवला तर ती बाई असभ्य गटामध्ये मोडते, अशी तिची विभागणी करणारे आपण कोण?


एकूणच 'त्या बायका' असं म्हणताना प्रत्येकाच्या बोलण्यात औपरोधिक सूर आढळतो. आखीवरेखीव आयुष्य जगणाऱ्या, स्वत:च्या चेहऱ्याची नीटशी ओळख नसणाऱ्या माणसाना दुसऱ्याच्या चेहऱ्यात आपला चेहरा दिसू नये, ही शोकांतिका मानावी लागेल. हर्ष, खेद, राग, लोभ, मद, मोह, मत्सर हे षड्रिपू सगळ्यांच्या वाट्याला सारखेच असतात. हे माहीत असलं तरी दुसऱ्यांच्या हृदयात डोकावून बघावं असं त्यांना का वाटत नाही? दिवसभरात आपल्या चेहऱ्यावर बदलत्या भावसंवेदना असतात, त्याचं वाचन करणारं दुसरं कुणीतरी असतंच ना? तरीदेखील माझा चेहरा मला प्रिय का वाटावा? याचा अर्थ असा आहे की, आपण आपल्याच चेहऱ्यावर प्रेम करतो. दुसऱ्याकडे बघताना मात्र आपल्या आदिम प्रवृत्ती जाग्या होतात. त्यामुळे दांभिकपणाचा बुरखा पांघरलेलं जग, हे खरोखरीचं जग आहे असं भासू लागतं. तसं पाहता चेहऱ्यात चेहरे मिसळलेले असल्याने त्याचा, तिचा आणि माझा असा भेद नसतोच मुळी. प्रसिद्ध लेखिका दुर्गाबाई भागवत म्हणतात त्याप्रमाणे, ''हे चेहऱ्यामागचे मुखवटे खरवडून काढता आले असते तर बरे झाले असते. कदाचित 'त्या बायका' हा शब्दच कुणाच्या तोंडून बाहेर पडला नसता.''

**– श्वेतल अनिल परब**
भ्रमणध्वनी : ९४२३३०१८९२
shwetalparab2551971@gmail.com

ग्रंथाली

**सतीश भावसार लिखित**

# तीन चित्रकार




व्हिन्सेंट व्हॅन गॉग, अमृता शेरगिल आणि प्रभाकर नाईक–साटम हे भिन्न संस्कृतीत रुजलेले प्रतिभावंत आहेत.
व्हॅन गॉगच्या तजलेदार रंगांच्या आवेगपूर्ण फटकाऱ्यांमधील अस्वस्थता इम्प्रेशनिझम इतकीच त्याच्या आयुष्यातील स्त्रियांच्या क्लेशदायक अनुभवांनी आलेली होती.
अमृता शेरगिलने पाश्चात्य आधुनिक कलेचा प्रवाह भारतात आणला आणि आपल्या अल्प आयुष्यात मुक्त कलावंताचं जीवन ती जगली.
प्रभाकर नाईक साटम मूळचे कोकणातले, पण जपानमध्ये त्यांनी टॅपेस्ट्री या कलाप्रकारात एक वेगळी कलात्मक उंची गाठली.
या तीनही प्रतिभावंतांच्या जीवनसंघर्षाचं कलात्मक दर्शन सतीश भावसार यांच्या 'तीन चित्रकार' या पुस्तकात घडतं. व्हॅन गॉगवर पडलेला जपानी मुद्राचित्रांचा प्रभाव, नाईक साटम ह्यांना लाभलेली जपानची कर्मभूमी आणि अमृता शेरगिलने साधलेला पाश्चात्य आधुनिकता आणि पौर्वात्य परंपरा यांचा समतोल असं एक सांस्कृतिक अभिसरण इथे प्रत्ययाला येतं.

**– दीपक घारे**

**मूल्य २०० रु.  सवलतीत १२० रु.**

## सातासमुद्रापलीकडून




# अमेरिका : काही अनिवासी व भारतीय वंशाच्या अब्जाधिशांची कथा

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**ऑ**क्टोबर महिना आला की दोन गोष्टी हटकून घडतात. निसर्ग यक्षिणीची कांडी फिरवून वसुंधरेचं वस्त्र बदलतो. त्या महिन्यात 'फोर्ब्ज' हे जगप्रसिद्ध वित्त मासिक अमेरिकेतल्या लक्ष्मीपुत्रांची यादी प्रसिद्ध करते. या ४०० भाग्यवानांमध्ये वर्णी लागणं नोबेल किंवा भारतरत्न मिळवण्याएवढं कठीण. ज्ञानात भर घालण्याएवढंच संपत्ती प्राप्त करण्यास भगीरथ प्रयत्न लागतात. हल्ली तर यात नंबर लागण्यास नुसता अब्जाधीश असून चालत नाही. तसे अमेरिकेत मॅकडॉनल्डसप्रमाणे गल्लोगल्ली सापडतात. म्हणजे सामान्य अब्जाधीश गावराणी समजण्यात येतो. पुराव्यासह कमीत कमी २.१ अब्ज (म्हणजे आपले १५० अब्ज अवमूल्यित रु.) संपत्ती नसेल तर या मासिकात नाव झळकण्याची स्वप्न कुणी बघू नये. याचाच अर्थ असा की नीरव मोदी, चोक्सी किंवा विजय मल्ल्याच्या लेखापालाची इथे डाळ शिजत नाही.

ही यादी गेल्या ३७ वर्षांपासून सातत्यानं प्रसिद्ध होत आहे. मासिकाचं संशोधन एवढं खोल व अचूक की त्याची आकडेवारी जगभर प्रमाणित मानली जाते. एवढे जबरदस्त निकष लावूनही या ४०० अतिश्रीमंतीत मला कमीत कमी ५ भारतीय नावं सापडलीत. त्यांचे हे असामान्य कर्तृत्व आजमावण्यासाठी त्यांचा अभ्यास करणं उद्बोधक ठरेल. पण त्यापूर्वी या वर्षीच्या दोन व्यक्तींविषयी चर्चा करणं महत्त्वाचं आहे. आपल्याला या क्रमवारीत दरवर्षी मायक्रोसॉफ्टचा सहसंस्थापक बिल गेटस्‌चं नाव बघण्याची सवय. त्याची ९८ अब्ज डॉलरची संपत्ती भारताच्या संरक्षण खात्याचं सर्व बिल एक नव्हे तर दोन वर्ष भरू शकेल. पण या वर्षी 'ॲमॅझॉन'चा ५४ वर्षीय संस्थापक बेझोझनं १३७ अब्ज डॉलरचं डबोलं प्राप्त करून बिलचा नंबर पटकावला. त्यामुळे आपल्याला मुळीच वाईट नाही असं बिल म्हणतो. त्यावर विश्वास ठेवण्यास बुद्धी बरीच ताणावी लागेल. बिलचं दुखणं फार काळ टिकणार नाही कारण



जानेवारी २०१९ मध्ये आपण एका बाईसाठी २५ वर्षांचा व ४ अपत्यांचा संसार मोडणार असं बेझोझनं जाहीर करून बिलचे अश्रू पुसले. जेफची अर्धी संपत्ती बायकोला गेल्यावर त्याच्याजवळ 'फक्त' ६८.५ अब्ज डॉलर उरतील आणि बिल पुन्हा वर्चस्व गाजवेल हे उघड आहे.



दुसरं म्हणजे या क्रमवारीत अमेरिकेचे अध्यक्ष **डोनाल्ड ट्रंप** (पहा : ट्रंप – एक वादळी जीवनपट, ग्रंथाली प्रकाशन २०१८) चा नंबर कुठे लागतो? १९९०च्या दशकात जेव्हा डोनाल्ड दिवाळखोरीच्या काठावर उभा होता, तेव्हा फोरब्जनं त्याचं नाव गाळलं. नाहीतर दरवर्षी त्यानं आपली वर्णी लावली. आतापर्यंत एकूण सुमारे १६०० पूंजीपतींनी ही यादी भूषवली. फोर्ब्ज आपली संपत्ती मोजण्यास पक्षपात करतो म्हणून ट्रंपचा या मासिकावर सुरुवातीपासूनच रोष आहे. अध्यक्ष झाल्यावर ट्रंपची संपत्ती वाढण्याऐवजी घटली हे विशेष. असं भारतात कधीच होत नाही. सत्ताधारी राजकारणी तळ्याची राखण करीत असल्यामुळे भरपूर पाणी पितात हे सर्वांना ठाऊक आहे. ट्रंपची संपत्ती ४.५ अब्ज डॉलरवरून ३.१ अब्ज डॉलरवर घसरली असं फोरब्ज मासिकानं गणित केलं. याचं कारण मॅनहॅटनमधील मालमत्ता संपत्तीची किंमत कमी झाली. बाजारपेठीय शक्तींना अमेरिकेचे बलशाली अध्यक्ष देखील अडवू शकत नाही, हेच खरं.




यावर्षी पहिल्यांदाच या यादीत नंबर लावणारा अमेरिकेत जन्मलेला भारतीय म्हणजे **नीरज शहा.** तो कॉर्नेल युनिव्हर्सिटीमध्ये अभियांत्रिकी शिक्षणासाठी गेला. त्याची सहाध्यायी स्टिव्ह कोनिन (Conine) नावाच्या अमेरिकन विद्यार्थ्यांशी भेट झाली. त्या दोघांनी २००२ मध्ये ॲमॅझॉनच्या जेफ बेझोझला गुरुस्थानी ठेवून महाजाळावर पुस्तकाऐवजी फर्निचर व घर सुशोभित करणाऱ्या वस्तू विकणारी नवीन कंपनी बाजारात आणली. तिला वेफेअर (Wayfair) नाव दिलं. ती एवढी यशस्वी झाली की २०१४ मध्ये तिचं सार्वजनिकीकरण होऊन समभागांची किंमत व शहाची संपत्ती वधारली. या ४०० लोकांच्या यादीत ४४ वर्षीय शहाचा ३६८ वा नंबर लागला. अमेरिकन दूरदर्शनवर कंपनीच्या जाहिराती सारख्या बघायला मिळतात. पण त्यामागे एक भारतीय प्रारंभी शूर माणूस उभा आहे याची कुणालाच कल्पना नाही. उद्योगजगात शहा बहुआयामी आहे कारण वेफेअरशिवाय त्यानं अनेक दुसरे उद्योग सुरू केले. त्याची बायकोही एक स्वतंत्र उद्योजिका आहे.




**राकेश गंगवाल** या दुसऱ्या लक्ष्मीपुत्राचं नाव या ४०० पुंजीपतींच्या यादीत उठून दिसतं. त्याचा जन्म कोलकत्ताम धला. कानपूर आयआयटी (IIT) मधून अभियत्यांची पदवी प्राप्त केल्यावर त्यानं अमेरिकेला प्रयाण केलं व पेनसिल्वेनिया विद्यापीठाच्या व्हार्टन बिझिनेसम धून पदव्युत्तर व्यवस्थापनशास्त्रात पदवी (MBA) मिळवली. त्यानं नागरी वायुसेवा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली. १९८४ मध्ये अमेरिकेतल्या प्रसिद्ध युनायटेड एअरलाईन्समध्ये नोकरी पटकावली. त्या अनुभवांच्या शिदोरीवर त्याला १९९८ ते २००१ पर्यंत यु.एस. एअरवेज (U.S. Airways) या मोठ्या कंपनीचा चेअरमन व कार्यकारी मुख्याधिकारी नेमण्यात आलं. त्यानंतर त्यानं हे ज्ञान व कौशल्य भारतात २००६ मध्ये इंडिगो (Indigo) नावाची माफक दरात तिकीटं विकणारी वायुसेवा कंपनी दिल्लीतला आपला मित्र राहुल भाटिया बरोबर स्थापन केली. कंपनीजवळ त्यावेळी फक्त १ विमान होतं आणि खोल खिसे व सरकारचा पाठिंबा असलेल्या एअर इंडियाजवळ कितीतरी जास्त विमानं होती. या प्रस्थापित व भारताचा झेंडा जगभर पसरवणाऱ्या कंपनीशी ही चिमुकली व नवनिर्वाचित कंपनी स्पर्धा करण्यास निघाली. ही गोलाएथ व डेव्हिडमधली चकमक होती. खाजगी क्षेत्रानं सरकारी क्षेत्राशी केलेली लढाई. यात कोण जिंकलं हे सर्वांना ठाऊक आहे. आज इंडिगोजवळ २०९ विमानं असून तिनं जगात सर्वात मोठी जास्त नवीन विमानं विकत घेण्याची ऑर्डर दिली तर सरकारचा जावई समजला जाणारा एअर इंडिया गेल्या अनेक वर्षांपासून मृत्यूशय्येवर पडला आहे. सरकारनं तिजोरी उघडली नसती तर कंपनीचं केव्हाच दिवाळं निघालं असतं. भारतातली सर्वात मोठी वायुसेवा कंपनी म्हणून इंडिगो ओळखली जाते तिनं जवळजवळ ५०% बाजारपेठ काबीज केली असून ती एकटी नफेखोर कंपनी देशात उरली आहे. सरकार विमान इंधनावर जगात सर्वाधिक कर आकारत असल्यामुळे तिचा नफा कमी झाला एवढंच.

या यशाचं श्रेय ६५ वर्षीय गंगवाल व भाटिया यांना जातं. बाजारपेठीय अर्थव्यवस्था सरकार नियंत्रित अर्थकारणापुढे केव्हाही श्रेष्ठ हे त्यांनी पुन्हा सिद्ध केलं. तो कंपनीचा ३७% समभागधारक असून मायामी, फ्लोरिडामध्ये रहातो. आज त्याच्या समभागांचं बाजारमूल्य २.३ अब्ज डॉलर असून फोर्ब्जच्या यादीत त्याचा ३५४ वा नंबर लागतो. त्यानं रोजच्या कारभारातून अंग काढून घेतलं. आता संचालक मंडळाचा एक सदस्य म्हणून काम करतो.

७१ वर्षीय **रमेश वाधवानी** मुंबईतला. त्याचंही शिक्षण तिथल्या आयआयटीमधलं. अमेरिकेत त्यानं कारनेगी मेलन युनिव्हर्सिटी,




पिटस्‌बर्गमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेऊन सिंफनी (Symphony) टेक्नॉलॉजी ग्रुप नावाची कंपनी स्थापन केली. त्यापूर्वी त्यानं १९९१ मध्ये आस्पेक्ट डेव्हलपमेंट नावाची उद्यमारंभी कंपनी सुरू केली. ती एवढी यशस्वी झाली की वाधवानीनं १९९९ मध्ये ९.३ अब्ज डॉलरला विकून विक्रम केला. कंपनीचे इतर समभागधारक असल्यामुळे त्याच्या खिशात सर्व पैसे पडले नाहीत. आज त्याची संपत्ती ३ अब्ज डॉलर असून त्याचा फोरब्जच्या यादीत २७१वा नंबर लागतो. त्यानं आपली संपत्ती धर्मादाय कार्यासाठी वापरली हे विशेष. त्याचा अमेरिकेला व भारताला फायदा झाला. वाधवानी प्रतिष्ठानानं भारतात राष्ट्रीय उद्यमशील जाळं (National Enterpreneurship Network) स्थापना करून भारतातली ५०० विद्यापीठं व महाविद्यालयं जोडली. त्यामुळे प्रारंभीशूरपणा असलेले तरुण-तरुणी एकत्रित येऊन त्यांचा विकास होण्यास मदत होते. परवा त्यानं मुंबई विद्यापीठाला मोठी देणगी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन केंद्र स्थापन करण्यास दिली. ही ज्ञानशाखा आधुनिक जगात देशाचं भवितव्य ठरवित असल्यामुळे त्यात जो देश अग्रणी असेल तो प्रभुत्व गाजवेल असं म्हणतात. म्हणून त्या क्षेत्रात अमेरिका व चीनमध्ये जबरदस्त स्पर्धा सुरू आहे. याशिवाय २०१२ मध्ये त्यानं जैवशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आपल्या आईच्या नावानं (शांता) नॅशनल सेंटर फॉर बायालॉजिकल सायन्सेस नावाचं बंगलोरमध्ये संशोधन केंद्र सुरू केलं. याप्रमाणे त्याच्या यशाचा भारताला फायदाच झाला. त्याचा जन्म कराचीतला. फाळणीच्या वेळी तो १ वर्षाचा असताना मुंबईत स्थलांतरित झाला.



या यादीत अनेक वर्षांपासून सन्मानाचं स्थान पटकवणारा दुसरा अनिवासी भारतीय म्हणजे **विनोद खोसला**. त्याचे वडील भारतीय सेनेत अधिकारी होते. त्यामुळे त्यांना काही काळ पुण्यात खर्च करावा लागला. विनोदनं शालेय शिक्षण दिल्लीतच घेतलं. त्यानंतर आयआयटी, दिल्लीतून पदवी मिळवल्यावर भारतीय स्थलांतरितांचा धोपट मार्ग पत्करला. कार्नेगी मेलन विद्यापीठातून M.S. प्राप्त केल्यावर स्टॅनफोर्डमधून एमबीए मिळवली आणि तो सिलिकॉन व्हॅलीमध्येच स्थिरावला. तिथे त्यानं १९८२ मध्ये सन मायक्रोसिस्टम नावाची संगणक कंपनी ३ अमेरिकन मित्रांबरोबर स्थापन केली. ती संगणकीय यंत्रणा (Hardware) व मंत्रणा (Software) विकून यशस्वी झाली. जावा (Java) नावाची कार्यप्रणाली तिचीच. पण पहिल्या दोन वर्षातच कंपनीवर व्यवस्थापकीय गंडांतर ओढवलं. कर्मचारी वर्ग जसा वाढत गेला तसा त्याचं व्यवस्थापन करणं विनोदला कठीण गेलं. शिवाय त्याची स्पष्ट बोलण्याची पद्धत कित्येकांना आवडली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी बंड पुकारलं. संचालक मंडळानं त्याची दखल घेतली आणि विनोदनं राजीनामा दिला. त्यानंतर त्यानं व्हेंचर कॅपिटॅलिस्ट म्हणून व्हॅलीतल्या नामवंत कंपनीत काम केलं. ते कौशल्य प्राप्त केल्यावर त्यानं स्वत:चीच खोसला व्हेंचर्स कंपनी २००४ मध्ये स्थापन केली. त्याच्या नावामुळे अनेक नामवंत गुंतवणूकदारांनी त्याच्या कंपनीत गुंतवणूक केली. नव्यानेच स्थापन झालेल्या कंपन्यांचं भवितव्य ओळखून त्यांच्या वाढीसाठी भांडवल पुरवण्याची कला त्यानं आत्मसात केली आणि त्यामुळे अनेक कंपन्या भरभराटीला येऊन खोसलचा फायदा झाला. आज त्याची संपत्ती २.२ अब्ज डॉलरची असून त्याचा ४०० पुंजीपतींमध्ये ३६८ वा नंबर लागतो.

इथे विनोदचे काही स्वभावविशेष नोंद करणं आवश्यक आहे. त्याचा आवडता रंग म्हणजे जांभळा. त्याचं ऑफिस, फर्निचर सगळं जांभळ्या रंगाचं. स्वभाव कर्तव्यकठोर व करारी. माघार कशी घ्यावी हे त्याला ठाऊकच नाही. त्यानं २०१० मध्ये न बघताच केवळ लहरीवर एक समुद्राभिक वस्ती विकत घेतली आणि तो समुद्रकाठ (beach) आपला स्वत:चा म्हणून जनतेला प्रवेश बंद केला. खटले झाले. खालच्या कोर्टाचा निकाल त्याच्याविरुद्ध गेले. कॅलिफोर्नियाच्या सर्वोच्च न्यायालयातही त्यानं हार खाल्ली. एव्हाना त्यानं विख्यात वकील कामावर ठेवून त्या खरेदीपेक्षा जास्त खर्च कोर्टकचेऱ्यावर केला होता पण हट्टी व आडमुठ्या स्वभावामुळे त्याला ती जमीन विकून खटला मिरवून टाकण्याचं सुचलं नाही. त्यानं शेवटी केस अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात नेली. तिथेही नकार घंटा वाजली. या विधी द्वंद्वात त्याला आर्थिक त्रासापेक्षा भावनिक यातना जास्त सोसाव्या लागल्या.



शेवटचं नाव म्हणजे **कवितर्क राम श्रीराम.** त्याचा जन्म मद्रासमधला (१९५६). त्याचं शिक्षण आयआयटीमध्ये झालं नसून युनिव्हर्सिटी ऑफ मद्रासमध्ये झालं. त्याचं वैशिष्ट्य असं की तो अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी न येता सरळ नोकरीसाठी आला. त्याला नेटस्कॅफे (Netscape) नावाच्या कंपनीत १९९४ मध्ये उच्चपदस्थ नोकरी मिळाली. नंतर तो 'जंगली' नावाच्या कंपनीचा अध्यक्ष झाला. ती कंपनी महाजालावर निरनिराळ्या दुकानात विकल्या जाणाऱ्या वस्तूंचे तौलनिक भाव दाखवून शॉपिंग सुखकर करे. तिचं महत्त्व ओळखून ॲमॅझॉननं ती १९९८ मध्ये २०० दशलक्ष डॉलरला विकत घेतली व श्रीराम जेफ बेझोझच्या कंपनीत उपाध्यक्ष म्हणून काम करू लागला. उद्यमशील व प्रारंभी शूर लोकांना दुसऱ्याच्या कंपनीत घाम गाळणं आवडत नाही. तिथे त्यांना कोंडमारा

झाल्यासारखं वाटतं. म्हणून २००० मध्ये त्यानं राजीनामा देऊन स्वत:ची नवीन कंपनी स्थापन केली. एक प्रारंभी गुंतवणूकदार म्हणून श्रीरामनं १९९८ मध्ये गूगल स्थापन झाली तेव्हा अडीच लाख डॉलर गुंतवले. याला एंजल (Angel) इनव्हेस्टर म्हणतात. कंपनी नवीन असल्यामुळे धोका खूप असतो. २००४ मध्ये जेव्हा कंपनीचे शेअर्स बाजारात आले तेव्हा श्रीरामच्या मालकीचे ५ दशलक्ष शेअर्स होते. जमीन खोदताना तेलाची खाण लागावी तसं गुगलमधली गुंतवणूक त्याला फायदेशीर ठरली. त्याचवेळी ॲमेझॉनच्या जेफ बेझोसनं तेवढीच रक्कम गुंतवली आणि त्याच्या संपत्तीतही भर पडली. आज गूगल अल्फाबेट नावाच्या मातृकंपनीची एक उपकंपनी झाली असून त्याचा मुख्याधिकारी सुंदर पिचाय आहे. पण अल्फाबेटचा ९९% नफा गुगलपासून होते. इतर उपकंपन्या तोट्यात जातात.

ही सोन्याची खाण मिळाल्यावर श्रीरामनं गुगलचे समभाग हळूहळू विकण्यास सुरुवात केली. आता त्यानं जवळजवळ सर्व शेअर्स विकले असून तो 'अल्फाबेट' या कंपनीच्या संचालक मंडळाचा एक सदस्य म्हणून काम करतो. त्याची संपत्तीही खोसलाएवढीच म्हणजे २.२ अब्ज डॉलर असून त्याचाही ३६८वा नंबर लागला.

फोर्ब्जच्या यादीत दरवर्षी बदल होतात. शेअर बाजाराच्या नकारात्मक फटकाऱ्यामुळे अनेक गळले जातात. त्यातले एक नाव म्हणजे रिशी शहा. या ३२ वर्षाच्या अमेरिकेत जन्मलेल्या तरुणानं बिल गेट्सप्रमाणे शिक्षण अर्धवट सोडून उद्योग जगात. २०१६ मध्ये आपल्या काही मित्रांबरोबर उडी मारली व कॉन्टेक्स्ट मीडिया (Context Media) नावाची नवीन कंपनी स्थापन केली. मग तिचं आऊटकम हेल्थ (Outcome Health) म्हणून बारसं केलं. डॉक्टरांच्या ऑफिसमध्ये रोगाच्या चित्रफिती तयार करून दृक्‌श्राव्य माध्यमाद्वारे पेशंटचं उद्‌बोधन करणं हे कंपनीचं उद्दिष्ट. ते गुंतवणुकदारांना एवढं आवडलं की वॉलस्ट्रीटवरच्या गोल्डमन सॅक्ससारख्या जगविख्यात व अनुभवी गुंतवणुकदारांनी २०१७ मध्ये शहाच्या अपत्याचं बाजारमूल्य ५.६ अब्ज धरून ५०० दशलक्ष डॉलरची रक्कम गुंतवली. त्यामुळे त्यावर्षी शहाची निव्वळ संपत्ती ३.६ अब्ज डॉलर होऊन त्याला फोरब्जच्या यादीत सहज जागा मिळाली. एवढ्या तरुण वयात एवढी संपत्ती कमावणारा इतिहासात फक्त बिल गेट्सच असावा. कंपनीच्या शेअर्सचे भाव म्हणजे तिच्या यशाचा आरसाच. तिचं बरंवाईट, भलंबुरं लगेच शेअर्सच्या किंमतीत प्रतिबिंबित होतं आणि त्याच वर्षी गुंतवणुकदारांनी कंपनीला फसवणूक केली म्हणून कोर्टात ओढलं. शहानं पैसे भरून खटला मिटवला व राजीनामा दिला. त्याच्या निव्वळ संपत्तीलाही ग्रहण लागलं आणि तो या प्रतिष्ठित यादीतून वगळला गेला.

– **अनंत पां. लाभसेटवार,** Ph.D.
anantlabh@gmail.com
(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)

॥ग्रंथाली॥

**शुभांगी नितीन मुळे लिखित**

**सृजनशील जगन्मित्र**




सर्वांशी आपुलकीनं वागणं, सर्वांना मानसन्मान देणं, सर्वांशी समान वागणूक, सर्वांना सकारात्मक ऊर्जा देणं ही डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची वैशिष्ट्यं. पस्तीस वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेतून डॉ. ज्ञानेश्वर मुळे आता निवृत्त झाले आहेत. जगाचा अद्‌भुत अनुभव गाठीशी आहे आणि अनुभवाचा सदुपयोग ते आता समाजपरिवर्तनाकरता करू इच्छित आहेत. त्यांच्या सृजनशील जगण्याचा हा थोडक्यात आढावा...

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

**अर्जुन जगधने लिखित**

**नैतिक-अनैतिक**

या कथांमधील पात्रांचे हे धाडसी निर्णय आणि कृती बरेचदा नैतिक आणि अनैतिक या संकल्पनांची चर्चा छेडतात. तत्वच्युत झालेल्या पतीपासून अलग होऊन विचारपूर्वक दुसऱ्या विचारी आणि आवडीनिवडींचे सूत जमू शकणाऱ्या पुरुषाशी नवे सहजीवन सुरू करणाऱ्या स्त्रिया या कथांमधून भेटतात.
त्यात आधीचा संसार मोडून दुसरी निवड केली असेल, तर नाहीच नाही. पण जगधने यांनी उभी केलेली स्त्रीपात्रे काहीएका विचारातून, नैतिक भूमिकांतून हा निर्णय घेताना दिसतात.




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

# पुस्तक प्रकाशन

## 'तीन चित्रकार'

सतीश भावसार यांच्या 'तीन चित्रकार' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ १६ मार्च २०१९ रोजी रचना संसद येथे पार पडला.

मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन करताना कार्यक्रमाचे स्वरूप विशद केले. कलेविषयी प्रत्येकाला कुतूहल असते आणि माणूस हळूहळू चित्रलिपीकडे वळतोय असं त्यांनी सांगितलं. सुदेश हिंगलासपूरकरांनी ग्रंथालीच्या विविध घडामोडींची माहिती देत व्यासपीठावरील उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी सतीश भावसारांचा विक्रम गोखलेंच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कारानंतर 'तीन चित्रकार' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ रंगकर्मी विक्रम गोखले यांच्या हस्ते झाले.

प्रकाशनानंतर अमृता मोडक आणि श्रीनिवास नार्वेकर यांनी पुस्तकातील काही उताऱ्यांचे अभिवाचन केले. याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. सतीश भावसारांनी पुस्तकाच्या निर्मितीची कारणमीमांसा स्पष्ट केली. या पुस्तकातील तिसरे चित्रकार प्रभाकर नाईक साटम या कार्यक्रमाला हजर रहाणार होते, पण अपघातामुळे ते येऊ शकले नाहीत. त्यांनी पाठवलेला शुभसंदेश मृण्मयी यांनी वाचून दाखवला. अरुण शेवते आपल्या भाषणात म्हणाले की, व्हॅन गॉगचं माझ्याशी असलेलं नातं भावसारांच्या पुस्तकामुळे पूर्ण झालं. त्याचबरोबर विक्रम गोखलेंनी 'बॅरिस्टर' नावाचं आत्मचरित्र लिहावं अशीही इच्छा व्यक्त केली.

मीनाक्षी पाटील म्हणाल्या की, हे चित्रकारानं चित्रकाराविषयी लिहिलेलं पुस्तक असल्यामुळे ते अधिक वाचनीय झालं आहे. अतिशय सहजतेनं भावसारांनी या तिन्ही चित्रकारांचा जीवनपट उलगडला आहे. या तिघांमधील दु:खाचा एक समान धागा दाखवत या छोट्याशा पुस्तकातून भावसारांनी एक व्यापक अनुभव वाचकांसाठी मांडला आहे. सुहास बहुलकरांनी अशा प्रकारे चित्रकारांच्या कामाची नोंद होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन करत हे काम करताना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते याची उदाहरणे देऊन ते स्पष्ट केले. भावसारांनी मुखपृष्ठांचा एक नवाच विक्रम केलेला आहे, हे सांगितले. दीपक घारे यांनी चित्रकलेची क्लिष्ट परिभाषा न वापरता, साध्या संवादात्मक भाषेत लिहिल्यामुळे हे पुस्तक खूप लोकांपर्यंत पोहोचेल अशी आशा व्यक्त केली. तर अध्यक्षीय भाषणात या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर होणे गरजेचे आहे असे विक्रम गोखले यांनी सांगितले. आजच्या नवीन पिढीला हे पुस्तक खूप उपयुक्त ठरेल, यातील अनुभव या पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन केले.

आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला व त्यानंतर जपान सरकारने केलेली प्रभाकर नाईक साटम यांच्यावरील पंचवीस मिनिटांची फिल्म दाखवण्यात आली.

## 'स्त्री स्पंदन'

महिलादिनाच्या निमित्ताने 'ग्रंथाली अंतर्गत 'स्त्री स्पंदन' हे महिला व्यासपीठ निर्माण झाले. या खुल्या व्यासपीठावर सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रम राबवायचा 'ग्रंथाली'चा मानस आहे. विविध भाषा, बोली यांचे आदानप्रदान, कार्यशाळांचे आयोजन, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग, व्याख्याने आयोजित करणे, महिलांसाठी काही खास कार्यशाळा आयोजित करणे अशा विविध उपक्रमांचा यात अंतर्भाव असेल. यातील विषय हे फक्त महिलांपुरता मर्यादित न राहता त्याची व्याप्ती वैश्विक असेल. यानिमित्ताने एक समृद्ध वैगारिक मंथन घडून यावे हीच अपेक्षा आहे.

वरील उपक्रमाची सुरुवात ९ मार्च २०१९ रोजी 'ग्रंथाली' कार्यालयात करण्यात आली. या शुभारंभाच्या उपक्रमात आहारतज्ज्ञ, योग प्रशिक्षक आणि योग अभ्यासक डॉ. ललित गांगल यांनी 'स्वास्थ आणि मन : योग एक साधना' या विषयावर आपले विचार मांडले. शरीर आणि मन यांचा जवळचा संबंध कसा असतो ते विविध उदाहरणाच्या माध्यमातून त्यांनी सविस्तरपणे विषद केले. पतंजली योगसाधनेतील अष्टांग योग या योगसाधनेतील वेगवेगळी तत्त्व, विचारधारा यांची सविस्तर चर्चा त्यांनी यावेळी केली. शरीरातील विविध अवयव, त्यांची निसर्गाने ठरवून दिलेली कार्ये, शरीराचे आतील घड्याळ, त्याचे निसर्गाने ठरवलेले वेळापत्रक इत्यादी बाबी अतिशय सामान्य भाषेत मांडून स्वस्थ मन आणि स्वस्थ शरीर लाभण्यासाठी आदर्श जीवनप्रणाली कशी असावी हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. आहार-विचार-आसने याविषयी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून ही चर्चा उत्तरोत्तर रंगत गेली. पुरुष श्रोत्यांनीही या चर्चासत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला. स्त्री देह, मेनोपोझ, पाळीच्या वेळी उद्भवणाऱ्या समस्या अशा अनेक विषयांवर रंगलेल्या चर्चा फक्त स्त्रियांपुरता मर्यादित न राहता या विषयावर स्त्री-पुरुष श्रोत्यांमध्ये खुली चर्चा या निमित्ताने घडून आली.

या चर्चासत्रात आशा इंगळे, सीमा प्रभावळकर, अरुण जोशी, श्रीहर्ष फेणे, धनश्री धारप, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. वीणा सानेकर, साधना गोरे, चांगदेव काळे, सलील वाघमारे, धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, शोभा हिंगलासपूरकर, सई हिंगलासपूरकर, छाया दातार, प्रल्हाद जाधव, सुरेखा जाधव आणि शुभा गोडबोले यांनी चर्चक म्हणून आपला सहभाग नोंदवला.

'शब्द रुची'च्या महिलादिन विशेषांकाचे प्रकाशनही यावेळी डॉ. ललिता गांगल यांच्या हस्ते करण्यात आले.

## पुरस्कार

## संगीता अरबुने यांना मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे प्रा. भगवंत देशमुख विशेष वाङ्मय पुरस्कार प्राप्त

संगीता अरबुने यांच्या 'ग्रंथाली' प्रकाशित 'मनीमानसी' या ललितलेखसंग्रहाला मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे नुकतेच थोर साहित्यिक रा. रं. बोराडे यांच्या हस्ते प्रा. भगवंत देशमुख विशेष वाङ्मय पुरस्काराने गौरविण्यात आले. ११००० रुपये, शाल आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोतापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली साहित्यिक मनोहर जाधव, प्रकाश पायगुडे यांच्या निवड समितीने हे पुस्तक निवडले. औरंगाबाद येथील परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह दादा गोरे, साहित्यिक डॉ. ऋषिकेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कौतिकराव ठाले पाटील यानी आपल्या प्रास्तविकपर भाषणात ललित साहित्याचे अभ्यासक, व्यासंगी ललित लेखक आणि परिषदेच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या प्रा. भगवंत देशमुख यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या नावाचा पुरस्कार संगीता अरबुने यांच्या 'मनीमानसी' या ललित लेख संग्रहाला देताना परिषदेला अत्यंत आनंद होत असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी बोलताना रा. रं. बोराडे म्हणाले, '' 'मनीमानसी' मधील अनेक लेख मनाला चटका लावून जातानाच अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात.'' आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, यातल्या अनेक लेखांकडे ललित लेखांचा उत्कृष्ट नमुना म्हणून पाहता येईल. लेखिकेची सूक्ष्म निरीक्षण शक्ती आणि माणसांचे स्वभाव नेमकेपणाने टिपण्याचं त्यांचं कसब याचंही त्यांनी याप्रसंगी कौतुक केलं.

डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी खूप विस्तृतपणे या पुस्तकावर भाष्य केले. या संग्रहात मानवी मनाच्या भिन्न-भिन्न भावनांचा परिपोष असून करुणा आणि कारुण्य हे यातील लेखांचे मुख्य आशयसूत्र आहे. हे पुस्तक समाज संस्कृतीवर नेमकेपणाने बोट ठेवतनाच पुरुषाच्या कोंडीचा त्याच्या भावविश्वाचा देखील मागोवा घेते. ही गोष्ट लक्षणीय असल्याचे सांगून त्यांनी काही लेखातून दिसून येणाऱ्या लेखिकेच्या धीट अभिव्यक्तीचे देखील कौतुक केले. आपल्या भाषणात शेवटी त्यांनी ललित साहित्यामध्ये संगीता अरबुने याचं लेखन गांभीर्याने विचार करायला लावणारं असून मराठवाडा साहित्य परिषदेने प्रा. भगवंत देशमुख विशेष वाङ्मय पुरस्कारासाठी 'मनीमानसी'ची केलेली निवड अत्यंत योग्य असल्याचे सांगितले.

लेखिका संगीता अरबुने यांनी या प्रसंगी अत्यंत हृद्य शब्दात आपले मनोगत मांडले. मराठवाडा साहित्य परिषदेने हा पुरस्कार देऊन 'मनीमानसी'चा त्या अनुषंगाने आपला खूप मोठा सन्मान केला असून आता लेखक म्हणूनची आपली जबाबदारी वाढली असल्याचे सांगितले. आपल्या मनोगतात त्या पुढे म्हणल्या, 'मनीमानसी'चा संपूर्ण प्रवास हा एक लेखक आणि माणूस म्हणून समृद्ध करणारा होता.

या प्रसंगी जेष्ठ साहित्यिक बाबा भांड, कै. भगवंत देशमुख यांचे सुपुत्र अजय देशमुख, सुहास अरबुने आदी उपस्थित होते. कौतिकराव ठाले पाटील यांच्या आग्रहास्तव संगीता अरबुने यांनी आपल्या पतीसमवेत हा पुरस्कार स्वीकारला.

अतिशय नेटकेपणाने संपन्न झालेल्या या समारंभाचे सूत्रसंचालन कवी विष्णू सुराशे यांनी केले.

## सावाना वाङ्मयीन पुरस्कार जाहीर

सार्वजनिक वाचनालय नाशिक संस्थेच्या १७९व्या वार्षिक समारंभानिमित्त देण्यात येणाऱ्या विविध वाङ्मयीन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता वाचनालयाच्या मु.शं. औरंगाबादकर सभागृहात मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. कौतिकराव ठाले-पाटील यांच्या हस्ते पुरस्कारार्थींनी गौरविण्यात येणार आहे.


वाचनालयाच्या वतीने वार्षिक समारंभानिमित्त विविध पुरस्कार देण्यात येणारा डॉ. वि.म. गोगटे स्मृती पुरस्कार सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमाचे निर्माते रविराज गंधे यांना त्यांच्या 'माध्यमरंग' पुस्तकासाठी जाहीर झाला आहे. पु.ना. पंडित पुरस्कार अंबरनाथ येथील किरण येले यांना 'मोराची बायको' लघुकथासंग्रहासाठी, तर डॉ. अ.वा. वर्टी कथालेखक पुरस्कार दिनकर कुटे, अशोक देवदत्त टिळक स्मृती पुरस्कार येवला येथील प्रा. गो. तु. पाटील यांना 'ओले अंतरीचे' आत्मचरित्रासाठी, मु.ब. यंदे स्मृती पुरस्कार संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. यशवंत पाटील यांना 'संस्काराचा अमृतकलश' या ग्रंथासाठी आणि धनंजय कुलकर्णी स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अभिजित कुलकर्णी यांच्या 'रेडटेप' कादंबरीस जाहीर झाला आहे.

अमरावती येथील सुदाम सावरकर राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार २०१९ चा 'सुंदर माझी शाळा' बालकविता संग्रहाला यंदाचा 'उत्कृष्ट साहित्यकृती सन्मान!' 'सुंदर माझी शाळा' या पुस्तकाला मिळालेला हा तिसरा राज्यस्तरीय सन्मान!

## ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**डायरी एका चंद्राबाईची**
**डॉ. द.ता. भोसले**




**अमावस्येपूर्वीच्या कला**

प्रत्येकाचे आयुष्य ही एक कादंबरी असते आणि उगवणारा प्रत्येक दिवस हे तिचे पान असते, असे सुप्रसिद्ध आणि तितकाच लोकप्रिय इंग्रजी लेखक शिडने सेल्डन याला त्याच्या वडिलाने सांगितलेले हे वाक्य, जेव्हा सिडने सेल्डन आत्महत्या करायला निघाला होता. हे वाक्य काही सिडनेपुरते मर्यादित समजण्याचे कारण नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात उगवणारा प्रत्येक दिवस काहीतरी घेऊन आलेला असतो, त्याच्या आयुष्याच्या कादंबरीचे पान म्हणून त्यात भरत घालीत असतो. फक्त प्रश्न असतो, आपण त्याच्याकडे किती डोळस आणि संवेदशीलतेने पाहतो. पूर्वी असा समज होता की, सटवाई जन्मलेल्या बाळाच्या कपाळावर त्याचे भाग्य लिहून जाते. हा समज खराखोटा, हा भाग अलाहिदा. परंतु जगणारा प्रत्येकजण त्याचे भाग्य दररोज अनुभवत असतो, उगवणाऱ्या दिवसाला सामोरे जात असतो, हे नाकारता येत नाही. 'डायरी एका चंद्राबाईची' ही कादंबरी अशीच प्रत्येक पानावर तिचे ठसठशीत नाव कोरून आलेली. जगण्याची प्रत्येक कला अनुभवत आली आहे. हे अनुभवणे कलेकलेने सुखाकडे घेऊन जाते की खाईकडे, हे वाचकांनी ठरवायचे आहे. या जगण्याला स्वतः समजून घेणे, त्याच्या भलेबुरेपणाचे धागे जुळवून ठेवणे, आणि त्यांची संगती लावून शब्दबद्ध करणे, हे काम सोपे नाही. हे काम कुणाला पथदर्शक ठरू शकते, कुणाला 'जगलेला तो माणूस' समजून घेण्यास उपयुक्त ठरू शकते. मात्र हे निश्चित, असे लेखन स्वांत सुखाय नसून आपली नाममुद्रा मागे ठेवणारे अक्षय जीवनमुद्रा ठरते. ही जीवनमुद्रा कोरण्याचे अवघड काम केले आहे सुप्रसिद्ध लेखक डॉ. द.ता. भोसले यांनी.

चंद्रमौळीत चंद्रकलेसारखी रूप घेऊन जन्माला आलेली सुकोमल चांदणी ही चंद्रमौळीत कधी मावत नाही. तिच्या आईबापांच्या जीवाला घोर लावायला कारण मात्र नक्की ठरते. त्यांच्या नजरेत आनंदाचे चांदणे फुलवण्याऐवजी दुःखाचे काजळ पेरण्याचेच काम करते. इतरांच्या डोळ्यांना मात्र सुखद लालसेचे अंगण भासते, हक्काचे. असेच आणि असेच चंद्राच्या जीवनात घडते. जन्मापासून ही परवड सुरू होते ती अखेरपर्यंत पाठ सोडत नाही. आईच्या वाट्याला जे आले तेच जन्मसिद्ध हक्कासारखे चंद्रासोबत येते. यात फसवणूक, छळ, अपमान, मानहानी, शारीरिक छळ, क्लेष अशी सर्वकाही गरळ सोसण्यालाही पर्याय नाही. तरीही जगण्यातली अपरिहार्यता टाळता येत नाही. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी टाळता येत नाहीत, अगदी शरीराचा बाजार मांडण्यापर्यंत. हे सारे सहन करूनही त्यावर मात करते ती माणूस म्हणून जगण्याची धडपड.

चंद्रा ही एक व्यक्तिरेखा आहे. ती स्वतःची कहाणी स्वतःच्या शब्दात मांडते, डायरीच्या स्वरूपात. यात तिच्या आईच्या वाट्याला आलेले भोग, आईबापाची होणारी परवड, त्यांची अगतिकता, लुबाडणारा–फसवणारा– मगरूर –तालेवारांपुढे संसाराचे तीनतेरा वाजतात. त्यातून जन्माला आलेली चंद्रा तोच धागा पुढे घेऊन जगते. चंद्राचा जगण्याचा मोठा परीघ हा तिचा राहत नाही, तो भोग वाट्याला आलेल्या स्त्रीच्या व्यथेचा परीघ होतो. सर्वसामान्य स्त्रीसारखं सर्वसामान्य आयुष्य जगण्याची इच्छा असणाऱ्या चंद्राच्या आयुष्याचे पोतेरे होते. केवळ तिच्या आईला आणि तिला लाभलेले रूप, हे त्याचे मूळ. सोबत बापू नावाची व्यक्तिरेखा आहे, जो स्वतःच्या घरापासून दुरावला आहे आणि चंद्राच्या आश्रयाला विसावला आहे. परंतु हे विसावणे तिच्यावर अत्याचार करण्यासाठी नव्हेतर तिला मदत करण्यासाठी, तिचे जगणे सावरण्यासाठी. दिनेश नावाचा मुलगा आहे, जो आईच्या या वागण्याचा तिरस्कार करून दूर राहतो. यात त्याची होणारी कुचंबणा वेगळीच. चंद्रा, चंद्राची आई लाखाबाई, बापू आणि दिनेश यांच्याभोवती गुंफलेले हे कथानक. परंतु रखमा, तारामती, शांताबाई आहेत, तशा पारू, सपना, मुन्नी, आऊसाहेब या व्यक्तिरेखा आहेत. या प्रत्येकीच्या जगण्याला वेगवेगळे परिमाण आहेत, कंगोरे आहेत. यात येणारी पुरुषी व्यक्तिरेखा या समाजाच्या वासना, ढोंगीपणा आणि फसवणुकीने करणारे शोषण, यांचे ते प्रतिनिधीत्व करतात.

एका वाक्यात सांगायचे तर देहाच्या व्यापारात सापडलेल्या एका रूपवतीची ही कहाणी आहे. जी तनाने सुंदर आहे तशी मनाने. परंतु हे सुंदरपण टिपले जाणे सुद्धा तितकेच सुंदर झाले आहे, ते लेखकाच्या संवेदनशील लेखणीमुळे. विषय जितका नाजूक तितकीच नाजूकपणे त्याची वीण विणलेली आहे. कुठेही त्याचा धागा उणा पडून ही वीण न्यून करण्यात धजावलेला आहे, असे आढळत नाही. नाजूकपणाचाही एक तोल असतो आणि तो तितकाच सक्षमपणे सावरून धरावा लागतो. तोल बिघडला तर ती संपूर्ण कलाकृतीच बेडौल होण्याची शक्यता असते. परंतु लेखकाने यासाठी आवश्यक असणारे सर्व कौशल्य पणाला लावलेले दिसून येते. केवळ एका वारांगनेची कलाकृती आपल्याला वाचकांच्या समोर ठेवायची आहे, असा अल्पहेतू यात नाही. हेतू आहे तो असे जगणे ज्यांची अपरिहार्यता ठरलेली आहे, त्यांच्या मनाचा वेध घेणे, त्याला तपासून पाहणे, त्या मनाची वाचा फोडणे. ही दबलेली मनाची वाणी लेखकाने अतिशय संयमाने, कुशलतेने आणि तितक्याच संवेदनशीलतेने वाचकांच्या समोर उजागर केली आहे. यातली जागोजागी आलेली वाक्ये वाचताना याची प्रचिती येते. ही प्रचिती तत्वज्ञानाच्या सूत्रांना स्तब्ध करते. लेखक पुरुष असूनही एका स्त्रीच्या अंतःकरणाला इतक्या खोलवर जाऊन तळ शोधू पाहते, हे लेखक म्हणून अचंबित करणारे आहे.


सतीश भावसार यांनी अतिशय देखणे मुखपृष्ठ या पुस्तकाला दिलेले आहे. शीर्षक, आशय आणि संगती यांचा रम्य असा मेळ साधला आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

ग्रंथाली

# ग्रंथपान

**नाही फिरलो माघारी**
**मोहन शिरसाट**




## नाही फिरलो माघारी

मी कविता का लिहितो? असा प्रश्न कवीला विचारणे तसे अवघड असते. परंतु कवीलाच या प्रश्नाचे उत्तर ठाऊक असेल तर सगळे प्रश्नच निरुत्तर होतात. मोहन शिरसाट त्यांच्या मनोगतात या प्रश्नाचे उत्तर स्वत: देतात आणि आपल्या कविता लेखनाची प्रेरणा वाचकासमोर मुक्त करतात. ही प्रेरणा शोषणऐवजी कल्याणाची. असमानतेच्या भिंती गळून पडण्याची, शेतकरी–कष्टकरी–श्रमिकांच्या घामाची सन्मान करण्याची, संघर्षाला सम्यकतेची धार येण्याची, यातून हेही स्पष्ट होते. बऱ्याचदा लेखक कुठलीही भूमिका न घेता लेखन करतात. परंतु मोहन शिरसाट हे भूमिका घेऊन लेखन करणारे कवी आहेत. अशी ठाम भूमिकेचा पाया मजबूत असणाऱ्या कवीला कधी त्याच्या भूमिकेपासून माघारी फिरण्याचा प्रश्नच येत नाही. आणि तेच त्यांनी आपल्या कवितासंग्रहाला शीर्षक बहाल केले आहे, 'नाही फिरलो माघारी.'

मोहन शिरसाट यांची एकूण कविता कशी आहे याविषयी डॉ. महेंद्र भवरे यांनी अतिशय समर्पकपणे नोंद केली आहे, 'आजच्या काळाची दुखरी नस' नेमकेपणाने पकडणारी ही कविता आहे.' या विधानाचा प्रत्यय त्यांची कविता वाचत असताना पदोपदी येतो. समाजात असलेल्या भेदाभेदाच्या ओझ्याखाली एक समाज पूर्णपणे दाबला गेला, त्याचा कोळसा झाला, जसा मातीच्या उच्च दाबाने जमिनीखाली गाडले गेलेल्या जंगलाचा कोळसा होतो. ही शोकांतिका आजही थांबलेली नाही. म्हणून शोषिताने कायम दाबून राहावे हे कवीला मान्य नाही. कोळसा ही ज्वलनशील आहे तसा हिऱ्याचा गर्भही याच कोळशाच्या गर्भाशयात असतो. तुम्ही या हिऱ्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असा इशाराच या कवितेतून कवी देत आहे.

सण म्हटला की सगळीकडे आनंदाला उधाण आलेले असते. त्याचे साजरेपण तर डोळ्यांची पारणे फेडणारे असते. परंतु त्याचवेळी एक वर्ग असाही असतो की, जो आंब्याचे डहाळे विकायला घेऊन बसलेला असतो त्या दिवशी अपेक्षा हीच की किमान त्या दिवशी तरी काही हाती येईल. ही आस म्हणजे 'पोटाशी उगवलेली अवस' जिच्यासाठी रात्ररात्र जागं रहावं लागते. श्रम करावे लागतात. दोन स्तरावर असणारा हा सण कवीला पूर्वीही दिसत होता आणि आजही ते चक्र बदलले नाही, ही खंत डोळ्यांत दुखरे अंजन घालणारी आहे.

शेतकऱ्याची अवस्था हा असाच संमातर विषय. राबराब राबायचं आणि आशा लावून बसायचं तेव्हा हातात काहीच उरत नाही. एकतर पाणी पावसाचा भरवसा नाही. जे पिकेल त्याला बाजारात भाव नाही. अशावेळी कवी लिहितो, ''त्यातलं त्याच लागते जिरायला, पीकच खाऊन टाकते पिकाला.''

आपला समाज, आजचे वास्तव हे जीवाची तगमग करायला लावणारे जगणे आहे. यात जितके–आत शिरावे, तितके दाहक अनुभव वाट्याला येतात, त्यांची दाहकता ही कोंडून टाकणारी, प्रचंड घुसमट करणारी आहे. अंगाची लाहीलाही व्हावी, आत ठासून भरलेली वाफ रटरटत राहावी असे वारंवार जाणिवांवर प्रहर होत आहेत.

कधी थांबणार हे सारे अशी अगतिकता यातून पुढे येते, जे आजुबाजूला दिसत आहे तेच घरात दिसत आहे. डोळ्यांत स्वप्न घेऊन आपल्या लेकरांना कुशीत घेणारी माय ही कुणा एकाची माय राहात नाही. ती सगळ्या करपलेल्या जीवनाचे प्रतिनिधित्व करते.

''तू भाकरी थापताना शेकून घेतलंस स्वत:ला चुलीवर
मीठ मिरच्यांचं आयुष्य वाटून घेतलं पाट्यावर

तीच गत बापाची. राबराब राबणारा बाप, यंत्रमानवा–सारखा झाला, सगळ्या भावनांना कोंडून मुलांच्या स्वप्नासाठी झिजत राहिला. त्याच्याविषयी कवी लिहितात,

तू अंगावरच्या चिंध्यात आमच्या भविष्याच्या स्वप्नाचं धन लपवलंस
ओझं उन्हाचं दडवलंस अन आम्हाला घडवलंस
म्हणून आमच्या आयुष्याचं सोनं झालं.

शेतात राबणारा भाऊ, पोटातल्या नाळेच्या भुकेचा निबरपणा हातात उतरलेला लंगोटीयार, हे सगळेजण आप्त वाटतात, परंतु डोळसपणे पाहिले तर अवतीभोवती प्रत्येकाचा बा, माय, भाऊ, लंगोटीयार हे आपलेच असतात. स्त्रीवर अत्याचार करणे हा जणू पुरुषत्वाचा अधिकार समजणारा वर्ग, पिडितेचा आक्रोश कधी समजून घेणार आहे की नाही. तिला मन, भावना असतात याची जाणीव सजग ठेवणार आहे की नाही? एकाच मातीची लेकरे असूनही आपसात दरी का? जातीपातीच्या भिंती कधी तुटणार आहेत की नाही? असे प्रश्न कवी वाचकांसमोर ठेवतात. खैरलांजी, फुलन, बोधिवृक्ष, बाबासाहेब, पाणी, स्वप्नाळू मुलगी अशा अनेक कविता आहेत, ज्या अंतर्मुख करतात.

मोहन शिरसाट हे आश्वासक कवी आहेत. जे दिसतं त्याचा भेद करून नवीन काही सकारात्मक रुजेल असा आशावाद व्यक्त करतात. त्यांच्या व्यक्त होणाऱ्या भावना या जिवंत माणसाची नाळ तपासून पाहतात. संस्काराच्या नावाखाली जे चाललं आहे त्याचा भेद करून पाहतात. विषयाविषयीची जाण आणि भान असलेला हा कवी आहे. त्यांच्या कवितेत उद्याची बिजे आहेत. कसदारपणाची देण त्यांना लाभलेली आहे. त्यामुळे उद्याचा कवी असे मोहनचे नाव निश्चित सांगता येईल.

मुखपृष्ठ आणि आतील रेखाटने ही कवितासंग्रहाला साजेशी झालेली आहेत.

**मूल्य १३० रु. सवलतीत ८० रु.**

## ग्रंथपान

**हरवलेल्या कवितांची वही**
**संजय कृष्णाजी पाटील**




**भान हरवलेल्या वर्तमानाविषयी**

एक कवितेचे पुस्तक जरासे निवांतपणे हातात घेतले. सहज नजर टाकावी, काय आहे कवितेत, ते पहावे असा माफक आशावाद. मध्येच पान उघडले, 'रुढीबाज ढोलांचं कातडं' ही कविता हाताशी आली. वाचताना एका ओळीशी ठेचकाळलो, 'अगोदरच अंधार करून ठेवला की मग उजेडाला नाकारण्याचं पाप मस्तकी नको' ही ती ओळ आणि तिला जोडून शेवटची ओळ आली, 'बाकी दाभोळकर बिभोळकर भाडमें गए साले सब.' मन कावरेबावरे झाले. वास्तवाच्या जाड कातड्याने पार कवेत घेऊन जीव जाईपर्यंत गुदमरून टाकल्यासारखे वाटायला लागले. कुठे आहोत आपण? काय चालले आहे आपल्या आजूबाजूला? आणि या सगळ्याचे आपण एक भाग आहोत, डोळ्यांवर पट्टी बांधून जगणारे. चट्‌कन कवी आणि कवितासंग्रहाचे नाव पाहिले. संजय कृष्णाजी पाटील हे कवी आणि कवितेचे नाव सापडले, 'हरवलेल्या कवितांची वही'.

संजय पाटील यापूर्वी अनेकदा भेटलेले, वेगवेगळ्या रूपात लेखक, कवी, दिग्दर्शक, नाटककार, चित्रपटाशी जोडलेला. नुकताच 'लेझीम खेळणारी पोरं' हा कवितासंग्रह वाचलेला होता तोही नजरेसमोर उभा राहिला. वास्तवाला भिडणारा, संवेदनशील मन असलेला, कलेची उत्तम जाण असलेला, अभिरुचीसंपन्न कवी त्याचवेळी मनात घर करून राहिला होता. लेख, समीक्षा आणि कथा असा त्रिमिती असलेले पुस्तकही वाचलेले होते. त्यातून त्यांच्या जाणिवा, नेमकेपणा, भवताल टिपण्याची वेगळी आरपार दृष्टी प्रत्ययास आली होती. त्यामुळे 'हरवलेल्या कवितांची वही' कवितासंग्रह जागरूकपणे वाचायला घेतला. वाचत-वाचतच राहिलो आणि शेवटी बधीर झाल्यासारखा सुन्नपणे बसून राहिलो. हे सारे काय काय वाचले आपण... कवितेतून हे मांडता येऊ शकते? एक प्रचंड असा कोलाज नजरेसमोर उभा राहिला. अनेक मिती, प्रतिमा, प्रतिबिंबे, त्याचा गडद करडा रंग, कधी मातीत थिजलेल्या रक्तासारखा तर कधी मातीतून उगवून आलेल्या दगडफुलासारखा. सुंदर लखलखते चांदणेमहाल पाहत असताना मध्येच स्वत:च्या अस्तित्वाला पुसत जाणारी उल्केची रेष दिसावी, कधी बहरलेल्या ताटव्यात आडदांड सांडाने हैदोस घालावा. एक, अनेक... कविता, कविता आणि कविताच, काय लिहिलेय संजय पाटील यांनी!

पुन्हा पुन्हा कवितेच्या ओळी मस्तकावर प्रहार करीत असल्याचा भास होत राहतो. 'सैतान तुझ्या आत्म्याला चिरशांती देवो' या कवितेत एका भीषण वास्तवाला पुढे ठेवतात, ''जेवढ्यांना आजपर्यंत बॉम्बस्फोटांमध्ये उडवलेस त्यांच्या गंगाभागीरथी विधवा माऊलींचे काय?' दहशतवाद्यांना जात नसते म्हणतात, त्यांना मनही नसते, जे घडते त्याच्याशी त्यांचे कुठलेच नाते नसते. परंतु ज्यांचे जळते त्यांचे काय? हा प्रश्न केवळ दहशतवादाचा नाही, तो आपल्या सगळ्यांचा आहे. त्याकडे आपण कोणत्या नजरेने पाहत राहणार आहोत?''

शेतकऱ्यांचा प्रश्न असाच, वारा 'अनाथ' वेश घेऊन वावरतो आहे आणि ढगांचा पत्ता नाही. पंचक्रोशीत पाणी नावाचं गाव नाही. शासकीय संवेदना तर वेगळ्याच पातळीवर असलेल्या. कोरड्या सहानुभूतीचा पाझर दाखवत अडचणींचा डोंगर उभा करणाऱ्या. त्याच त्याच चक्रात फिरत राहणाऱ्या. कुणालाच कुणाचे सोयरसुतक नसावे. साध्य महत्त्वाचे. साधन कसलेही असो विकृत स्वरूपाचे, अशी आजची परिस्थिती. बेगडी स्वरूपाची. जिथे फुलपाखरेच स्वत:वर हद्दपारीची वारंट बजावत आहेत. मूल्यांचा ऱ्हास, स्वत:पुरते पाहणारे जग, बांधिलकी वाऱ्यावर सोडून जगण्याची वृत्ती त्यामुळे आपसातला संवादच हरवला आहे असे चित्र सर्वत्र दिसत आहे. अशा परिस्थितीत कवीला प्रश्न विचारला जातो,

असे संवेदना हरपून बेशुद्धावस्थेत जगायचे
होते तर मुळात कवी म्हणून जन्मालाच का
आला मित्रा?

या संग्रहात असलेल्या कवितांची विभागणी तीन भागांत केलेली आहे, 'लेझीम नंतरच्या कविता', 'हरवलेल्या कवितांची वही' आणि 'आई गेल्यानंतरच्या कविता'. आईंचा कलासक्त संस्कार कवीवर आहे. त्या संस्कारांची धुळाक्षरं या कवितांमधून हळुवारपणे गिरवलेली आहेत. तीन भागातील या कविता वेगवेगळेपण लेवून आलेल्या आहेत. हे वेगळेपण त्यांच्या शीर्षकांमधून सुद्धा व्यक्त झालेले आहे. समाज, व्यक्ती, प्रशासन, बळीराजा, आई अशा विविध विषयांना कवीने कवितेतून व्यक्त केले आहे. यातील अनेक कवितांना स्वत:चा ताल आणि लय आहे. त्यात उपहास, विरोधाभास, टोकाचा थेटपणा आहे. तसा सयमसुद्धा आहे. परंतु या सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यातले काव्य कुठे विसरले जात नाही. 'आभाळपाडवा', 'जन्मनागवा', 'अवसमिठी', 'ढगबळ', 'कर्मभेगा', 'रानभैरी', 'प्रलयपिंगा' असे अनेक नवे शब्द ही कविता देते. कविता नुसतीच प्रहार करीत नाही तर जगण्याचा सकारात्मक प्रदेशही दाखवत जाते. खरेतर या संग्रहातील कवितांचा आवाका पाहिल्यानंतर प्रत्येक कवितेचा स्वतंत्रपणे समीक्षा आस्वाद घ्यायला हवा, इतकी ताकद या कवितेत आहे.


डॉ. प्रभा गणोरकर या ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक यांची प्रस्तावना आणि सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ व मांडणी या पुस्तकाला लाभलेली आहे.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

## हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी

**रमेश वाघमारे**




### कस्तुरीसारखा अमूल्य ठेवा

'हिंदुस्थानी रागदारी संगीत' हा एक अमूल्य ठेवा आहे, कस्तुरीसारखा. या संगीताचा काळाविषयी आणि त्याचे असलेले मानकरी, यांच्याविषयी कुतूहल आणि अभिमान नसलेला माणूस हिंदुस्थानी असू शकत नाही. किराणा, जयपूर, इंदोर, मेहर अशी प्रस्थापित घराण्याची घरंदाज परंपरा, तानसेनपासून किशोरी आमोणकर यांच्यापर्यंत असलेले मोजकेच परंतु अस्सल घरंदाज दिग्गज. त्यांचा ताल, ठुमरी, ख्याल, बंदिश, आलापी, जोड, झाला यांच्याशी असलेला आंतरिक संबंध. सगले काही और म्हणावे असे. या सगळ्यांची ओळख असणारा दर्दी, रसिकवर्गही आगळावेगळाच म्हणावा लागेल. ज्यांना यात गती आहे, नुसता 'सा' स्वर कानावर पडताच ज्यांच्या चित्तवृत्ती उसळून येतात, असे कानसम्राट वेगळेच. यात एक आहेत डॉ. रमेश वाघमारे रसिक, संगीतप्रेमी, संगीतावर निरलस प्रेम करणारे, मैत्रिणींना हजेरी लावणे इतकेच नाहीतर त्यांचे आयोजन करणे, या दिग्गजांची खातीर करणे, यातही रस असणारे डॉ. वाघमारे, संगीताचे चाहते, या क्षेत्रातल्या मान्यवर दिग्गजांचे चाहते, प्रसंगी आश्रयदाते असलेले डॉ. वाघमारे उच्चविद्याविभूषित असून, परदेशस्थ भारतीय असून, संगीताचा झरा त्यांनी अखंड प्रवाही ठेवलेला आहे. तसे ते भाग्यवानही म्हणायला हवेत. संगीताचा केवळ ध्यास जोपासला नाही, तर या दिग्गजांचा सहवास देखील त्यांनी अनुभवलेला आहे. नातेसंबंध असावा इतका घनिष्ट स्नेह जोपासला आहे. प्रत्यक्ष त्यांचे अनुभव, प्रसंग, जीवनक्रम समजून घेण्याची संधी लाभली आहे. आणि त्यातूनच 'सुवर्णयुगाचे मानकरी' हा ग्रंथ साकारला आहे. हा केवळ ग्रंथ नाही तर तो हिंदुस्थानी रागदारी संगीताचा सुवर्णकाळ उभा करणारा दस्तऐवज म्हणता येईल. हा काळ अनुभव आणि अनुभूतीवर आधारलेला आहे. प्रत्येक हिंदुस्थानी संगीतप्रेमी, रसिकासाठी मोठा खजिनाच म्हणता येईल. हे युग हा ग्रंथ वाचत असताना साक्षात नजरेसमोर उभे राहते. तो राग, त्याचे सादरीकरण, सादर करणारी विभूती, एका सुंदर जगात सोबत घेऊन जाते. हा अनुभव प्रत्येकाच्या वाट्याला यावा असे हे लेखन आहे. त्या त्या कलाकाराची खास बैठक व्यक्त करणारी, त्यांच्या निष्ठेची, रियाजाची आणि संगीतावरील अकलंकित प्रेमाची, ध्यासाची महती प्रत्येक पृष्ठावर उलगडत जाणारे लेखन आहे. एखादी बैठक, जमून गेली असे. शेवटी श्रोते सांगतात, तसे जमून गेलेले हे लेखन आहे, असे वाचून झाल्यानंतर वाटत राहते.

एकूण चोवीस दिग्गज कलावंतांवरील हे लेख आहेत. प्रत्येकाविषयी भरभरून लिहिलेले आहे. जन्मापासून ते उच्च स्थानावर विराजमान होईपर्यंतचा हा थक्क करणारा आहे. पं. भीमसेन जोशी, पं. रविशंकर, पं. जसराज, उस्ताद बडे गुलाम अली खाँ, भारतरत्न बिस्मिला खाँ, झाकीर हुसेन, कुमार गंधर्व, किशोरी अमोणकर, पं. शिवकुमार शर्मा, प्रभा अत्रे, पं. हरिप्रसाद चौरसिया, सौ. मालिनी राजूरकर, उस्ताद अमजदली खाँ, पं. वसंतराव देशपांडे, पं. विश्वमोहन भट, पं. रामनारायण, गंगुबाई हनगल, सुलतान खान, उस्ताद अमीर खाँसाहेब, अन्नपूर्णा शंकर, पंडित गिरिजादेवी आणि केसरबाई ही ती दिग्गज मंडळी आहेत. आपापल्या क्षेत्रात कलेचा अमीर असा ठसा उमटवलेली. या प्रत्येकाच्या नावाअगोदर लेखकाने खास बिरुदावली बहाल केलेली आहे. भारताचा विसाव्या शतकातील तानसेन, विश्वसंगीताचा प्रणेता, शहनाईनवाझ, तबलानवाझ, आफताब-ए-सितार, गानसरस्वती, स्वरमयी गानपंडिता, सारंगीचा अखेरचा सूर, सारंगीचे सुलतान, विराणी, छन्दोवती. या विशेष बिरुदावलीने त्या त्या कलावंताची खरी पारख वाचकांसमोर ठेवली आहे, रत्नपारखीसारखी.

लेखकाला संगीताची उत्तम जाण असल्याची उदाहरणे प्रत्येक लेखात पदोपदी आढळतात. यमन, शुद्ध यमन, शुद्ध कल्याण, मियाँमल्हार, हिंदोल-बहार, भूप, मालकंस, शुद्धसारंभ अशा अनेक रागांविषयी वाद्यावरील बोलाविषयी ते सहजपणे टप्पे उलगडून दाखवितात. त्यांचे वेग आरोह-अवरोह, वेळा याविषयी सांगतानाच तो तो प्रसंग कसा भावला, त्याचे वर्णन त्यांनी केले ते, वाचताना, संगीतश्रोता कसा असावा, याची मूर्तिमंत जाणीव संचारत जाते. उस्ताद झाकीर हुसेन यांच्याविषयीचे उदाहरण पहा, 'झाकीरचे तबल्यावर थैमान सुरू झाले. ढगांच्या गडगडहाटासारखा रौद्र आवाज काढत, मधूनच डग्यावर 'घु' असा छतापर्यंत आवाज घुमवीत व शेवटी शंकराच्या डमरूसारखा टणत्कार करत तो विद्युल्लतेच्या वेगाने असा काही समेवर आला की, श्रोत्यांनी हर्षभराने टाळ्यांचा कडकडाट केला.'

साक्षात बालाजी-भगवान विष्णूचे संगीतसाधनेमुळे दर्शन झालेले. शहनाई-नवाझ भारतरत्न बिस्मिल्ला खाँ म्हणतात, ''संगीतातील सात स्वर व पाच वक्री स्वर ही माझी प्रार्थना (नमाज) आहे. शहनाई माझी कुराण आहे. संगीत हेच संसारातील एकमेव सत्य आहे.''

लेखकाची भाषा संगीतासारखीच मंत्रमुग्ध करणारी आहे. तिला नाद आहे, वेग आहे आणि तितकीच अनुभूतीसंपन्न आहे. त्यांचे हे लेखन म्हणजे संगीतप्रेमी माणसांसाठी जतन करून ठेवावा असा ठेवा आहे. प्रत्येकाने तो आपल्या संग्रही ठेवावा इतका उत्तम आणि तितकाच मौल्यवान आहे. आणखी संदर्भ व वेबसाईट दिल्याने त्यात मोठी भर पडली आहे. प्रदीप म्हापसेकर यांनी अतिशय सुंदर मुखपृष्ठ बहाल केले आहे. प्रत्येक कलावंताची भावमुद्रा तरलपणे टिपलेली आहे. त्याकडे पाहतानाच सर्व सूर सजीव झाल्यासारखे आपल्याभोवती रुंजी घालू लागतात.

**मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.**

# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे





डावीकडे सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांचा कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना रविराज गंधे, किरण येले आणि इतर मान्यवर मंडळी





डावीकडे मराठा मंदिरचा साहित्य पुरस्कार स्वीकारताना 'लडाख' या पुस्तकाबद्दल नरेंद्र प्रभू. उजवीकडे 'अमेरिका खट्टी मिठ्ठी' या पुस्तकाबद्दल मृण्मयी भजक.



'महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारा'बद्दल सतीश भावसार यांचा सत्कार करताना विक्रम गोखले




'प्रा. भगवंत देशमुख विशेष वाङ्मय पुरस्कार' संगीता अरबुने यांना 'मनीमानसी' या पुस्तकाबद्दल प्रा. रा.रं. बोराडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.